नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

दिवाळी अंक-१९५९

दीपावलि विशेषांक

१९५९

अंकांतील लेखक व कवि

ग्या. मु. पाठक
पु. य. देशपांडे
पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर
अ. ना. देशपांडे
के. तु. मंगळमूर्ति
ग. त्र्यं. माडखोलकर
ह. वा. देशपांडे
ना. रा. शेंडे
शं. बा. शास्त्री
बाबा मोहोड
रा. अ. काळेले
मनोहर वझे
भालचंद्र नेमाडे
कुमार
गंगाधर पानतावणे

मूल्य १ रुपया

युगवाणी

संपादक : पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

(मध्यप्रदेश शिक्षणविभागाकडून वाचनालयांकरिता मान्य झालेलें)

युगवाणी

ऑक्टोबर-नोव्हेंबर १९५९

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

वर्ष १४] [अंक ७–८
आक्टोबर-नोव्हेंबर १९५९

कला : जीवन : समीक्षा

दिवाळी विशेषांक

संपादकीय

'युगवाणी' बाबत निवेदन

'युगवाणी' हें 'विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र' आहे, हें आज पुन्हा एकदा निक्षून सांगण्याचा प्रसंग आला आहे. हें एका संस्थेचें मुखपत्र असल्यामुळे तें 'संपादक' या व्यक्तीचें मुखपत्र होऊंच शकत नाही. संस्थेचें मुखपत्र म्हणजे संस्थेने निश्चित केलेल्या ध्येय–धोरणाचा पुरस्कार करणारें पत्र आणि या ध्येय–धोरणाच्या मर्यादा सांभाळून संस्थेच्या परंपरेला व प्रतिष्ठेला धक्का न लागूं देण्याचें पथ्य पाळणारें पत्र.

संघाच्या सर्व सभासदांच्या बहुमताने अध्यक्ष व कार्यकारी मंडळ संघाच्या घटनेनुसार निवडलें जातें. हें कार्यकारी मंडळ आपल्यांतील एका सभासदाला 'युगवाणी' म्हणजे 'संघाचें नियतकालिक' चालविण्यासाठी 'संपादक' म्हणून निवडतें. याचा अर्थ असा की, 'युगवाणी'चा संपादक हा संघ व त्याची कार्यकारिणी यांचा प्रतिनिधि म्हणूनच संपादनाची जबाबदारी स्वीकारीत असतो. असें असलें, तरी ह्या किमान मर्यादा सांभाळून 'युगवाणी'च्या संपादकाला भाषा, साहित्य, संस्कृति व सदभिरुचि यांच्या संवर्धनाचें कार्य अधिकाधिक प्रभावी रूपांत करून दाखविण्याच्या बाबतींत पुरेसें स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्यावर निर्बंध लादण्याचा विचार वि. सा. संघाला व त्याच्या कार्यकारी मंडळाला आजवर शिवला नाही. गेल्या चवदा वर्षांच्या प्रदीर्घ काळांत 'युगवाणी'च्या कोणत्याहि संपादकाला, संघाचें हें मुखपत्र चालवितांना ज्या किमान मर्यादा हें एका संस्थेचें मुखपत्र म्हणून सांभाळाव्या लागल्या, त्या कधीहि बोचक वा संपादकीय स्वातंत्र्यविरोधक अशा वाटल्या नाहीत.

पण जें घडूं नये तें घडलें. आमचे मित्र श्री. या. मु. पाठक यांनी 'युग-वाणी'च्या संपादनाची जबाबदारी, किमान मर्यादांची जाणीव ठेवून स्वीकारली असतांहि त्यांना या मर्यादांचें अतिक्रमण करण्याचा मोह वा क्षोभ आवरतां आला नाही.

'युगवाणी'च्या सप्टेंबर १९५९ च्या अंकांत "विदर्भ साहित्य संघ अलिप्त आहे" या मथळ्याचा संपादकीय लेख लिहून त्यांनी एक अभूतपूर्व व विलक्षण समस्या संघाच्या कार्यकारिणीसमोर उभी केली. त्या लेखामुळे संघाच्या सभासदांत व 'युगवाणी'च्या वाचकांत संतापाची लाट उसळली. संघाच्याच मुखपत्रांत संघाच्या प्रतिष्ठेवर निर्घृण प्रहार करणारा व त्याची अनन्वित बदनामी करणारा लेख संपादकाच्याच सहीनें प्रसिद्ध व्हावा, हें पाहून संतापाची लाट उठली नसती तरच ती आश्चर्याची गोष्ट झाली असती.

अर्थात् याचा परिणाम जो व्हावयास पाहिजे होता तोच झाला. श्री. या. मु. पाठक यांना स्वसमर्थनार्थ जें सांगावयाचें होतें तें सांगण्याची संधि देऊन, त्यांनी केलेलें स्व–समर्थन समाधानकारक न वाटल्यामुळे कार्यकारिणीला खालील ठराव पास करावा लागला.

कार्यकारी मंडळाचा ठराव

"युगवाणीच्या सप्टेंबर १९५९ च्या अंकांत 'विदर्भ साहित्यसंघ अलिप्त आहे.' या मथळ्याचें जें उपहासगर्भ संपादकीय प्रसिद्ध झालें आहे तें वि. सा. संघाच्या ध्येय–धोरणाचा विपर्यास करणारें आहे. वि. सा. संघाच्या मुखपत्रांतूनच संपादक या नात्यानें असें लिखाण प्रसिद्ध करण्यांत संपादक प्रा. या. मु. पाठक यांनी औचित्याचा व आश्वासनपूर्वक स्वीकारलेल्या संपादकीय जबाबदारीचा भंग केला आहे, असें या सभेचें स्पष्ट मत आहे. त्यामुळे यापुढे संघाच्या मुखपत्राच्या संपादनाची जबाबदारी त्यांच्याकडे ठेवणें अयोग्य आहे असें ठरवून ही सभा प्रा. या. मु. पाठक यांना 'युगवाणी'च्या संपादकीय जबाबदारींतून आजपासून मुक्त करीत आहे." (रविवार, दि. २७–९–१९५९).

या दुःखद घटनेचा एक अपरिहार्य परिणाम म्हणून कार्यकारी मंडळानें माझ्याकडे 'युगवाणी'च्या संपादनाचें कार्य सोपविलें आहे. तें यथाशक्ति पार पाडण्याचा प्रयत्न मी करीन. प्रा. या. मु. पाठक यांच्याकडून जें घडूं नये तें वैयक्तिक प्रक्षोभाच्या भरांत घडून गेलें. त्याचा परिणाम जो व्हायचा तो झाला. असें असलें तरी श्री. पाठक हे आमचे मित्र आहेत व वरील एक अपवादभूत बाब वगळल्यास त्यांच्या आमच्या मैत्रींत कसलाहि बिघाड झालेला नाही. शिवाय ते संघाच्या कार्यकारिणीचे एक सदस्य म्हणून संघकार्याच्या बाबतींत आमचे सह-

कारीहि आहेत. हें सर्व ध्यानात घेऊन या संपादकीयाच्या रूपाने या दुःखद घटनेवर आम्ही कायमचा पडदा पाडीत आहोंत. संघ-सभासद व 'युगवाणी 'चे वाचक व हितचिंतक यांनाहि आमची अशी विनंती आहे की, त्यांनीहि हें प्रकरण आता कायमचें निकालांत निघालें आहे असें मानून त्याला आपल्या मनांत देखील पूर्णविराम द्यावा.

या अंकासंबंधी

वर चर्चिलेल्या भानगडीमुळे ऑक्टोबरचा अंक वेळेवर प्रकाशित करणें अशक्य झालें. म्हणून ऑक्टोबर-नोव्हेंबरचा हा जोड अंक दिवाळी विशेषांक म्हणून वाचकांना आम्ही सादर करीत आहोंत. फार कमी वेळांत, मागची-पुढची सांगड साधून, हा अंक काढावा लागल्यामुळे तो आमच्या कल्पनेप्रमाणे निघूं शकला नाही, याची आम्हांस जाणीव आहे. आमच्या अडचणी ओळखून वाचक उदार बुद्धीने हा अंक गोड करून घेतील, अशी आम्ही आशा करतों.

ही दिवाळी 'युगवाणी 'च्या वाचकांना व हितचिंतकांना आनंदाची जावो, हीच आमची प्रार्थना.

दिवाळी आणि दैवी आपत्ति

ही दिवाळी सर्वांना आनंदाची जावो, अशी देवाला प्रार्थना करतों न करतों तोंच विदर्भावर आणि भारतांतील इतर अनेक प्रदेशांवर ओल्या दुष्काळाची जी दैवी आपत्ति कोसळली आहे ती दत्त म्हणून आमच्या समोर उभी राहिली. ज्या मातीच्या दिवलाण्यांत तेल-वातीचे दिवे उजळावयाचे ती मातीच सर्वत्र ओली चिंब झालेली. वातींच्या करतां लागणारा कापूस, अतिजलवृष्टीचा दुष्परिणाम म्हणून पऱ्हाटींचीं पिकें पिवळीं पडूं लागल्यामुळे दुर्मिळ होणार याची जाणीव होतांच, वाती चेतवितांना असंख्य वऱ्हाडी कुटुंबियांच्या डोळ्यांतून जलवर्षाव होण्याचाच संभव अधिक. आणि भुईमुगांच्याहि पिकांची नासाडी झाल्यामुळे तेलाचीहि चणचण वर्षभर जाणवणार, या रुखरुखीमुळे दिवलाण्यांत तेल टाकतांना त्यांत अश्रूंचें पाणी मिसळल्याशिवाय कसें राहील ? अशी ही दिवाळी आनंदाची जावो, अशी आम्ही कितीहि कळकळीने प्रार्थना केली तरी ती देवापर्यंत कशी पोचणार आणि आनंदाच्या ऊर्मी वऱ्हाडी कुटुंबियांच्या अंतःकरणांत कशा उचंबळणार ? देव आम्हा वऱ्हाडी लोकांवर व समग्र भारतीयांवर रुसला आहे, कोपला आहे, असेंच सर्व दुश्चिन्हांवरून दिसूं लागलें आहे.

असें असलें तरी वऱ्हाडांतील नगरा-नगरांत आणि खेड्या-खेड्यांत लोक दिवलाण्या उजळतीलच. कारण ती त्यांची अनादि परंपरा आहे. देवाचा कोप

कितीहि झालेला दिसत असला व त्यामुळे दैनंदिन जीवनावर अवसेचा अंधार पसरलेला असला तरी दिवाळीचे दिवे लावून देवी लक्ष्मीची आराधना करण्याच्या आपल्या अनादि परंपरेचा विसर वैदर्भीय कुटुंबांना पडणें शक्य नाही. आपत्ति केवढीहि मोठी असो, वऱ्हाडी जनतेची देवावरील श्रद्धा त्याहिपेक्षा अधिक मोठी व अविचल अशीच आहे. दैवी आपत्ति ह्या मानवांच्या पापमय प्रमादांमुळेच कोसळत असतात, अशीहि वैदर्भीयांची व भारतीयांचीहि श्रद्धा आहे. ही श्रद्धा अधिकाधिक प्रदीप्त करीत राहण्याच्या आपल्या पारंपरिक सनातन व्रतापासून जनता कधीहि ढळणार नाही. ही अशी अविचल श्रद्धाच आम्हा भारतीयांची सर्वांत मोठी शक्ति आहे. या शक्तीची असावी तशी जाणीव आधुनिक झगझगाटाने विमोहित झालेल्या आमच्या राजकीय नेत्यांना नाही हीच, दैवी आपत्तीच्या पेक्षाहि, अधिक दुःखाची गोष्ट आहे.

दैवी आपत्ति ही आपल्याला आपल्या पापांची व प्रमादांची जाणीव करून देण्याचेंच सत्कार्य करीत असते. आपल्या पापांचा व प्रमादांचा सारा केरकचरा झाडून साफ करणें, घराघरांत पावित्र्य आणि मांगल्य यांच्या ज्योति चेतविणें आणि त्यांच्या प्रकाशांत पुण्यशील, प्रमादरहित, प्रगतिशील अशा नव्या जीवनाचा उत्साह रोमारोमांत साठवून घेणें, हींच आमच्या सनातन श्रद्धेने अखंड परिपूर्ण राहणाऱ्या दीपोत्सवाची खरी करामत. याची जाणीव आम्हां वैदर्भीयांना पुरेपूर असल्यामुळेच, दैवी आपत्तीचा तडाखा बसलेला असतांहि, दिवाळीच्या आनंदापासून आम्ही वंचित होणार नाही. सुखदुःखांचें राहाटगाडगें हें नित्य चालूच असतें. या राहाट–गाडग्यांपैकी वारंवार पाण्याने भरणारें व रिकामें होणारें एक गाडगें न होतां, आम्ही समग्र राहाट–गाडगें चालविणारे आत्मविश्वासी पुरुषच बनून राहूं, अशा निश्चयात्मक बुद्धीला उजळा देण्याला ही दिवाळी उपकारक ठरो, हीच आमची प्रार्थना.

—पु. य. देशपांडे

अनुक्रमणिका

क वि ता

ज्ञानदेव

पु. य. देशपांडे

ज्ञानदेवा, ज्ञानदेवा
शब्दकळेच्या ईश्वरा
कसा गवसला तुला
दिव्य प्रतिभेचा झरा ॥१॥

तुझे शब्द, तुझे भाव
तुझ्या कल्पनांची सृष्टि
प्रतिभेचा चिद्विलास
भव्य, दिव्य विश्वदृष्टि ॥२॥

जीवभाव, विश्वभाव
घेती लावण्याचें लेणें
सौंदर्याच्या सागरांत
शब्दकळेचें चांदणें ॥३॥

शब्द–अर्थांच्या लहरी
तरल भावांच्या सरी
आकाशांतून वर्षती
मानसाच्या सरोवरीं ॥४॥

सरोवरीं प्रतिबिंब
शब्दगुणी आकाशाचें
तुझ्या लेखीं उमटती
आलेख कल्पाकल्पांचे ॥५॥

भगीरथाची ती गंगा
दिव्य कर्तृत्वाचा स्रोत
तिला ये नवमांगल्य
तुझ्या शब्द-जान्हवींत ॥६॥

पातंजल योगसूत्र
'प्रातिभाद्वा सर्वम्–' गूढ,
गूढ इथे बोले डोले
सारें विश्व हो दिङ्मूढ ॥७॥

दिव्य प्रेय, निःश्रेयस
शोभे शब्दसरितेंत
मर्त्य मानवाहि मिळे
अनुभवाचें अमृत ॥८॥

स्वर्गलोकीचें सौभाग्य
पृथ्वीवरी तूं आणिलें
देवांच्या मानधनाचें
मानवांना दान केलें ॥९॥

परा, पश्यंति, मध्यमा
दिव्य वाणीचे प्रकार
तुझ्या प्रतिभेने केले
वैखरींत ते साकार ॥१०॥

तुझ्या वाणीची किमया
शब्द झाले शिल्पकार
दिव्य त्या निराकाराला
आले अद्भुत आकार ॥११॥

शब्दांना पंख फुटले
सारीं बंधनें गळालीं
दिक्काल–सीमा विरल्या
अनंताला जाग आली ॥१२॥

ज्ञानदेव ज्ञानगंगा
अमृतरसवाहिनी
मानवी पुरुषार्थाची
भावरम्य संजीवनी ॥१३॥

आकाशगंगा-लावण्य
झालें साहित्याचें लेणें
शब्द झाले कल्पतरु
सर्व तृप्तींचें पारणें ॥१४॥

ज्ञानेशा, तुझ्या सर्जना
नाही कशाची तुलना-
प्रतिभेच्या भास्कराला
माझी ही मानवंदना ॥१५॥

★ ★

रिपि रिपि काळा पाऊस

रा. अ. काळेले

रिपिरिपि काळा पाऊस   कालवतो अंधारांत
हळू ओला वाहे वारा   ओलेति झाली रात
किर्र् किर्र् रातकिडा   दर्दुर-रव डरां डरां
जळमोती ओविलेल्या   वळचणी घराघरां

पिकून झडत्या निंबुणीचा   उग्र दर्प गोड कडू
चांदणीसा हलता काजवा   गवतावर लागे चढूं
मासांत मास-श्रावणमास !   वासांत वास जुई वास
श्रावणाच्या जुईमधे   मिसळला तुझा श्वास

या रातीच्या ओच्यामधे   सुवासिक गूढ कांही
माझ्या मनीं सुवास भरे - कांही त्याला नांव नाही !
चिक्कण चिखल चकचकीत   काळा गार तुडवितो
मनावर शितोडाही   हिरवा शार उडवितो !

खुशी खुशी बरसात   चाल तुझी झुलवती
पाणी सपाट्, खाली खळगा - वाट अशी भुलवती !
उमाप वाहे शेत-नाला   रेती-माती काला झाला
चिंचेवरी जाळीदार   पानांचा ढग आला !

धार धार अंधारांत   ओळखीच्या बुजल्या वाटा
अहा ! अंगभर आला   हलव्याचा गोड कांटा !
चिब् चिब् कळीपान   झिमझिम बरसात
केतकीच्या कांतीवरी   नागिणी ग ! टाकी कात !

★ ★

अनुक्रमणिका

वीज

गुणाकर देशपांडे

उमटत जाती पदचिन्हें तीं काळ्या मातीवर
निश्चळ नीरव रात्रीमध्ये ताऱ्यांचा जागर
धूम्रवलयसम क्षितिजरेष ती स्मृतींत, ना सापडें
अखंड फिरती मनीं वर्तुळें सोडवीत साकडे.

शांतच असतो मनांत सागर, येतें वादळ, विरतें
उठती पर्वत, खचती पुन्हा, धरती फिरतच असते
सूर्य कधी ना हातीं येतो, विझुन उजळते वीज
गगन कोसळे, सुंदर परि तें पुन्हा उगवतें बीज.

* *

अठराशें सत्तावन्न

मनोहर वझे

रक्ताला तेव्हा आहुतीचें वेड लागलें होतें;
व शब्दाला शौर्यानें अर्थ दिला होता.
मुक्तीच्या अनावर ओढीनें, हृदयांतून उफाळलेल्या
ज्वालांनी क्षितिजाचे डोळे तेव्हा दिपले होते.
खड्गांच्या तेव्हा खणखणलेल्या प्रचंड आव्हानानें
अंधाराच्या काळजाचे तुकडे तुकडे झाले होते, भीतीनें
कोट्यवधी कंठांतून स्फुरलेल्या रणघोषांच्या विजेनें
अन्यायाचा जीर्ण वृक्ष हादरला होता, मुळासकट
भवितव्यता कुणीतरी कोरली होती, काळाच्या कपाळावर
वज्राच्या हातांनी, द्रष्ट्याच्या प्रज्ञेनें !

* *

गोमुख

भालचंद्र नेमाडे

आहे जागणारी धग
थेंब थेंब आहे जागा
माझ्या उराशीं जपूं दे
माझ्या श्वासांच्या मंत्रांना

गेलें झिजून गोमुख
घेर वाढला व्यथेचा
जखमांची खूण आहे,
आहे उच्छ्वासांना लाही.

शाप बाधेनासा झाला
गेलें झिजून गोमुख
शहामृगाचें धावणें ..
ओझें पाठीवर पंख.

* *

अनुराग / विराग

— कुमार —

अनुराग

सखये !

ये करुनी शृंगार !! ध्रु.

युगायुगांची संगत अपुली
परस्परांना अवचित कळली
चिरविस्मृत ती ओळख पटली
करिशी काय विचार ? १

दीर्घदीर्घतर या विरहाने
व्याकुळ झुरतो तना–मनाने,
कणाकणाने–क्षणाक्षणाने,
उत्तेजित अनिवार ! २

ह्याच मीलनक्षणपूर्तीस्तव
देह मिळाले अपणां मानव !
तोच पुरातन परंतु अभिनव--
ये करण्या अभिसार !!! ३

विराग

प्रमदे !

दे सोडुनि शृंगार ! ध्रु

तेंच तेंच आलिंगन चुंबन,
तें आलंबन, तें उद्दीपन,
रसराजामधि आता राम न--
केवळ कामविकार ! १

भोगाच्या तंद्रींतुन निघतां,
धकाधकीच्या जगांत रिघतां,
विश्व भोवती दु:खित बघतां—
सुख भासे अंगार ! २

पशुवत् कां ह्या सुखभोगास्तव
देह मिळाले अपणां मानव ?
छे, ललने ! छलना ही संपव--
आता शान्ताकार ! ३

★ ★

सोयरा

गंगाधर पानतावणे

तुझ्या घरीं सारें
फिटलें बयाण
चोचींतलें तृण
गणिताचें ।।

मुक्यामुकी झाला
अक्षरांचा तोष
उन्हाची आरास
पसाभर ।।

पसाभर तुझा
धुळीचा पसारा
कणाचा सोयरा
मीहि व्हावें ।।

卐

अनुक्रमणिका

आधुनिक मराठी कवींचें तत्त्वचिंतन

यादव मुकुंद पाठक

आपली जुनी परंपरा महाराष्ट्रांत इंग्रजी राज्य स्थापन झाल्यानंतर खंडित झाल्यासारखी झाली. पूर्वी आपल्या संत आणि पंडित कवींनी संस्कृतांतून स्फूर्ति पावून काव्यरचना केली, पण नव्या भक्तिरसाची जोड देऊन, भक्ति हा आपल्या काव्याचा स्थायीभावच ठेवला. संतांनी अधिकारवाणीने समाजोद्धाराचें कंकण हातीं बांधलें होतें. इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर श्रद्धेचें मूळ वेगळें झालें, मराठी कवींचें स्फूर्तिस्थान इंग्रजी वाङ्मय बनलें, आणि आपल्या काव्यपरंपरेला एक वेगळेंच वळण लागलें. थोर कवींची कविता अल्पशिक्षितांच्या रंजनाकरिताच निर्माण झाली आणि आजहि बहुजन समाजाच्या कळवळ्याने नवकाव्य निर्माण होत असलें तरी या काव्याचे वाचक मात्र अल्पसंख्यांक शिक्षितच आहेत. जे जे कवि म्हणून ख्यातनाम झाले, त्यांनी त्यांनी भक्तिसाधन हा जो जुन्या काव्य-लेखनाचा मुख्य हेतु तो सोडून दिला. इंग्रजी वळणाचें विषयवैचित्र्य त्यांच्या काव्यांत भरपूर आलें, पण ईश्वराचें स्मरण त्यांना वेगळेपणाने झालें. या ईश्वर-विषयक कवितेचें एक छोटेसें नवेंच दालन आधुनिक काव्यांत उघडलें गेलें आहे, त्याच्यावर पाटी लागली 'गूढगुंजन'.

केशवसुतांच्या पूर्वीच्या काळांत विठोबा अण्णा दप्तरदार, भास्कर दामोदर पाळंदे व नारायण धोंडदेव खांडेकर यांनी 'भजनें' आणि 'पदें' पुष्कळ रचलीं आणि तीं त्या काळीं बरींच लोकप्रिय होतीं. त्यांनी आपल्या कवनांत प्रांजलपणें सरळसरळ ईश्वराला आळवलें. नवयुगप्रस्थापक केशवसुतांनी गूढ गुंजनपर तीनच कविता लिहिल्या. 'झपूर्झा', 'कोणीकडून कोणीकडे' आणि 'हरपलें श्रेय'. पैकी 'झपूर्झा' या कवितेंत अध्यात्माचा अगर जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा संबंध नाही. प्रतिभाशक्तीच्या तन्मयतेचें तींत सुंदर वर्णन आहे. 'हरपलें श्रेय' या कवितेंत बालपणींच्या निरागस आनंदाचें आणि जाणत्या वयांतील दुःखदायक विषण्णतेचें वर्णन आहे. 'कोणीकडून कोणीकडे' ही एकच कविता निर्भेळ जीवनविषयक तत्त्वज्ञानाने भरलेली आहे. या कवितेंत आपण कोठून येतों व कोठे जातों याविषयी निवेदन आहे. गीतेंतील 'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्रका परिदेवना' या श्लोकाचाच सूर या गीतांत आहे. आपण कोण, कुठे जातों ही गोष्ट प्रथम आपणास अज्ञात राहते, पण जगांतील अनुभूतींनी आपणास कळतें की जीवन हा प्रकाश नसून

अंधार आहे व मागे आणि पुढे अंधार होता तो खरा उजेड आहे. जिकडून प्रकाश तिकडेच आपलें निजधाम आहे. येथे आपण फक्त ऋण फेडावयास आलों आहोंत.

या कवितेच्या अखेरीस केशवसुतांचा थोडाबहुत अध्यात्मविषयक दृष्टिकोण दिसत असला, तरी एकंदर त्यांचा ओढा अज्ञेयवादाकडेच आहे. त्यांच्या शेवटच्या अभंगांतहि त्यांनी 'भिकार या जगीं। इच्छित न मिळे कांही। म्हणूनि तुझ्या पायीं। भिक्षांदेहि।' असे त्राग्याचेच उद्गार काढले आहेत. 'स्फूर्ति' या कवितेंत तर त्यांनी जोमदार शब्दांत ठासून म्हटलें आहे की 'देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कळवू द्या.' 'प्रतिभा' या कवितेंतहि प्रतिभा हीच देवांची जननी आहे असें त्यांनी सांगितलें आहे. बौद्धिक पायावर उभारलेल्या या गूढगुंजनमंदिरांत निर्मळ ईशश्रद्धेची मूर्ति कशी प्रस्थापित होणार? केशवसुतांची ही ईश्वरविषयक अज्ञेयवादाची परंपरा त्यांच्या संप्रदायांत चालूच राहिली.

केशवसुतांच्या बरोबरीचे टिळक हे श्रद्धाळु होते, भक्ति हा त्यांच्या कवितेचा पाया होता. त्यांच्या 'वनवासी फूल' या काव्यांतील प्रवृत्ति व निवृत्तीचा झगडा पुष्कळांच्या चांगल्या परिचयाचा आहे. पण त्यांची तीनशें अभंगांची 'अभंगावली' आणि टिळक पतिपत्नींनी लिहिलेलें 'ख्रिस्तायन' काव्य कमी वाचनांत आहे. अभंगांजलींत त्यांनी वैराग्य, आयुष्याची क्षणभंगुरता, प्रार्थना, पश्चात्ताप, शरणागति, श्रद्धा आणि आत्मानुभव हे विषय घेतले आहेत व तुकारामाप्रमाणेच हे सर्व अभंग प्रासादिक व प्रेमळ आहेत.

'ख्रिस्तायन' या काव्यांत त्यांनी ख्रिस्तचरित्रकथन अगदी 'हरिविजया' च्या धर्तीवर केलें आहे. तथापि ११ अध्यायच टिळकांनी पूर्ण केले. पुढचे ७५ पर्यंतचे अध्याय लक्ष्मीबाईंनी पूर्ण केले. हें ख्रिस्तचरित्र चांगलें असलें तरी बहुसंख्यांक महाराष्ट्रियांच्या परिपाठांत नाही.

'गोविंदाग्रजां'नी 'मुरली' 'अनामिकाचे अभंग' अशा वरवर भक्तिपर कविता लिहिल्या असल्या तरी तेहि भाविक दिसत नाहीत. 'वैराग्याच्या सोप्या गोष्टी। राम रडे परि सीतेसाठी! ब्रह्मा लागे मुलिच्या पाठीं! भोळा शंकर स्त्रीअंकावर, गणेश राखीदार!' असे उद्गार काढणारे 'गोविंदाग्रज' भाविक नव्हते, बौद्धिक पायावर त्यांच्या कवितेची उभारणी होती, असेंच कोणीहि म्हणेल. यांच्या 'फुटक्या तपेलीं'तहि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा फुटकेपणाच जास्त आहे असेंच दिसून येतें.

रविंद्रनाथ टागोरांच्या गीतांजलीचा परिणाम अनेक कवींवर झाला. त्यावेळच्या 'माधवानुजां'नी 'गीतांजलीं'तील कांही गीतांचीं भाषांतरें केलीं आहेत. पण त्यांतून मूळची उत्कटता प्रकट झाली नाही,

अनुक्रमणिका

महाराष्ट्राच्या लाडक्या बालकवींनी केशवसुतांच्या धर्तीवर 'शून्य' 'मी' 'दिव्य आणि प्रीति' 'वनमाला' इत्यादि कविता लिहिल्या आहेत. पण बाल-कवींच्या स्वप्नाळु वृत्तींत गंभीर व गहन तत्त्वांचा शोध लावण्याची ताकद कशी असणार ? तरी बालकवींच्या साध्यामोळया वाणींतून एकादेवेळीं एकादा साधा तत्त्वविचार सहज झरून जातो. मासल्यादाखल 'अनंत' या कवितेंतील या ओळी पहा.—

अनंत सारें विश्व, जाहलें अनंतांत या लीन;
क्षुद्र मानवा सांग कशाचा बाळगसी अभिमान.
तव वैभव हें, तुझीं घरें हीं, हे अत्युच्च महाल
जातिल का गगनास भेदुनि ? अनंत का होतील ?
तुझ्या कीर्तिचे माप गडचा ह्या काळाला मोजील ?
ज्ञान तुझें तूं म्हणसी जाईल, कोठवरी जाईल ?
'मी' 'माझें' या वृथा जल्पना, तूं कोणाचा कोण ?
कितेक गेले मी मी म्हणतां या चक्रीं चिरडून.

केशवसुतांच्या परंपरेंतील रेंदाळकरांनीहि थोडेसें तात्त्विक लेखन केलें आहे. त्यांचें 'अजुनि चालतोचि वाट' हें गीत विख्यात आहे.

"अजुनि चालतोचि वाट माळ हा सरेना,
विश्रांति स्थळ केंव्हा यायचें कळेना.
हेंच खास माझें घर म्हणुनि श्रीण केला,
उमगुनि मग चूक किती अश्रुसेक केला."

इत्यादि मानवी क्षणभंगुर जीवनासंबंधीच्या ओळी आर्ततेनें ओतप्रोत भरल्या आहेत.

Bee कवींनी लिहिलेल्या गूढगुंजनपर गीतांत केशवसुत–गोविंदाग्रजांचीच परंपरा पुढे चालवली आहे. त्यांच्या 'वेडगाणें' 'चांफा' व 'पिंगा' या तीन प्रसिद्ध कविता गूढगुंजनपर आहेत. पैकी पहिलीचा विषय प्रतिभा व तिचें कार्य हा आहे. दुसरींत विशुद्ध अशी बाह्य सुखाचे पलीकडील व्यंजना आहे. 'पिंगा' या तिसऱ्या कवितेंत प्रतिभेप्रमाणेच तत्त्वज्ञानांतील 'प्रकृती'चेंहि पुसट दर्शन घडतें. 'पूर्ण की अपूर्ण' या कवितेंत बी म्हणतात—

व्यष्टीची परिपूर्णता, मरण तें, थांबे विकासोन्नति
सृष्टीचेंहि तसेंच, भूतविलय प्रारंभ तो बोलती,
हीं राहोत ! अगाध सृष्टिरचना संपेल त्याची जर
जाणा निश्चित की मरेल असला संपूर्ण तो ईश्वर !

या केशवसुतांच्या परंपरेंत अगर क्रांतिकालांत ही नवी कविता परमेश्वराकडे

अशा रीतीनें पाहात होती. याच कालांत एक जुनी परंपरा चालू होती. तींत गोविंद वासुदेव कानिटकरांच्या 'संमोहलहरीं'त परमेश्वरी लीलेचें वर्णन आहे.

'असा सतत घालि जो विमल सृष्टिच्या गोंधळा
अगा भयद गोंधळचा ! नुमजति तुझ्या त्या कळा
प्रयोजनविहीन कीं विविध खेळ हे चालती ?
असे सकळ भास वा म्हणुनि गोंधळे मन्मती ?

अशी 'संमोहलहरीं'त संशयात्म्याचीच भूमिका आहे. कधी वीज, कधी आगी, कधी अवर्षण यांनी चाललेला मानवाचा संहार; स्वार्थसाधन, परस्वापहरण, अन्याय यांचें राज्य; देव सदय आहे तर अनेक लोकांना सदैव सुखांत कां ठेवत नाही, त्यांना यातना कां सहन कराव्या लागतात, अशा गोंधळलेल्या मन:स्थितींत कवि परमेश्वरास शरण जातो.

यानंतर चंद्रशेखरांनी 'गोदागौरव' या काव्यांत आपली श्रद्धाळू वृत्ति कायम ठेऊन माधुर्य आणि गेयता यांची अलौकिक प्रचीति मराठी वाचकांना आणून दिली. पण ईश्वरनिष्ठा व तत्त्वप्राचुर्य लोकप्रिय करण्याचें सारें श्रेय आधुनिक मराठी कवितेंत खरोखर कविवर्य तांब्यांनाच द्यावें लागेल. जीवशिव-संबंधावर काव्यलेखन करतांना तांब्यांनी बहार केली. त्यांच्या 'नववधू'चें दर्शन घेण्याचा मोह आवरत नाही.

'नववधू प्रिया मी बावरतें !
लाजतें, पुढे सरतें, फिरतें !
कळे मला तूं प्राणसखा जरि,
कळे तूंच आधार सुखा जरि,
तुजवांचुनि संसार फुका जरि,
मन जवळ यावया गांगरतें !
···चित्र तुझें घेउनि हृदयावरि
हारतुरे घालिते परोपरि
छायेवर संतोष खुळी करि
तूं बोलवतां परि थरथरतें ! ...'

वगैरे जीवशिवाच्या ऐक्याची तळमळ, उत्कंठा, भीति किती उत्कटतेने प्रतीत झाली आहे. स्त्रीपुरुषविषयक रूपकानें त्यांनी हीं गीतें रचल्यामुळे मोठीं रसाळ व लोकप्रिय झालीं आहेत. कधी नववधू व पति, कधी चेटूक करणारा व जारिण, कधी स्त्री आणि परपुरुष, अशा निरनिराळ्या रूपकांनी त्यांनी हा जीवशिवसंबंध आपल्या गेय नाट्यगीतांनी ध्वनित केला आहे. त्यांची 'मरणांत खरोखर जग जगतें' ही कविताहि तात्त्विक असून मोठी प्रभावी ठरली.

'मरणांत खरोखर जग जगतें !
अधीं मरण, अमरपण ये मग तें !
अनंत मरणें आधि मरावीं
स्वातंत्र्याची का आस धरावी
मारिल मरणचि मरणाभावी
मग चिरंजीवपण ये बघ तें !
मरणांत खरोखर जग जगतें.'

या कवितेंतील त्यांचा चैतन्यदायक संदेश आणि मृत्यूंची पर्वा न करितां अनेक हुतात्म्यांनी मिळवून दिलेलें भारताचें स्वातंत्र्य, असले विचार कवीच्या किमयेने सहजच मनांत येतात. त्यांच्या विख्यात 'रुद्रास आवाहन' या कवितेंतील प्रार्थना आज रुद्राने ऐकलेली दिसते—

'पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं
ओढ हत्तीवरूनि मत्त नृप खालती
मुकुट रंकासि दे, करटि भूपांप्रती !
झाड खट्खट तुझें खड्ग क्षुद्रा ! '

ही त्यांची इच्छा आज फलद्रूप झाली आहे. त्यांच्या प्रार्थनेंत किती बल होतें याची प्रचीति या गीताने आली. त्यांची स्वोद्धाराची आर्तता एका 'विहंगमां'त प्रसिद्ध झालेल्या गीतांत फार परिणामकारकतेने प्रकट झाली आहे.

'निशिदिनिं तुज हरि ध्याइन का मी ?
विकसित कमलासम फुललें मम
सुमन तुझ्यापदिं वाहिन का मी ?
जनिं, वनिं, गगनीं–त्रिभुवनिं एका
अनेक रूपीं पाहिन का मी ?
सुतदारा तव सत्ता समजुनि
प्रेमी काया झिजविन का मी ?
सप्तसुरलयीं स्वरा स्वयं तुज
उन्मादीं कधी गाइन का मी ?
विविध कवनिं मम अविविध रसमय
लाहुनि तुज कधिं नाचिन का मी ?
प्रेषणहेतू तव संपादुनि
कृतार्थ तवपदिं येईन का मी ?

या शेवटच्या निर्देशावरून प्रेषिताची भूमिका तांब्यांना घ्यावयाची होती हें स्पष्ट आहे. केशवसुत इतर बाबतींत श्रेष्ठ असतील, पण ईश्वरविषयक कवितांत

तांब्यांची बरोबरी त्यांना करतां येणार नाही. कारण तांब्यांच्या ठिकाणीं आर्तता होती, श्रद्धा होती. ते अज्ञेयवादी नव्हते. बौद्धिकतेपेक्षा भाविकतेचा परिणाम काव्यप्रांतांत विशेष होतो हें तांब्यांच्या काव्यरचनेनें सिद्ध केलें. त्यांनी जुनें होतें त्याचेंच सोनें केलें व त्याचीच अभिनव सुंदर घडण केली. म्हणूनच त्यांची कविता पूर्ण समाधानी व प्रसन्न राहिली.

यानंतर रविकिरणमंडळाच्या कवींनी पुन्हा ईश्वरावर विरोध भक्तीच केली. प्रणय, नैराश्य आदींतच त्यांची कविता घोंटाळत राहिली. 'पुटकळ अभंगां'त माधव ज्यूलियन भक्ताबद्दल स्पष्टच म्हणतात—

'अफूच्या गुंगींत विस्मृतीचें सुख, तयाचें कौतुक मी न करीं,
तूं पण सांभाळ, वेडयांची या सेवा विपरीत देवा फळायची'

आणखी तेच 'देव्हारे' या कवितेंत स्पष्टच बजावतात,

'देवांना भंगती होती ते समर्थ,
दीनतेची शर्थ भगतांच्या
देवांवरी भार कासया टाकावा ?
स्वतःच आखावा मार्ग आता'...

यशवन्तांनीहि प्रभूस वरदान मागितलें आहे. दीनदुबळयांची सेवा घडूं दे हें त्यांचें मागणें चांगलें आहे, पण शब्दांत श्रद्धा नाही, जिव्हाळा नाही. गिरीशांनी एका कन्नड कवींच्या गीताचा अनुवाद करतांना देऊळ बांधण्यापेक्षा गरिबांस घरें द्या असें म्हटलें आहे. "भक्तिनेंच काय अशा पुण्य पडे गाठीं ?" अशी कवीची पृच्छा आहे.

गूढवादी कवींची परंपरा महाराष्ट्रांत अखंड राहिली. रविकिरणमंडळाच्या काळांतच वा. भा. पाठक यांनी आपल्या 'ओढणीं'त सुमारें १५० अभंग लिहिले. ईश्वराचा साधाभोळा धांवा करणारे व अलंकृत भाषेंत साधीं तत्त्वें ग्रथित करणारे हे अभंग प्रेमळ आहेत.

पण हा गूढगुंजनाचा प्रवाह वेगवान नि विशाल केला अनिल, गु. ह. देशपांडे, वा. ना. देशपांडे या विदर्भातील कवींनी. अनिलांनी गूढगुंजनाला प्रतीति-धर्मच म्हटलें आहे. 'फुलवातीं'त त्यांच्या प्रेयसीच्या रूपानें त्यांना अमूर्ताची, अनंताची प्रचीति झाली आहे.

दाविला तुवां जीवास
प्रीतिचा ठाव
उपजला म्हणुनि हृदयांत भक्तिभाव
अणुरेणु येवढा बुझा
अंश देहांत
उपजला तोंच प्रकटलें पुढे साक्षात

असा 'साक्षात्कार' या कवितेंतील भाव त्यांच्या सर्वच प्रेमगीतांत आहे. अलीकडे त्यांनी 'प्रक्षोभ' हा एक नवा रस मानल्यानंतर, 'पेर्ते व्हा' या संग्रहांत देवाचें 'दर्शन' त्यांनी अधिकारवाणीनें मानवांना बरोबरीच्या नात्यानें घडविलें आहे.

तुझ्या दर्शनाला आज आहे येत
वाजत गाजत असा मिरवीत
...अशी ही वरात पातली मंदिरा
तूंच ये सामोरा सोडूनी देव्हारा !

ग. ह. देशपांड्यांना निसर्गाच्या भव्य प्रतीकांतून परमेश्वराचा साक्षात्कार झाला आहे.

ध्रुवावरी दोन्ही
दोऱ्या अयनांच्या
बांधोनी; काळाचा
केला दोला !

असा त्यांच्या 'तान्ह्या बाळा'चा भव्य पाळणा आहे.

अष्टदिशा–स्तंभावरी
अवकाशाची इमारत
निरालंब राहे उभी
निराकार भवती भिंत

असे त्यांनी 'वाऱ्याचें भारें' बांधलें आहे.

तुम्ही दान द्यावे चोखट
पंढरीपेठ । भूमिवैकुंठ । मुख्य जागा
दक्षिणे वाहे चंद्रभागा । मोठी मौज

असा त्यांच्या हृदयांत भक्तिभावाचा पूर आहे.

वा. ना. देशपांडे हे पूजाभाव किंवा धर्मश्रद्धा या जीवनमूल्यापेक्षा 'सौंदर्य' हें जीवनमूल्यच परमेश्वराचें प्रतीक मानतात आणि त्याचेच 'प्रतिध्वनि' आपल्या काव्यांत उठवतात.

नवकवींतील वयानें सर्वांत लहान असलेले मंगेश पाडगांवकर—यांनाहि असाच सौंदर्यसाक्षात्कार होतो.

अणुं अणूंत परमाणूंत हवेच्या आहेस तूं
रोमारोमांत भूमिच्या कोंबाकोंबात बीजाच्या आहेस तूं
तुझ्या स्वागतार्थ पण जागें हवें माझें मन–जागें हवें माझें मन

असें त्यांनी 'आज जागें आहे माझें मन' या कवितेंत म्हटलें आहे.

अनिलांसारखेच जे आजचे मानवतावादी कवि आहेत त्यांना मानवतेंतच देव दिसतो. मानवांनी मानलेला देव त्यांना फसव्या वाटतो. मर्ढेकर म्हणतात—

राव सांगता देव कुणाला
शहाजोग जो शहामृगासम—

वादळांत शहामृग जसा डोकें खुपसून बसतो तसाच मानवांच्या संकटकाळीं हा फसव्या देव लपून बसतो असें ते म्हणतात नि रुद्राला आळवतात की हे हाडाचे सापळे नाहीसे कर.

पु. शि. रेगे यांची 'त्रिधा-राधा' ही कविता इंग्रजींत रूपांतरित होऊन अमेरिकेच्या विख्यात Atlantic Monthly मध्ये मागेच प्रसिद्ध झालेली आहे. हा मान महाराष्ट्राच्या प्रतीतिवादी कवितेलाच मिळाला हें सुचिन्ह आहे. त्यांना निसर्गाच्या भव्य प्रतीकांतच ईश्वराचें दर्शन झालें आहे.

विंदा करंदीकर, कांत, पोवळे हे धर्मश्रद्धेवर अथवा त्याच्या विकृत अवस्थेवर चिडले आहेत. मूर्तिभंजन हा त्यांचा धर्म झाला आहे, कारण त्यांना अंधश्रद्धा नको आहे, मानवांचें हित हवें आहे.

आजहि धर्माधिकारी आणि वहिणाबाई जुनी भजन-पदांची भक्तिपरंपरा चालवीत आहेतच.

एकंदरींत या सर्व प्रतीतिधर्मीयांना जगांतील विविध क्षणभंगुर व विनाशी रूपांतून एक चिरंतन, अव्यक्त, अविनाशी तत्त्व दिसत असतें. आधुनिक मराठी कवितेंत या प्रतीतिधर्माचा प्रवाह निरनिराळ्या रूपानें अखंड वाहत आहे व मानव आहे तोंपर्यंत तो वाहत राहणार.

卐

साहित्य, सर्जनशीलता व रसग्रहण

पु. य. देशपांडे

हा निबंध नाही. हें निवेदन आहे. हा साचेबंद प्रबंध नाही. हा प्रवाह आहे. यांत मताचा आग्रह नाही. यांत सत्याचा शोध आहे. यांत आव्हान नाही. यांत आवाहन आहे. यांत हितोपदेश नाही. यांत हितगुज आहे. यांत केवळ परस्पर-भावनाची अपेक्षा आहे.

साहित्य–सर्जनशीलता–रसग्रहण हे शब्द नित्य परिचयाचे आहेत. पण अतिपरिचयामुळे अवज्ञा होत असते. तसेंच या शब्दांच्या बाबतींत घडून आलें आहे. अनेक नित्य वापरण्यांत येणाऱ्या शब्दांच्या बाबतींत हें असेंच घडून आलें आहे. नाणें वापरून वापरून गुळगुळीत झालें की तें चालेनासें होतें. त्याला किंमत उरत नाही. तसेंच अनेक शब्दांच्या बाबतींतहि घडन आलें आहे.

गुळगुळीत झालेलीं नाणीं भट्टींत टाकून पुन्हा नव्या करकरीत शिक्यासहित तयार झाल्यास त्यांना त्यांवर दर्शविलेलें मोल प्राप्त होतें. शब्दांच्या बाबतींतहि हें असेंच करणें आवश्यक झालें आहे. अतिपरिचयामुळे ज्यांची अवज्ञा झालेली आहे असे सारे शब्द अनुभवाच्या भट्टींत पुनःपुन्हा, वारंवार टाकले पाहिजेत आणि त्यांच्या यथार्थ मोलाचें पुनःपुन्हा दर्शन घेतलें पाहिजे. असें केलें तरच शब्द, अर्थ व अनुभव यांच्यांत आशयपूर्ण संगति निर्माण होईल.

सर्जनशील साहित्य

साहित्य म्हणजेच सर्जनशील साहित्य. इतर प्रकारच्या साहित्याला त्यांच्यांतील विशेषानुसार वेगवेगळीं नांवें असतात. तत्त्वज्ञान, विज्ञान, इतिहास, इत्यादि प्रकार आपल्याला माहित आहेत. यांनाहि साहित्य या शब्दाची उपाधि लावण्यांत येतें. पण हा गौण शब्दप्रयोग आहे. पूजेच्या उपकरणांनाहि 'पूजेचें साहित्य' म्हणण्याचा प्रघात आहे. पण यांत साहित्य हा शब्द अगदी वेगळ्याच अर्थानें वापरला जातो. 'वाङ्मयीन साहित्य' या अर्थानेंच साहित्य म्हणजे काय, हें आपल्याला पाहावयाचें आहे. हें साहित्य प्रतिभेचें अपत्य असतें. म्हणून साहित्य म्हणजे सर्जनशील साहित्य, असाच साहित्य या शब्दाचा वस्तुतः अर्थ आहे.

पण अलिकडे सर्जनशीलता म्हणजे काय, हेंच कुणाला कळेनासें झालें आहे. तरीपण सुदैवानें 'साहित्य' या शब्दाची अतिपरिचयामुळे जशी अवज्ञा झाली

आहे, तसें 'सर्जनशीलता' या शब्दाच्या बाबतींत घडून आलेलें नाही, असें वाटतें. कारण उघड आहे. 'साहित्य' हा शब्द जसा चटकन कळतो, तसा 'सर्जनशीलता' हा शब्द चटकन कळत नाही. उलट, 'हें काय गौडबंगाल आहे ?' असाच प्रश्न, हा शब्द कानीं पडतांच अनेकांच्या मनांत उभा रहातो. आणि या प्रश्नाचें उत्तर शोधण्याची व तें मनांत चांगलें ठसविण्याची यातायात सहसा कोणीहि करीत नाही.

वस्तुतः 'साहित्य' हा शब्द चटकन कळतो, हें म्हणणेंहि बरोबर नाही. कारण 'साहित्य' म्हणजेच सर्जनशील साहित्य आणि म्हणून साहित्य कळलें तर सर्जनशीलताहि कळलीच पाहिजे. पण असें होतांना दिसत नाही. म्हणूनच याचा परिणाम असा झाला आहे की, साहित्य म्हणजे काय, हेंच आता नीटसें कळेनासें झालें आहे. कथा, कादंबरी, काव्य, नाटच, अशा नांवाखाली जें प्रकाशित होतें तें साहित्य, अशी एक स्थूल व्याख्या 'साहित्य' या शब्दानें सूचित होऊं लागली आहे. म्हणजे नांवाला व बाह्य रूपालाच अमाप महत्त्व आलें आहे. आणि ज्याचें नांव व ज्याचें रूप तें मात्र जवळ जवळ विस्मृत होऊन बसलें आहे. हें विस्मृतींत जें गडप होऊन बसलें आहे तेंच, साहित्याचा आंतरिक प्राण असलेलें, सर्जनशीलत्व.

स्व–रूप आणि नाम–रूपें

समग्र विश्व हें नामरूपात्मक भासतें. म्हणजे जें जें भासतें त्याला नाम व रूप आपण बहाल करतों. ज्याची, ज्या चित्-शक्तीचीं हीं नाम–रूपें आहेत, त्या शक्तीचें स्व–रूप–दर्शन आपल्याला होत नाही. हें स्व–रूप–दर्शन म्हणजेच साक्षात्कार, असें वेदान्त–दर्शन सांगतें. साहित्याच्या बाबतींतहि हाच प्रकार असावा, असें वाटतें. काव्य, कथा, कादंबरी, नाटच, इत्यादि नाम–रूपांनी नटलेल्या साहित्याला प्रेरक होणारी शक्ति म्हणजे प्रतिभा. प्रतिभेचा स्पर्श असेल, तरच तें सर्जनशील साहित्य होतें. हा स्पर्श नसेल तर तें खऱ्या अर्थानें साहित्य होणारच नाही. साहित्य–प्रकारांत रूढ झालेल्या नाम–रूपांचा केवळ शिक्का मारल्यानें सर्जनशील साहित्य घडविलें जाऊं शकत नाही. धातूंच्या चलनी नाण्यांवर यंत्रानें शिक्का मारतां येतो. पण अस्सल साहित्याच्या नाण्यांवर कृत्रिम तऱ्हेनें शिक्का मारतां येत नाही. प्रतिभेचा स्वयंस्फूर्त स्पर्श, हीच:तो शिक्का मारणारी शक्ति असते.

सर्जनशीलत्व हें प्रतिभेचें अपत्य आहे, म्हणजे काय ? या प्रश्नाच्या यथार्थ उत्तरावरच खऱ्या साहित्याचें स्व–रूपदर्शन अवलंबून आहे. हें उत्तर दोन प्रकारांनी द्यावें लागतें. एक अभावरूप प्रकार व दुसरा भावरूप प्रकार. अभावरूप प्रकार म्हणजे, सर्जनशील साहित्य म्हणजे काय नव्हे, हें पाहणें. रंग, रूप, आकार,

विचार, भावना, कल्पना, हे सर्व साहित्यांत असतात. पण हे सर्व असले म्हणजे त्या साहित्याला प्रतिभेचा स्पर्श झालेला असलाच पाहिजे, असें म्हणतां येत नाही. हें सर्व असूनहि तें साहित्य प्रतिभाशून्य, सर्जनशीलत्वशून्य असणें संभवनीय आहे. प्रतिभा व तज्जन्य सर्जनशीलता हा अंतःकरणाचा धर्म आहे. अंतःकरणांत रंग, रूप, आकार, विचार, भावना, कल्पना यांचें थैमान सतत चाललेलें असतें. हें थैमान म्हणजे प्रतिभा नव्हे. उलट कोणत्याना कोणत्या अत्यंत उत्कट अशा अनुभवाच्या प्रभावामुळें हें थैमान पूर्णपणे स्तब्ध होणें आणि या स्तब्धतेच्या शून्यवत् अवस्थेंतून, कसलाहि प्रयत्न न करतां, कांही तरी स्वयंभूपणें स्फुरणें व साकारणें, हीच प्रतिभाजन्य सर्जनशीलतेची प्रक्रिया आहे. या प्रकियेंतून जें प्रकट होतें त्यालाहि रंग, रूप, आकार, भावना, विचार, कल्पना— यांचें लेणें चढतें. पण हें लेणें प्रतिभेच्या आंतरिक स्पर्शानें प्रकाशित झालेलें असतें. अशीं हीं प्रतिभा–प्रकाशाचीं पाखरें कलात्मक साहित्याच्या रूपानें उडूं लागलेलीं दिसतांच, स्थूल दृष्टीला तीं सामान्य पाखरांसारखींच वाटतात. पण सूक्ष्म दृष्टीला त्यांच्या फडफडींतून प्रकाशाचें चांदणें स्रवत असल्याचें दिसून येतें !

साहित्य–सरिता आणि गंगौघ

म्हणजे काय ? तर रंग, रूप, आकार, भावना, विचार, कल्पना यांच्या वाटेल त्या प्रकारच्या प्रबंधाला साहित्य म्हणतां येत नाही. हा प्रबंध, ही रचना आंतरिक प्रातिभ–आशयानें घडविली गेली असली, तरच तिला सर्जनशील साहित्य म्हणतां येतें. रंग, रूप, आकार, भावना, विचार, कल्पना, यांना बरोबर घेऊनच प्रतिभेची सरिता प्रकटपणें प्रवाहित होते. हिमालयांतून उगम पावलेला गंगौघ कड्यावरून उड्या मारीत मारीत, पर्वत व भूमीचें उच्च–नीचत्व यांच्या प्रतिबंधांतून मार्ग काढीत काढीत, सपाट जमिनीवर येतो व शांत, संथपणें वाहूं लागतो; तोच प्रकार प्रातिभ–सरितेचाहि असतो. नदीच्या वळणांना जसें पूर्वनिश्चित असें नियोजन नसतें, तद्वत् प्रातिभ–सरितेलाहि पूर्वनिश्चित नियोजन नसतें. पूर्वनिश्चित नियोजनानुसार सामान्य बुद्धीच्या जोरावर जें जें तयार केलें जातें, तें तें प्रातिभ नसतें, म्हणजेच तें सर्जनशील साहित्य नसतें; मग हें असें साहित्य कितीहि आकर्षक व रंजन करणारें असो. ही प्रतिभावंतांनी निर्माण केलेल्या अस्सल साहित्याची केवळ नक्कल असते. आणि नकली नाणें पुष्कळदा अस्सल नाण्याला चलनांतून बाहेर घालवून देतें, तद्वत् नकली साहित्य अस्सल प्रातिभ-साहित्याला साहित्यक्षेत्रांतून हद्दपार करीत असतें. याचा अर्थ असा नव्हे, की, जें जें असें हद्दपार झालेलें असतें तें तें अस्सल साहित्य. गुणशून्य, प्रतिभाशून्य साहित्यहि हद्दपार केलें जात असतें.

अनुक्रमणिका

रसग्रहणाचें सार

पण मग अस्सल साहित्याची ओळख पटवून घेण्याचा मार्ग कोणता ? या प्रश्नाच्या उत्तरांतच रसग्रहणाचें सार साठलें आहे. रंग, रूप, आकार, भावना, विचार, कल्पना यांचे वासनाजन्य आलेख मनांत नित्य थैमान घालीतच असतात. या थैमानाला चुचकारणारें, आंजार–गोंजारणारें, क्षणकाल त्याचा विसर पाडून वासनातृप्तीचा नकली आस्वाद देणारें अथवा अन्य तऱ्हेने केवळ उथळ रंजन व मनोविनोदन करणारें असें जें जें असतें तें सर्जनशील साहित्य नसतें. कारण हें थैमान आपल्या नित्य परिचयाचें असतें व त्यांतून प्रातिभ निर्मितीचा आविष्कार झाल्याचें आपल्या कधीहि अनुभवास आलेलें नसतें. एवढेंच नव्हे, तर निसर्गजन्य थैमानाचें सातत्य हें सर्जनशीलतेला प्रतिबंधक व मारक ठरत असतें. उलट, अंतःकरणांतील हें चिरपरिचित थैमान कोणत्या ना कोणत्या अत्युत्कट अनुभवाच्या प्रभावामुळे स्तब्ध व निःशब्द झाल्याचें जें कधी कधी प्रत्ययास येतें, पण त्या शून्यवत् स्तब्धतेच्या गाभ्यांत काय साठलें आहे, याची मात्र प्रतीति आपल्याला येत नाही, अशा प्रकारचा आपला अर्थगर्भ पण स्पष्ट–प्रत्ययशून्य जो अनुभव असतो, त्याला जागविणारें, प्रकाशित करणारें जें साहित्य तेंच सर्जनशील साहित्य.

सर्जनशीलतेची प्रक्रिया

याचा अर्थ असा की, सर्जनशील साहित्यनिर्मितीला जी प्रक्रिया कारणीभूत झालेली असते तीच प्रक्रिया रसग्रहणाच्याहि मुळाशीं असते. या प्रक्रियेचा अनुभव ज्यांना कधीच आलेला नसतो त्यांना सर्जनशील साहित्याचें यथार्थ व पुरेपूर रसग्रहण करतां येणार नाही. पण या प्रक्रियेचा अनुभव हा अपवादभूत स्वरूपाचा असतो, असें मात्र नाही. तो सर्वांना येऊं शकतो. येऊन गेल्यावर, त्याचा स्पष्ट बोध न झाल्यामुळे, तो विस्मृतीच्या अडगळींत धूळ खात पडलेला असतो. आणि तो अनुभव पूर्वी कधी आलेलाच नसतो असें मानलें, तरी तो केव्हाहि येऊं शकतो. अगदी आता, या क्षणाला येऊं शकतो. आपल्या अंतःकरणांत नित्य चालणारें रंग–रूप–आकार–भावना–विचार–कल्पना यांचें निसर्गजन्य थैमान हें गोंधळाचें आहे, व्यर्थ आहे, अर्थशून्य आहे अशी जाणीव करून घेतांच, हें थैमान स्तब्ध झाल्याचा अनुभव आपल्याला येऊं शकतो. या थैमानाने उत्पन्न केलेले सर्व पूर्वग्रह त्या नव्या जाणिवेने पुसून टाकून, अलिप्त, अविवश सावधानतेने आपण सर्जनशील साहित्य पाहूं लागलों, तर त्याचा प्रातिभ–प्रभाव आपल्याला जाणवल्याशिवाय राहणार नाही. रसग्रहणाचें सार या अशा प्रकारच्या पाहण्यांत वाचण्यांत, ऐकण्यांत साठलेलें असतें.

साहित्य–समीक्षा

अशा प्रकारचें रसग्रहण ज्याला करतां येतें अथवा ज्याच्याकडून सहजरीत्या केलें जातें, त्यालाच साहित्यसमीक्षकाचा अधिकार प्राप्त होऊं शकतो. नाहीतर यापेक्षा अन्य रीतीनें केलेली साहित्यसमीक्षा ही वैयक्तिक आवडी–नावडीने, पूर्वनिश्चित मताभिमानानें, पूर्वग्रहाच्या दुराग्रही आकसाने आमूलाग्र दूषित झालेली असते. ही दूषित साहित्य–समीक्षा खऱ्या अर्थानें साहित्य–समीक्षा या नामाभिधानास पात्रच ठरूं शकत नाही. पण खोटीं नाणीं जशीं अधिक चालतात, व खऱ्या नाण्यांना चलनांतून घालवून देतात, तोच प्रकार साहित्य–समीक्षेच्याहि बाबतींत बऱ्याच प्रमाणांत रूढ झाल्यासारखा दिसतो.

जें रूढ होऊन बसतें त्याला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होत असते. आणि ही प्रतिष्ठा रसग्रहणाला व साहित्य–समीक्षेला प्रतिबंधक ठरत असते. 'तद्–वत्ता वुद्धिप्रति तद्–अभाववति बुद्धिः प्रतिबंधिका '—असा वैदिक न्यायशास्त्राचा एक सिद्धांत आहे. उदाहरणार्थ, माझ्या वुद्धीने मार्क्सवाद हा सामाजिक तत्त्वज्ञाना-वरील व समाज–क्रांतीच्या प्रक्रियेवरील अखेरचा शब्द आहे, असा ठाम निश्चय केलेला असल्यास मला मार्क्सवादाशीं विसंगत व त्याला विरोधक असें जें जें आढळेल, तें वस्तुतः कितीहि अर्थपूर्ण असलें, तरी तें मी ग्रहणच करूं शकणार नाही. कारण, 'मार्क्सवादी वुद्धि प्रति तद्–अभाववति बुद्धिः प्रतिवंधिका ', अशी माझी अवस्था झालेली असते. मार्क्सवादाला सत्य मानून बसल्यामुळे, वस्तुतः जें सत्य असतें त्याच्या ग्रहणाचे सर्व दरवाजे मी आपल्या मनानेच बंद करून टाकलेले असतात. म्हणून या वादाशीं सुसंगत व त्याचाच परिपोष करणारें जें साहित्य तेंच मला पुरोगामी व प्रगतिशील साहित्य वाटूं लागतें आणि इतर सर्व साहित्य प्रकार मला प्रतिगामी, क्रांतिविरोधी अतएव अर्थशून्य, टाकाऊ व नेस्तनाबूत करून टाकण्याच्याच लायकीचे वाटतात.

ही अशी पूर्वग्रहदूषित वुद्धि कोणत्याहि अस्सल साहित्याचें रसग्रहण कर-ण्यास सर्वथैव अपात्र असते. पूर्वग्रह, पूर्वनिश्चित मतें, जोरदार आवडी–निवडी, परप्रत्ययनेय वृत्ति, हे सर्व साहित्य–निर्मितीचे, रसग्रहणाचे व साहित्य–समीक्षेचे महा भयंकर असे शत्रू होत. मग हे शत्रु मार्क्सवादाने निर्माण केलेले असोत अथवा अन्य कोणत्याहि जुन्या वा नव्या वादाने निर्माण केलेले असोत. वादनिष्ठ आग्रही बुद्धि ही साहित्य–निर्मितीला, त्याच्या रसग्रहणाला व यथार्थ समीक्षेला प्रतिबंधकच होत राहणें अपरिहार्य आहे.

प्रकृति–प्रसव आणि प्रतिप्रसव

सारांश, स्वभावतः, निसर्गतः, सवयीच्या प्रभावामुळे मनांत साकारणारे रंग–रूप–आकार–भावना–विचार–कल्पनांचे जे आलेख त्यांच्या पूर्ण आहारीं

गेलेल्यांना साहित्यनिर्मितिहि करतां येणें शक्य नाही व त्याचप्रमाणे रसग्रहण व साहित्यसमीक्षाहि करतां येणार नाही. ही निसर्ग–बद्धता साहित्याला सर्वस्वी प्रतिबंधक आहे. उलट, निसर्गजन्य वृत्तिप्रवाह स्तब्ध व निःशब्द करून टाकणारे जे अत्युत्कट अनुभव असतात तेच एक प्रकारच्या मूलगामी स्वाभाविक स्तब्धतेंतून निःशब्दतेंतून, वृत्तिशून्यतेंतून सर्जनशील साहित्याचीं कारंजीं उडविण्यास समर्थ ठरत असतात. निसर्गजन्य वृत्तींचें थैमान हा **प्रकृति–प्रसव**, तर वृत्ति–स्तब्धता, निःशब्दता यांच्या गर्भातून स्वयंस्फूर्तीनें जें साकारलें जातें, तो **प्रति-प्रसव**. सर्जनशील साहित्य हें असें प्रति–प्रसवात्मक असतें. आणि त्याचें रसग्रहण व त्याची यथार्थ समीक्षा ही प्रतिप्रसवात्मक वृत्तीच्या अनुभवाशिवाय अशक्य आहे. या सत्याची जाणीव ज्या प्रमाणांत कोणत्याहि समाजांत असते त्या प्रमाणांतच त्या समाजांतील साहित्य–कलानिर्मितीला उत्कर्षाचें वा अपकर्षाचें रूप प्राप्त होतें आणि त्या समाजाच्या संस्कृतीचें उन्नयन वा अधःपतन होत राहतें.

ही प्रतिप्रसवाची प्रक्रियाच प्रकर्षाप्रत गेली म्हणजे 'ऋतंभरा प्रज्ञा' आकारास आणीत असते. आणि ही प्रज्ञाच कैवल्याचा साक्षात्कार घडवून देण्यास समर्थ ठरत असते. मग हें कैवल्य योगविद्याप्रणीत असो, अध्यात्मविद्याप्रणीत असो वा सरस्वतीच्या आराधनेंतून विकसित झालेलें असो. या कैवल्याचें दर्शन हाच परमपुरुषार्थ.

卐

भीष्म विवाहित की, अविवाहित ?

पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर, विद्याभूषण, विद्यावाचस्पति

' भीष्मप्रतिज्ञा ' भारतांत कोणाला माहित नाही ? महाभारतांत भगवान् श्रीकृष्ण हे ईश्वरावतार म्हणून वगळले, तर चारित्र्य, धर्मज्ञता, समयज्ञता आणि सर्व मानवी पुरुषार्थांना व्यापणारी स्थितप्रज्ञता, इत्यादि गुणांचा परमोत्कर्ष महर्षि व्यासांनी वर्णिलेल्या असंख्य व्यक्तिचित्रांत कोठे दिसून येत असेल तर तो शांतनुनंदन, गांगेय भीष्माचार्यांतच. आणि भीष्माचार्यांना लाभलेली ही महापुरुषता अनेक कारणांपैकी ज्या एकाच कारणांमुळे प्रकर्षाप्रत गेली तें कारण म्हणजे ' भीष्मप्रतिज्ञा. '

भीष्मांचें समग्र व्यक्तिदर्शन, हा या लेखाचा विषय नसून भीष्म विवाहित की अविवाहित, या एकाच प्रश्नासंबंधी जे कांही गैरसमज जनमनांत व विद्वानांतहि रूढ होऊन बसल्यासारखे दिसतात, त्यावर प्रमाणशुद्ध प्रकाश टाकणें, एवढाच आहे. यासंबंधी हें प्रथमच स्पष्ट केलें पाहिजे की, भीष्मांचा विवाह झाला होता, या अर्थाचें स्पष्ट वचन समग्र महाभारतांत कुठेहि नाही. पण त्याचप्रमाणे विवाह झालाच नव्हता, अशा आशयाचेंहि स्पष्ट वचन नाही. या अनुल्लेखामुळे आणि भीष्मप्रतिज्ञेचा खरा अर्थ योग्य रीतीनें समजून न घेतल्यामुळे भीष्म हे आजन्म ब्रह्मचारीच होते व त्यांचा विवाह मुळीच झाला नव्हता, असा समज सर्वत्र रूढ होऊन बसल्यासारखा दिसतो. हा समज बरोबर नाही, हेंच या लेखांत प्रमाणासहित सिद्ध करून दाखवावयाचें आहे.

प्रमाणविचार

कोणत्याहि प्रमेयाच्या सिद्धीसाठी प्रत्यक्ष, अनुमान व शब्द हीं तीन प्रमाणें सर्व दार्शनिकांनी प्रमुख मानलीं आहेत. पैकी प्रत्यक्ष प्रमाणाचा येथे प्रश्नच उद्भवत नाही. कारण ज्या घटनेची चर्चा आपण आरंभिली आहे ती घटना भूतकालांत घडून गेली आहे. प्रत्यक्षाचा ती विषय होणेंच अशक्य आहे. शब्दप्रमाणहि येथे लागूं पडत नाही. कारण भीष्मांचा विवाह झाला होता, असें स्पष्ट वचन व्यासरचित महाभारतांत नाही. म्हणून येथे अनुमानप्रमाणच उपयोगी पडण्यासारखें आहे. या प्रमाणानें, भीष्म हे विवाहित झाले असलेच पाहिजेत, असें जर सिद्ध झालें, तर तें यथार्थ मानावेंच लागेल. त्याला प्रत्यक्षाचा वा शब्दाचा आधार नाही म्हणून तो निष्कर्ष संशयास्पद, असें म्हणतां येणार नाही. कारण अनुमानाची यथार्थता

ही मुख्यत: व्याप्तीवर अवलंबून असते; आणि अन्वय-व्यतिरेकात्मक व्याप्ति निर्दोष असली तर तिच्यावर आधारलेला निष्कर्ष हा प्रत्यक्षाइतकाच प्रमाणभूत मानला पाहिजे. ही भूमिका सर्व दार्शनिकांना व बुद्धिप्रामाण्यवाद्यांना मान्य करावीच लागते. ज्यांना हा प्रमाणविचार संमत नसेल त्याच्याशीं वाद घालणें व्यर्थ आहे. कारण, 'अरसिकेषु कवित्व निवेदनम्, शिरसि मा लिख, मा लिख, मा लिख' ही स्पष्टोक्ति कवित्वाबाबत जितकी सत्य आहे तितकीच, 'प्रमाण विचार ज्यांना मान्य नाही त्यांच्याशीं वाद घालण्याचा प्रसंग आमच्यावर येऊं नये, येऊं नये, येऊं नये' ही स्पष्टोक्तीहि कोणत्याहि वादग्रस्त प्रश्नाबाबत तितकीच सत्य आहे. असो—

भीष्मप्रतिज्ञा

ज्या भीष्मप्रतिज्ञेच्या आधारावर भीष्म अविवाहितच होते असें म्हटलें जातें ती प्रतिज्ञा येणेप्रमाणें आहे:—

"राज्यं तावत् पूर्वमेव मया त्यक्तं नराधिपाः।
अपत्यहेतोरपि च करिष्येऽद्य विनिश्चयम् ॥
अद्यप्रभृति मे, दाश, ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षया दिवि ॥"

(आदिपर्वांतर्गत संभवपर्व, अ. १००-श्लोक ९५, ९६.)

अर्थ:—"हे राजे हो, राज्याचा तर मी पूर्वीच त्याग केलेला आहे. आता अपत्याच्या बाबतींतहि मी आज अटळ निश्चय करीत आहें.

"हे दाश, आजपासून माझें ब्रह्मचर्य सतत चालूं राहील. (व यामुळे) मी निपुत्रिक राहिलों तरी स्वर्गात (दिवि) मला अक्षय लोक प्राप्त होतील."

भीष्मप्रतिज्ञा ही अशी आहे. या प्रतिज्ञेंतील प्रत्येक शब्द काटेकोरपणें लक्षांत घेतला पाहिजे. शब्दांचे अर्थ लावण्याचेंहि एक निश्चित शास्त्र आहे. या शास्त्रीय नियमांनुसार विचार करतां पूर्वापर संदर्भ, उपक्रमोपसंहार, शब्दांचे रूढार्थ व योगार्थ इत्यादि गोष्टींचा विचार करावा लागतो. येथें संदर्भ असा आहे की, भीष्मपिता राजा शांतनु हा निषादकन्या (दाशकन्या) सत्यवती हिच्या प्रेमांत पडला. त्याने तिच्या बापाकडे तिची मागणी केली. तिचा बाप दाश, निषादराज, म्हणाला, 'या माझ्या मुलीपासून आपल्याला जो पुत्र होईल, तोच आपल्यानंतर राजपदावर अभिषिक्त झाला पाहिजे, तरच मी माझी कन्या आपल्याला देईन.' हें ऐकतांच प्रचंड कामाग्नीने जळजळत असतांहि शांतनूला ती अट मान्य करावीशी वाटेना. तरीपण त्यानंतर शांतनु अतिशय शोकग्रस्त झाला. भीष्माच्या हें ध्यानांत येतांच त्याने आपल्या पित्याला शोकाचें कारण विचारलें.

अनुक्रमणिका

शांतनूकडूनच त्याला कळलें की, आपला पिता पुन्हा विवाह करूं इच्छितो. आपला पिता कोणाच्या प्रेमांत पडला आहे, हें त्यानें मंत्री व पित्याचा सारथी यांच्याकडून समजून घेतलें. नंतर तो तडक दाशाकडे गेला व त्याला त्यानें आपल्या पित्यासाठीं सत्यवतीची मागणी केली. दाशानें आपली अट सांगितली. भीष्मानें प्रतिज्ञापूर्वक ती तात्काळ मान्य केली. तरी पण निषाद म्हणाला, "तुझी ही प्रतिज्ञा अन्यथा होईल असें मला मुळींच वाटत नाही. मी त्याविषयीं निःशंक झालों आहें. पण 'तवापत्यं भवेत् यत् तु तत्र नः संशयो महान्' (९२). (म्हणजे) 'तुला जो पुत्र होईल. तो तुझ्या प्रतिज्ञेवर दृढ राहील किंवा नाही, याविषयी मात्र माझ्या मनांत फार मोठा संशय आहे.'—दाशाच्या या संशयाचें निराकारण करण्याकरताच भीष्मानें जी पुन्हा एक प्रतिज्ञा केली तीच 'भीष्म-प्रतिज्ञा' म्हणून विख्यात झाली.

प्रतिज्ञेचा अर्थ

सत्यवतीचा पुत्रच राजा होईल, याविषयी दाश निःशंक झाल्यानंतरहि त्याला, भीष्मापासून होणाऱ्या पुत्राला भीष्मप्रतिज्ञा बंधनकारक न वाटून तो कदाचित् सत्यवतीच्या पुत्राला मिळणारें राज्य बळकावून घेईल, ही भीति वाटली. म्हणून भीष्म विवाहित नसते तर ही भीति दाशाला वाटली नसती, असा निष्कर्ष काढण्यास जागा आहे. पण यावर असेंहि म्हणतां येण्यासारखें आहे की, भीष्माचें त्यावेळीं लग्न झालेलें नसून पुढे कदाचित् भीष्माचें लग्न होईल व त्या लग्नापासून होणाऱ्या पुत्राची दाशाला भीति वाटली असावी. पण हें म्हणणें बरोबर नाही, याला आधार गीता प्रेसनें प्रकाशित केलेल्या महाभारताच्या प्रतींत क्रमांक ९६ वाव्या श्लोकाखाली आणखी जे श्लोक दिलेले आहेत, त्यांत सापडतो. ते श्लोक असे आहेत :

> न हि जन्मप्रभृत्युक्तं मम किञ्चिदिहानृतम् ।
> यावत् प्राणा ध्रियन्ते वै मम देहं समाश्रिताः ।।
> तावन्न जनयिष्यामि पित्रे कन्यां प्रयच्छ मे ।
> परित्यजाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः ।।

याचा अर्थ असा की, भीष्मापासून होणाऱ्या पुत्राची जी भीति दाशाला वाटली ती, भीष्म पुढे केव्हा तरी विवाह करील व त्याला त्या भावी विवाहा-पासून पुत्र होईल, अशा स्वरूपाची नव्हती. तर प्रतिज्ञा करण्याच्या वेळींच भीष्म विवाहित होते, हें त्याला माहित असल्यामुळेच 'तवापत्यं भवेत् यत् तु-तत्र नः संशयो महान्' असें त्यानें म्हटलें. ही गोष्ट वर दिलेल्या श्लोकांतील 'परित्य-जाम्यहं राज्यं मैथुनं चापि सर्वशः' या श्लोकार्धावरून स्पष्ट होतें. राज्य आणि

मैथुन यांचा मी सर्वशः त्याग करीन, अशा शब्दांत भीष्मांनी दाशाला अभय दिलेलें आहे. प्रतिज्ञेच्या वेळीं भीष्म अविवाहित असते तर त्यांनी 'मी विवाहच करणार नाही,' असें अभिवचन दिलें असतें. पण या शब्दांत अभिवचन न देतां, 'मी मैथुनाचा सर्वशः त्याग करीन' असें जें भीष्मांनी अभिवचन दिलें त्यावरून ते प्रतिज्ञेच्या वेळीं विवाहित असलेच पाहिजेत, असाच निष्कर्ष निघतो. विवाहित असल्यामुळेच 'मी मैथुनाचा सर्वशः त्याग करीन' असें भीष्माला म्हणावें लागलें, हें स्पष्ट आहे. आणि वस्तुतः ही गोष्ट भीष्मप्रतिज्ञेला अधिक उदात्तता प्राप्त करून देते. विवाहित असतांहि आमरण मैथुन न करण्याची प्रतिज्ञा करणें, यांत अधिक खडतर त्याग आहे.

विवाहित असल्यामुळे भीष्मांनी मैथुनाचाच सर्वशः त्याग करण्याची प्रतिज्ञा केली, याबाबत आणखी एक पुरावा आहे. सत्यवतीपुत्र विचित्रवीर्य अकालीं मृत्यु पावला. त्याला संतान नव्हतें म्हणून सत्यवतीने वंशसातत्य राखण्यासाठी भीष्माला विनंती केली की, त्याने धर्मविहित नियोगपद्धतीने विचित्रवीर्याच्या दोन्ही बायकांपासून पुत्रोत्पत्ति करावी. सत्यवतीच्या या विनंतीचा अव्हेर करतांना भीष्म म्हणतात—

> " असंशयं परो धर्मस्त्वया मातरुदाहृतः ।
> राज्यार्थे नाभिषिञ्चेयं नोपेयां जातु मैथुनम्
> त्वमपत्यं प्रति च मे प्रतिज्ञां वेत्थ वै पराम् ।।
>
> (आदिपर्वांतर्गत संभवपर्व अ. १०३, श्लो. १३).

येथेहि आपल्या घोर प्रतिज्ञेचा उल्लेख करतांना भीष्म राज्य व मैथुन यांच्या त्यागाचाच उल्लेख करतात. यावरून प्रतिज्ञेच्या वेळीं भीष्म हे विवाहितच होते, हेंच सिद्ध होतें.

ब्रह्मचर्याचे प्रकार

महभारत-काळीं, म्हणजे भीष्म व कौरव-पांडव ज्या काळांत वावरले त्या काळीं, धर्मशास्त्रानुसार काटेकोरपणें वर्तन करणें, या गोष्टीला फार मोठें महत्त्व होतें. आणि या बाबतींत भीष्म हे आदर्श पुरुषश्रेष्ठ होते, हें महाभारतांतील त्यांच्याविषयींच्या असंख्य उल्लेखांवरून सिद्ध आहे. म्हणून भीष्मांच्या चरित्र्या-बाबत कोणतेंहि विधान करतांना, भीष्म आणि अधर्माचरण यांचें साहचर्य असंभवनीय आहे, हें लक्षांत घेऊनच तें केलें पाहिजे.

श्रुति-स्मृतिप्रणीत धर्मशास्त्रानुसार आणि विशेषतः वर्णाश्रमधर्माच्या विधिनिषेधानुसार 'ब्रह्मचर्य' या शब्दाला त्या काळीं निश्चित असा अर्थ होता. धर्मशास्त्रानुसार ब्रह्मचर्याचे दोनच प्रकार विहित मानले गेले होते. एक नैष्ठिक

ब्रह्मचर्य आणि दुसरें उपकुर्वाणक ब्रह्मचर्य. गुरुगृहीं अध्ययन पूर्ण झाल्यानंतरहि अधिक ज्ञानासाठी अथवा ज्ञानमयच होण्यासाठी तेथेच आमरण राहणें, अथवा हें अधिकचें ज्ञानग्रहण पूर्ण झाल्यावर प्रथम वानप्रस्थाश्रम स्वीकारणें आणि नंतर संन्यासाश्रम स्वीकारणें, अशा स्वरूपाचें, गृहस्थाश्रमशून्य व स्त्री–संबंधशून्य जें ब्रह्मचर्य तें नैष्ठिक ब्रह्मचर्य.

याच्या उलट, गुरुगृहीं अध्ययन पूर्ण झाल्यावर, गुरूच्या आज्ञेने सोडमुंज करणें, पितृगृहीं परत जाणें आणि शक्य तितक्या लवकर गृहस्थाश्रम स्वीकारणें, आणि हा गृहस्थाश्रम संस्कारपूर्वक स्वीकारण्यासाठी जो कालावधि लागेल त्या कालावधींत ब्रह्मचर्य पाळणें, याला उपकुर्वाणक ब्रह्मचर्य म्हणतात. म्हणजे अध्ययन संपल्यापासून व गुरुगृहाचा त्याग केल्यापासून गृहस्थाश्रमांत पदार्पण करीपर्यंत जो मध्यंतराचा काल, त्यांत पाळलें जाणारें जें ब्रह्मचर्य तें उपकुर्वाणक ब्रह्मचर्य या दोन प्रकारच्या ब्रह्मचर्याशिवाय तिसरा कोणताहि प्रकार धर्मशास्त्र-संमत नाही. भीष्म हे या दोन्ही प्रकारांत बसूं शकत नाहीत, म्हणून ते ब्रह्मचारी नव्हते, विवाहितच होते, गृहस्थाश्रमीच होते, असें म्हणावें लागतें.

भीष्माच्या जन्मानंतर गंगेने (त्याच्या मातेने) त्याला आपल्याबरोबर दिव्य लोकांत नेलें. तेथेच त्याचा वसिष्ठादि गुरूंच्या सान्निध्यांत ब्रह्मचर्याश्रम पूर्ण केला आणि नंतर तिने त्याला शंतनूच्या स्वाधीन केलें. म्हणजे पहिला ब्रह्मचर्याश्रम संपुष्टांत आणूनच भीष्म पितृगृहीं वास्तव्यासाठी आले. याचा अर्थ असा की, नैष्ठिक ब्रह्मचर्याचा मार्ग भीष्मांनी पत्करला नव्हता. म्हणून उपकुर्वाणक ब्रह्मचर्य त्यांनी पत्करलें होतें, हें सिद्ध आहे. उपकुर्वाणक ब्रह्मचर्य म्हणजे गुरुगृहीं अध्ययन संपवून, गुरूच्या आज्ञेने सोडमुंज करणें, प्रथमाश्रम संपुष्टांत आणणें आणि शक्य तितक्या लवकर गृहस्थाश्रम पत्करणें; गृहस्थाश्रमांत प्रवेश करीपर्यंतच्या मध्यंतरालाच उपकुर्वाणक ब्रह्मचर्य म्हणतात. गृहस्थाश्रम पत्करतांच उपकुर्वाणक ब्रह्मचर्यहि संपुष्टांत येतें. पण गृहस्थाश्रमांतहि केवळ ऋतुकाळीं व संतानप्राप्त्यर्थच पत्नीशीं समागम करणें, यालाहि ब्रह्मचर्य म्हणण्याचा प्रघात आहे. पण हा गौण प्रयोग आहे.

एका आश्रमाचा त्याग करतांच दुसऱ्या आश्रमांत प्रविष्ट होणें, आणि अनाश्रमी अवस्था लवकरांत लवकर संपुष्टांत आणणें, या गोष्टींवर धर्मशास्त्राचा कटाक्ष आहे. 'आश्रमादाश्रमं गच्छेत् नान्यथा मत्परश्चरेत' असें गीतेंतहि म्हटलें आहे. म्हणून ब्रह्मचर्याश्रम संपवून पितृगृहीं आल्यानंतर आणि शांतनु सत्यवतीच्या प्रेमपाशांत पडेपर्यंतच्या काळांत भीष्म अविवाहित म्हणजे अनाश्रमी राहिले, हें संभवनीय दिसत नाही. यावरूनहि भीष्मांचा विवाह झाला असलाच पाहिजे, असाच निष्कर्ष निघतो. कारण मध्यंतरीच्या काळांत भीष्माला युवराज्याभिषेक

झाला होता व त्याने क्षात्रधर्माचीं व राजधर्माचीं अनेक कर्तव्यें पार पाडण्याला आरंभ केलेला होता, असे अनेक उल्लेख भारतांत आहेत. ह्या सर्व गोष्टी भीष्म विवाहित झाले असलेच पाहिजेत, याच निष्कर्षाला पोषक आहेत.

शंभर अश्वमेधांचा पुरावा

भीष्मपर्वांत श्रीकृष्णांच्या तोंडी, 'अश्वमेधशतैरिजे' असें भीष्मांचें वर्णन आहे. म्हणजे भीष्मांनी शंभर अश्वमेध यज्ञ केले होते, हें सिद्ध आहे. धर्मशास्त्रांत असे स्पष्ट आदेश आहेत की, विवाहित धर्मपत्नीच्या अभावीं हे यज्ञ करण्याचा अधिकारच प्राप्त होऊं शकत नाही. पत्नीऐवजी तिची सुवर्णाची वा अन्य धातूंची प्रतिमा असली तरी चालते. पण हें केव्हा ? तर पत्नी जिवंत असून ती अस्पर्श असली अथवा दूर कुठे निघून गेलेली असली तरचे. श्रीरामचंद्रप्रभूंनी सीतेचा त्याग केल्यानंतर जे अश्वमेध यज्ञ केले त्यांत सीतेची सुवर्णप्रतिमा बरोबर ठेवून ते केले, असे उल्लेख आहेत. पण पत्नि निवर्तली असल्यास प्रतिमेनेंहि कार्यभाग होत नाही. दुसरा विवाह केल्यासच यज्ञ करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

भीष्मांनी शंभर यज्ञ केले होते, याचा अर्थच हा की ते आपल्या विवाहित पत्नीसहित त्यांनी केले होते. म्हणून भीष्म विवाहित असलेच पाहिजेत, याला हा एक आणखी एक निर्णायक पुरावा सिद्ध होतो.

सारांश, भीष्मांच्या विवाहाबाबत स्पष्ट शब्दप्रमाण नसल्यामुळे अनुमान-प्रमाणाने जें निर्विवादपणें सिद्ध होईल, तेंच यथार्थ मानलें पाहिजे. वर केलेल्या विवेचनावरून अनुमानाला पोषक अशी सर्व सामग्री महाभारतांतच कशी उपलब्ध होते, हें दिसून येईल. तर्कशुद्ध अनुमान मांडण्याला अश्वमेध यज्ञांचाच उल्लेख पुरेसा आहे. 'भीष्म विवाहवान्,' हें प्रतिज्ञात्मक विधान; 'अश्वमेधकारित्वात्' हा हेतु; 'यत्र यत्र अश्वमेधकारित्वम् तत्र तत्र विवाहवत्वम्' हें अन्वयात्मक व्याप्ति दाखवणारें उदाहरण; 'दशरथ-राम-युधिष्ठिरादिवत्' हा दृष्टान्त; 'जेथे जथे विवाहवत्व नाही, तेथे तेथे अश्वमेधकारित्व नाही' 'हनुमान-शुकादिवत्', हें व्यतिरेक व्याप्तीचें उदाहरण; 'तथा च अयम् विवाहत्वव्याप्य अश्वमेधकारित्ववान् भीष्मः'; 'तस्मात् भीष्मः विवाहवान्' असें निर्दोषव्याप्तीने युक्त अनुमान ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारें करतां येतें. या अनुमानांत जोंवर दोष दाखवितां येत नाही, तोंवर भीष्म विवाहित होते, हेंच यथार्थ मानलें पाहिजे.

उपसंहार

या विवेचनावर एकच आक्षेप संभवतो. असें जर होतें तर भीष्माच्या विवाहाचा स्पष्ट उल्लेख महाभारतांत वा अन्यत्र कां आलेला नाही. पण हा आक्षेप महाभारतांतच जें नमूद आहे त्यावर आधारलेल्या निर्दोष अनुमानाला

खेळणीं

बाबा मोहोड

स्वारी आतां अगदीच लहान नाही. परवाच तर चौथा वाढदिवस झालाय तिचा. म्हणजे सुनिल आता पूर्ण तीन वर्षाचा झाला आहे.

सुनिलचा वाढदिवस. मी तर वाई कमींतकमी खर्चांतच करायचं ठरवलं होतं. आपल्यासारख्यांना हवेत तरी कशाला हे वाढदिवस ? हें सारं श्रीमंतांसाठी. त्यांनाच नेहमी पैसा कसा खर्चावा याची विवंचना असते. आमचं आपलं जमा-खर्चाचीं दोन टोकं मिळवतां मिळवतां-—

आणि कारट्याचं नशिब तरी कसं ? काय महिन्याची शेवटचीच तारीख होती त्याच्या जन्मासाठी ! कारकुनी जीवन आमचं. दहा तारखेला पगार घेऊन पंचवीस तारखेला कफल्लक होणारे जीव आम्ही. तीस तारखेला राहणार तरी काय हातांत ! आणि म्हणूनच मी तिकडं सांगून टाकलं होतं—

" सुनिल पहिला वहिला असला म्हणून काय झालं ? उगीच अधिक खर्च कशाला करायचा ? उधार मिळालं तरी देणं कांही चुकत नाही. "

तिकडून उत्तर आलं—

" कांही खर्च तर करायचेच असतात सुधा."

(मागील पानांवरून)

धक्का लावूं शकत नाही. स्पष्ट उल्लेख नाही म्हणूनच तर वाद. नाहीतर वादाला कारणच उरलें नसतें. शिवाय, भीष्मपत्नीचा उल्लेख न येण्यालाहि कारणें देता येतात. भीष्माच्या प्रतिज्ञेमुळे भीष्माची पत्नि आवरितच झाली. यज्ञादि प्रसंगांत सहधर्मचारिणी होणें, यापेक्षा दुसरें कोणतेंच कार्य तिला उरलें नाही. भीष्मप्रतिज्ञेमुळे तिचा गृहस्थाश्रमहि संपुष्टांत आल्यासारखा झाला. कटाक्षाने नोंद केली जावी, अशी कोणतीहि ऐतिहासिक महत्त्वाची घटना तिच्या जीवनांत न घडल्यामुळेहि तिचा स्पष्ट उल्लेख महाभारतांत आलेला नसावा, असें म्हणतां येतें. इत्यर्थ हा की, भीष्म विवाहित होते, या अनुमानप्रमाणाने सिद्ध होणाऱ्या निष्कर्षाला बाध आणणारें कांहीहि महाभारतांत दिसून येत नाही. उलट महाभारतांतच जे इतर उल्लेख आहेत त्यांच्या आधारें, भीष्म विवाहित असलेच पाहिजे, हेंच निर्दोषपणें सिद्ध होतें.

卐

माझ्याकडून होकार मिळवायचा असला तर नेहमीच असं नांव घेऊन मला ते हाक मारतात. आणि आपले दोन्ही हात माझ्या खांद्यावर टाकून माझ्या होकाराची वाट बघतात.

याहि वेळीं तसंच झालं. पण आज त्यांची नजर माझ्या होकाराकडे नव्हती. कुठेतरीच होती ती. आढयाकडे. आभाळाकडे. राहून राहून मला वाटलं—

"त्यांची ही नजर आपल्या डोळयांकडे हवी होती. म्हणजे आपण त्यांना सांगून टाकलं असतं,

"करा. कितीहि खर्च करा. मलाहि तुमच्या आनंदांत आनंद आहे."

पण असं कांही घडलं नाही. उलट त्यांची नजर अधिकच भकास वाटली मला. किती किती गोष्टी होत्या त्या नजरेंत ? सुनिलसाठी लहान सायकल··· विजेची झुकझुक गाडी···माझ्यासाठी न खरीदलेली सुंदर साडी···घराचं भाडं···वाण्याचीं बिलं···सकाळचा दूधवाला....

मला खूप भडभडून आलं. संसारांत अवघ्या खस्ता नवऱ्यानंच खायच्या का ? स्त्री ही नवऱ्याची अर्धी वाटेकरीण असते म्हणतात. पण ती सुखापुरतीच का ? चिंता नसते का तिनं वाटून घ्यायची ?

मनांत आलं,

असंच आपण त्यांच्या जवळ जावं. खूप खूप जवळ आणि मग म्हणावं,

"कांही कांऽही नको. सुनिलचा वाढदिवस नको. मला साडी नको. डोळयानं धड दिसत नाही तुमच्या. त्यासाठी एक चष्मा घ्या आधी. मग हसत मुखानं घरांत वावरा. बस्स. तेवढंच हवय् मला...."

पण मी जागेवरून हलूंच शकलें नाही.

सुनिलच्या वाढदिवसाचा बेत तसा साधाच होता. कपडे सुद्धा साधेसुधेच. पांढरे शुभ्र. खादीचे. चिरंजिवांची स्वारी सुद्धा कांही कमी रुबाबदार दिसत नव्हती त्या पोषाखांत ! पण मला कांही तें फारसं पसंत पडलं नाही. राहून राहून मनांत येई—

आज ही खादी कशी घरांत ? तसं पाहिलं तर खादीबद्दल कांही कमी तिटकारा नाही तिकडच्या मनांत ! शेवटीं मी मनांतलं बाहेर काढलंच.

उत्तरहि कांही मधापेक्षा कमी गोड मिळालं नाही. कांही भावना, कांही तत्त्वज्ञान, कांही काटकसर; असं तिहेरी मिश्रण होतं त्या उत्तरांत.

पण माझ्या मतें शेवटची काटकसरच अधिक महत्त्वाची असावी. आणि हें ओळखायलाहि मला फारसा वेळ लागला नाही. शेवटीं फटकळपणें मी बोलून टाकलंच—

अनुक्रमणिका

" सारं साखरेंत घोळलेलं क्विनाईन आहे, झालं. "

तिकडून नुसतंच हंसणं झालं. उदासवाणं. त्या हसण्यांत किती किती अर्थ भरला होता. माझ्या डोळयांत पाणी तरंगल्याशिवाय राहिलं नाही.

आम्ही दोघांनीहि सुनिलला आज आंघोळ घातली. नऊ दिव्यांनी ओवाळलं. फुलं अक्षता उधळल्या. नवेनवे कपडे चढवले. स्वारीहि खूप रंगांत आली. ऐटींत तिकडे म्हणाली,

" दादा, आज किनई एक सायकल दे मला. लहानशी. सुंदर. शेजारच्या अरविंद पेक्षा सुद्धा."

त्यांनी झरकन् तोंड फिरवल्याचं माझ्या लक्षांत आलं. मी मध्ये पडलें आणि सुनिलला पोटाशीं घेऊन म्हटलं,

" आणतील हो. पण आज नाही. पुढं केव्हा तरी. पण सुनिल, नमस्कार केलास का तूं दादांना ! "

सुनिल किती लवकर तिकडे धावला ! खाली वाकला. पायावर डोकं ठेवलं आणि लबाड पुन: पुटपुटला,

" दादा, आता सायकल आणशील ना ? आणि ती झुकझुक गाडी ? "

" हो. "

तिकडच्या आवाजांत भरपूर कंप होता. पण सुनिलला तो जाणवणं शक्य नव्हतं. कांही कांही वेळा अज्ञानांतहि कांही कमी सुख नसतं.

सुनिल आनंदाच्या भरांत बाहेर उडया मारीत निघून गेला. त्या पाठमोऱ्या फुलपाखराकडे आम्ही दोघंहि पहात उभीं राहिलों. रस्त्यावर शेजारचीं मुलं सायकल खेळत होतीं. त्यांत सुनिलहि मिसळला पण प्रेक्षक म्हणून.

तसं पाहिलं तर सुनिल हें आमचं एकुलतं एक अपत्य. देवघराला नंदादीपामुळं जें वैभव असतं तेंच वैभव आमच्यासारख्यांच्या संसाराला मूलानं येतं. पण त्या नंदादीपाचंहि पुरेसं कोडकौतुक करूं शकत नाही. जग पैशानं चालतं हेंच खरं. सारी सुखं, सारा आनंद अखेर पैशानंच विकत घेतां येतो.

पण पैशानं तरी पुरून पुरून किती पुरावं ? वन्सं कॉलेजांत शिकतात. म्हाताऱ्या सासूसासऱ्यांना महिन्याकाठीं निदान पंधरावीस रुपये तरी पाठवायलाच हवेत. असे हे खर्च. इतकं आधी वजा करून उरल्यांत संसार करायचा. त्यांत महागाई ही अशी. तिकडे दुकानचीं बिलं भरतां भरतां जीव निघून जातो आणि इकडे घरांतलं सामान तीस दिवस पुरवतां पुरवतां माझ्या नाकीं नऊ येतात.

अखेर या सर्वांची गदा येते ती इतर खर्चांवर. सात वर्षं बरोबर संसार केला पण कधी दोघांनी मिळून एकत्र सिनेमा पाहिला नाही. कधी पोरासाठी

हौशीनं खेळणीं खरीदलीं नाही तर तिकडे कधी आवडीनिवडीनं एखादा जास्तीचा सदरा वापरला नाही.

इतके दिवस माझ्या लक्षांत आलं नव्हतं. पण परवा सहज उलगडा झाला. कधी नव्हतें तें त्या दिवशीं ऑफिसांतून आल्याबरोबर मी त्यांच्या खोलींत गेलें. अंगांतला कोट काढणं चाललं होतं. पाठ बाहेरच्या दाराकडे होती. मला त्यांचा सदरा दिसला. किती फाटला होता पाठीवर !

"हें काय मेलं ? शिवून तरी नाही का मागायचा ?" मी जवळ जवळ रागावलेंच.

"विसरलों."

उत्तर मिळालं. अगदीच खालच्या आवाजांत. असं कांही घडलं की, वाटतं—

'स्वारीच्या पायावरून जीव ओवाळायला हवा आपला.'

सुनिलच्या बाबतींतहि अनेकदा तेंच घडतं. अनेकदा तो बारिकसारीक गोष्टींसाठी हट्ट घेतो. अडतो. रडतो. पण त्याची लहानशी हौसहि आम्ही कांही पुरी करूं शकत नाही. वाईट अनेकदा वाटतं पण उपाय असतोच असं नाही.

शेजारच्या तक्रारी येतात. एकामागून एक, सारख्या.

कुणि म्हणतात.

'तुमचा मुलगा आमचेकडे फार येतो.'

कुणि म्हणतात—

'तो आमच्या मुलांना खेळूंच देत नाही.'

कुणि म्हणतात,

'तो आमचीं खेळणींच पळवतो.'

असं कांही ऐकलं की, अनेकदा जीव कळवळतो. कासावीस होतो. अनेकदा खवळतोहि. अपराध नसतांनाहि सुनिलवर रागावलं जातं. तीन वर्षांचं पोर बिचारं. रडतं. कुढतं. दीनवाणीपणानं आपल्या तोंडाकडे बघतं. कधीकधी छातींत तोंड खुपसतं आणि नाही नाही तेवढं मुसमुसतं.

सुनिलनं असं कांही केलं की, मलाहि मग वाईट वाटतं. त्याची हनुवटी मीं वर उचलतें आणि भरल्या डोळ्यांनं त्याला म्हणते,

'जन्मसुद्धा चांगल्या ठिकाणींच द्यावा देवानं.'

सुनिलला यांतलं कांहीच कळत नाही. तो माझ्याकडे पाहतो एकटक आणि म्हणतो,

"आई, तूं का ग ललतेस ?"

मी त्याला अधिकच जवळ घेतें.

बोलतां येतं तेव्हापासून सुनिलचा सारखा हट्ट आहे–

'मला लहान सायकल हवी. विजेची झुकझुक गाडी हवी.'

सुनिलचे हे हट्ट लहान खरे पण आमच्यासाठी केवढे मोठे आहेत ते ? आभाळाहूनसुद्धा मोठे. एखादेवेळीं हिमालय चढून जाणं सोपं असेल पण मुलाचे हे लहानसहान हट्ट पुरविणं कांही आमच्यासाठी सोपं नाही. प्रत्येक वेळीं आश्वासन दिलं जातं—

" पुढच्या महिन्यांत."

पण हा पुढचा महिना जगाच्या अंतापर्यंत यायचा नाही म्हणूनच आमची ठाकुरकी. नाहीतर केवढी पंचाईत झाली असती !

लहान मुलं स्वभावतःच द्वाड असतात. सुनिलहि कांही कमी द्वाड नाही. घरांतली एकहि वस्तू जागेवर ठेवायचा नाही. सारखा घरभर गोंधळ चालू असतो. इकडची वस्तू तिकडे, तिकडची वस्तू इकडे.

अनेकदा रागहि येतो. हें काय मेलं ? घरांतल्या घरांतच खेळायचं. घर काय उकरायचं. भिंतीला रंग काय फासायचा. मातींत काय लोळायचं. वृंदावनांतली तुळस काय उपटायची. एकना दोन; हजार गोष्टी.

परवाहि असंच झालं. मी शोधशोध शोधलं पण विळी कांही सापडली नाही. नक्कीच कारटचानं पळवली असली पाहिजे. शेवटीं माझा अंदाज खरा ठरला. पाठीमागच्या खोलींत विळीनं भिंत उकरण्यांत गर्क झाली होती स्वारी.

मी चिडून गेलें. भाडेवाला अगोदरच नाराज. त्यांत हें असं. मी माझ्या जागेवर राहिलें नाही. एका हातानं सुनिलच्या हातांतलो विळी घेतली आणि दुसऱ्या हातानं फाडदिशीं—

हातांतलं वर्तमानपत्र तसंच टाकून तिकडून खोलींत येणं झालं. त्यांनी झरकन् सुनिलला उचललं आणि माझ्याकडे पाहिलं.

किती केविलवाणी नजर होती ती !

मी क्षणार्धांत वरमलें. शरमलें. गारगार झालें. शक्य झालं असतं तर माझे हात देखील तोडून घेतले असते मी. तळचाचा बांध फुटला. मी अक्षरशः मनानं खाली कोसळलें. तिकडच्या पायावर. लहानग्या सुनिलच्यासुद्धा.

त्यांनी सुनिलकडे पाहिलं आणि इतकंच बोलले—

" विचारा."

मीं सुनिलला जवळ घेण्याचा प्रयत्न केला. पण मला पाहून तो अधिकच थरथरला. मी झरकन बाजूला झालें. खोलींतून रडका आवाज पुनः कानावर आला.

अनुक्रमणिका

"दादा, मी आता विळी घेणार नाहीं आईची."

शब्द साधेच होते. पण मला रडायला ते पुरेसे होते. मी पुढच्या खोलींत आलें. अगतिकपणें. विरंगुळा म्हणून नजरेनं सडक ओलांडली. समोरच्या बंगल्यांत मुलं खेळत होतीं··सायकल. विजेची झुकझुक गाडी. आणखीहि पुष्कळ पुष्कळ.

आणि इकडे मागच्या खोलींत सुनिल मुसमुसून रडत होता.

—आई कांहीच खेळायला देत नाही म्हणून !

मला कसंसंच वाटलं.

पुन्हा डोळयाचा बांध फुटला.

मीं समोरचा दरवाजा धाडकन् बंद केला !

पण मी पाठमोरी होतें न होतें तोंच दारावरर टकटक ऐकूं आली. मी दार उघडलं. जें दृश्य दिसलं तें पाहून मी थक्कच झालें ! छोटी सायकल, झुकझुक गाडी, आणखी किती तरी खेळणीं घेऊन ते आले होते—सुनिलचे दादा—

खेळणीं त्यांनी माझ्या समोर ठेवलीं आणि ते आंत सुनिलकडे निघून गेलें. त्यांच्या चेहऱ्यावरचा भाव पाहून मी स्तंभितच झालें होतें. सुन्न-संवेदनाशून्य—

कांही वेळानं, किती तें मला आठवत नाही, मी भानावर आलें.

आंत जाऊन पाहतें तों सुनिलहि नाही आणि तेहि नाहीत. पुन्हा एक धक्का ! आज हें असं कां होत आहे. हें कांही केल्या कळेना. मागच्या दारानं ते सुनीलला कुठं तरी घेऊन गेले होते, खेळणीं माझ्यासमोर टाकून. जणूं तीं मलाच हवीं होतीं !

किती तरी वेळानं ते एकटेच परत आले. न बोलतां, माझ्याकडे नजरहि न वळवतां आपल्या खोलींत गेले. त्यांच्या चेहऱ्यावर तोच अथांग, मला स्तंभित, सुन्न, शून्यवत करणारा भाव होता.

आता मात्र मी घाबरलें, बावरलें. तडक त्यांच्या खोलींत गेलें. ते वर्तमानपत्र वाचण्यांत दंग झाले होते. जसें कांहीच घडलें नव्हतें. पुन्हा एक जबर धक्का !

माझ्या डोळयांतून अश्रूंचे पूर लोटूं लागले होते. हुंदके आवरतांना प्राण गुदमरून कासावीस होत होते. पण अखेरीस एक हुंदका अनावर झाला--बाहेर पडला--किती दुबळी होतें मी ! —

माझे हुंदके ओसरल्यावर, मी जरा शांत झाल्यावर, मला ऐकूं आलें--

"सुनीलला मी बालकमंदिरांत सोडून आलों. फार मजेंत आहे तो तिथं. खूप खेळणीं आहेत तिथं—पण मत्सर, हेवेदावे, रोगट स्पर्धा यांना खेळीमेळीनं, गोडी गुलाबीनं आवर घालण्याच्या तंत्रांत तेथील मंदिरसंचालिका निष्णात आहे.

अनुक्रमणिका

" इतरांच्या मुलांना खेळणीं आहेत पण आपल्या एकुलत्या एक मुलाला मात्र खेळणीं नाहीत, म्हणून तूं फार दुःखी झाली होतीस. तुला वाटत होतं, हें सारं दुःख मुलाच्या प्रेमामुळं होत आहे. पण तसं तें नव्हतं. इतरांच्या मुलांना खेळणीं आहेत म्हणून माझ्याहि मुलाला तीं मिळालींच पाहिजेत. इतरांच्या मुलांच्या अंगावर सुंदर किमती कपडे व सोन्याचे अलंकार आहेत, म्हणून माझ्याहि मुलाच्या अंगावर ते असलेच पाहिजेत. मी–माझं–इतर–इतरांचं हेंच मुख्य. मुलाला खरोखर काय पाहिजे, काय द्यायला पाहिजे आणि काय देतां कामा नये––हें दुय्यम. नव्हे, याला कांहीच महत्त्व नाही. त्याचा विकास, त्यांचं कल्याण कशांत आहे, याचा विचारसुद्धा नाही. आपल्या सामाजिक मानमान्यतेसाठी, आपल्या अहंकारी–अभिमानी सुखा–समाधानासाठी आपल्या मुलांना, इतरांच्या मुलांना आहेत तशीं, नव्हे त्याहून उत्तम खेळणीं देतां आलीं तरच जीवनांत अर्थ· नाहीतर सारं अर्थशून्य–दुःखद––मुलांना खेळणीं द्यायचीं आणि त्यांना आपल्या वैयक्तिक अहंकारी–अभिमानी–प्रतिष्ठित सुखा–समाधानाचीं खेळणीं बनवायचीं ! खेळणीं अनिलला नको होतीं. तीं तुलाच हवीं होतीं; म्हणून तुला तीं देऊन मी त्याला बालमंदिरांत घेऊन गेलों. खेळणीं, खेळणीं...चार घटका करमणुकीची चंगळ आणि मग जन्मभराची अडगळ..."

× × ×

लग्न झाल्यानंतरच्या आयुष्यांत पहिल्यानंच ते इतकं बोलले. त्यापूर्वी आणि त्यानंतरहि ते कधीच इतके बोलले नाही. पण त्यानंतर बोलण्यासारखं उरलंच काय होतं ?..सारं, सारं त्या एकाच वेळच्या बोलण्यांत मला कळून चुकलं....सूर्य, चंद्र, भडक विजेचे दिवे, हेच केवळ प्रकाश द्यायला समर्थ असतात, असं मी मानीत होतें. पण या सर्वांपेक्षा जीवनानं, जीवनांतील सखोल आशयानं ओतप्रोत भरलेल्या शब्दांत जो प्रकाश असतो त्याची सर सहस्त्रावधि सूर्यांनाहि येणार नाही.

खेळणीं...अजूनहि त्या दिवशीं त्यांनी दिलेलीं खेळणीं मी जपून ठेवलीं आहेत. सुख–दुःखमय जीवनांतील खेळांत डाव उलटला की, मी त्या खेळण्यांकडे एक क्षणभर पाहतें. आणि मग सारे उलटलेले डाव सरळ होऊं लागतात.

卐

अनुक्रमणिका

श्री ज्ञानेश्वर आणि जे. कृष्णमूर्ति

डॉ. अ. ना. देशपांडे

श्रीज्ञानेश्वर आणि जे. कृष्णमूर्ति. आध्यात्मिक क्षेत्रांतील या दोन विश्ववंद्य विभूती. दोघेहि साक्षात्कारी. दोघेहि सिद्ध. असें असतांनासुद्धा या दोघांना एकत्र आणलेले पाहून कित्येक वाचक चकित होण्याचीच शक्यता जास्त. या चकित होण्यामागची कारणमीमांसा मात्र सहज लक्षांत येण्याइतकी उघड आणि स्पष्ट आहे. ज्ञानेश्वर काय किंवा आमचे इतर महाराष्ट्रीय संत काय, यांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा विचार एका ठराविक, संकुचित, सांप्रदायिक पद्धतीनेच करण्याची आमच्या मनाला व विवेचकशक्तीला सवय जडून गेली आहे. ज्ञानेश्वर म्हणजे आपेगाव, आळंदी व पंढरपूर. ज्ञानेश्वर म्हणजे वारकरी संप्रदाय. ज्ञानेश्वर म्हणजे आमची मराठी भाषा आणि तिचें वैभव. वस्तुतः अशा रीतीनें ज्ञानेश्वरांच्या मोठेपणाला मराठीपुरतें आणि महाराष्ट्रापुरतेंच मर्यादित करण्याचा प्रयत्न करणें हें विशाल महासागराला एखाद्या लहानशा आडांत कोंबून टाकण्याचा खटाटोप करण्यासारखें आहे. ज्ञानेश्वर हे विश्वदृष्टीचे विचारवंत आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाला विश्वात्मकतेची बैठक आहे. कोणत्याहि प्रश्नाचा विचार विश्वदर्शनाच्या अधिष्ठानावर व्हावा असें ज्ञानेश्वरांचें सांगणें आहे. या दृष्टीने ज्ञानेश्वरांचें गीतेच्या अकराव्या अध्यायावरील भाष्य अवश्य वाचून पाहण्यासारखें आहे. श्रीकृष्ण अर्जुनाला आपलें अति विराट आणि रौद्रभीषण असें विश्वरूप दाखवितो. अर्जुन भयभीत होतो, नकों हें अक्राळविक्राळ विश्वरूप; त्यापेक्षा श्रीकृष्णाचें नेहमीचें चार हातांचें गोजिरवाणें सावळें आणि सोज्वळ रूपच चांगलें, असें अर्जुन म्हणतो. त्या वेळीं ज्ञानेश्वरांचा श्रीकृष्ण अर्जुनावर रागावतो; 'गांवढिया' म्हणून त्याला अधिक्षेपितो. चतुर्भुज रूपाच्या तुलनेने विश्वरूपाचें महत्व अर्जुनाला पटवून देतांना तो म्हणतो :

"तैसें ऐश्वर्य हें महातेज । आजि हाता आलें सहज ।
की एथ तुज गजबज । होआवी कां ॥
परि नेणसीच गांवढिया । काय कोपो आता धनंजया ।
आंग सोडोनि छाया । आलिंगितोसि मा ॥
हें नव्हे जो मी साचें । एथ मन करुनिया काचें ।
प्रेम धरिसी अवगणियेचें । चतुर्भुज जें ॥

तरि अज्ञुनिवरि पार्था । सांडी सांडी हे व्यवस्था ।
इयेविषयीं आस्था । करिसी झणें ॥
हें रूप जरी घोर । विकृती आणि थोर ।
तरी कृतनिश्चयाचें घर । हेंचि करी ॥ "

ज्ञानेश्वरांच्या अशा या विश्वदर्शी प्रज्ञेचें आवाहन हें फक्त मराठी व महाराष्ट्र यांच्यापुरतेंच सीमित करून ठेवण्यांत त्यांच्या तथाकथित भक्तांकडून त्यांना फार मोठा अन्याय होत आहे.

पुन्हा, दुसरी गोष्ट अशी की ज्ञानेश्वरांसारख्या किंवा जे. कृष्णमूर्तींसारख्या विश्वदृष्टीच्या ज्या साक्षात्कारी व्यक्ति असतात त्यांच्या बावतींत जाति, पंथ, संप्रदाय, वंश, राष्ट्र हीं सगळीं बंधनें अर्थशून्य होतात, आपोआप गळून पडतात. जगांत, कोणत्याहि काळीं, कोणत्याहि स्थळीं, उदयास आलेल्या साक्षात्कारी व्यक्तीची कोटि एकच असते, त्यांचा वर्ग एकच असतो, त्यांची कुळी एकच असते; कारण त्यांचा अनुभव एकच असतो. साक्षात्कारांत राष्ट्रवाद बसत नाही. अध्यात्म आणि राष्ट्रवाद यांचें साहचर्य कल्पिणें व त्यावर भर देणें, ही अत्यंत तर्कदुष्ट गोष्ट आहे हें ज्यांना पटत नाही त्यांना अध्यात्माचें रहस्यच कळलेलें असणें शक्य नाही. अध्यात्मिक दृष्टीनें पाहूं जातां, राष्ट्रवाद म्हणजे, आल्डस् हक्स्लेच्या भाषेंत बोलायचें झालें तर एक lunatic doctrine आहे, एक शुद्ध वेडगळ विचार आहे. अहो, साक्षात्कारी माणसें एथून तिथून सगळीं सारखींच; एकच. रा. द. रानडे यांना हें प्रमेय बरोबर पटलें; कारण निरनिराळ्या काळांतल्या, निरनिराळ्या देशांतल्या साक्षात्कारी व्यक्तींच्या अनुभवांतील विलक्षण साम्य त्यांना उत्कटतेने प्रत्ययास आलें. Mysticism in Maharashtra या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यांनी हें साम्य अनेक उदाहरणें देऊन सिद्ध करून दाखविलें आहे. त्यांनी तींत असें अगदी स्पष्ट लिहिलें आहे की " The Mystics of all ages and countries form an eternal Divine Society. There are no racial, no communal, no national prejudices among them. Time and space have nothing to do with the eternal and infinite character of their mystical experience. "

वरील विवेचनाच्या बळावर श्रीज्ञानेश्वर आणि जे. कृष्णमूर्ति या दोन साक्षात्कारी व्यक्तींना एकत्र आणण्यांतील औचित्य सहजच पटावें. हें पटतें न पटतें तोंच एखादा जागरूक वाचक आवेशाने उसळून असें विचारण्याचा संभव आहे की, " ज्ञानेश्वर आणि कृष्णमूर्ति यांना एकत्र आणणें कसें बरें शक्य आहे ? आणि कसें न्याय्य आहे ? कृष्णमूर्तींची वृत्ति कोणतीहि गुरुपरम्परा मानण्याला

सर्वस्वी विरोधी आणि ज्ञानेश्वर म्हणजे साक्षात्, मूर्तिमंत गुरुभक्ति, तेव्हा या दोघांना एकत्र आणण्यांत कसली आली आहे संगति ?" हें खरें आहे की सकृत-दर्शनीं या दोघांना एकत्र आणण्यांतील ही विसंगति वरीच खटकते; पण जरा विचार करूं लागतांच तिचें निराकरण ही एक सहज गोष्ट वाटूं लागते. ज्ञानेश्वर गुरुभक्त होते; आणि त्याचबरोबर स्वतंत्रप्रज्ञहि होते. त्यांच्या व्यक्तित्वांत उदंड आत्मश्रद्धा आणि कमालीची लीनता यांचा अतिमधुर आणि मनोहर संगम झालेला होता. त्यांचा आध्यात्मिक अनुभव स्वतंत्र होता, स्वतःचा होता. त्यांच्या आत्मज्ञानाच्या बोलण्यामागें खणखणीत आत्मप्रत्यय होता. त्यांच्या आध्यात्मिक अनुभूतींतील ही मौलिकता अगदी निस्संदिग्ध स्वरूपांत त्यांच्या 'अमृतानुभवां'तील—

परी शिवें कां श्रीवल्लभें। बोलिलें येणेंचि लोभें।
मानूं तेंहि लाभे। न बोलतांहि॥

या ओवींत प्रकट झालेली आहे. तेव्हा गुरुभक्तीमुळे ज्ञानेश्वरांच्या स्वतंत्र प्रज्ञेचें, स्वतंत्र प्रतिभेचें आणि स्वतंत्र अनुभूतीचें महत्त्व दृष्टिआड होऊं नये आणि त्यांना व कृष्णमूर्तींना एकत्र आणण्यांत विसंगति रतिभरहि जाणवूं नये. पुन्हा, या ठिकाणीं कृष्णमूर्तींच्या व्यक्तित्वाची दुसरी बाजूहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. कृष्णमूर्ति स्वतंत्रप्रज्ञ आहेत हें खरें आहे, पण त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या बनावांत लेडबीटर व ॲनी बेझंट यांनी त्यांच्यावर केलेल्या संस्कारांना न्याय्य स्थान देणेंहि आवश्यक आहे.

ज्ञानेश्वर आणि कृष्णमूर्ति या दोघांचा एकत्र विचार करूं लागतांच मनश्चक्षूपुढे एक वस्तु तरळूं लागते. ती वस्तु म्हणजे मनःशांति. मनःशांति ही सगळ्यांत जास्त मोलाची, लाख मोलाची, पृथ्वीमोलाची वस्तु आहे. तिचें मोल करणेंच अशक्य आहे. ही शांति म्हणजेच सुखाची परमावधि. ही शांति म्हणजेच खऱ्या स्वतंत्रतेची प्राप्ति. कृष्णमूर्तींनी या मनःशांतीचा केवढा मनःपूर्वक गौरव केलेला आहे! या मनःशांतीची महात्मता त्यांनी किती परोपरीनें पटवून दिलेली आहे! खरा आत्मसाक्षात्कार, खरें आत्मदर्शन हें मनःशांति मिळाल्यानंतरच प्राप्त होऊं शकतें असें त्यांचें सांगणें आहे. म्हणूनच त्यांनी म्हटलें आहे,

"When the mind is still, only then there is freedom for the real to be."

या शांतीची महात्मता ज्ञानेश्वरांनाहि मनोमन व पूर्णपणें मान्य आहे. ही शांतीची महात्मता प्रस्थापित करण्याकरिताच व तिचा खऱ्या अध्यात्मलोलुप जीवांना आस्वाद देण्याकरिताच त्यांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाची रचना

केली आहे. 'शांतीचें घर' 'शांतिकथा'—अशा शब्दांत त्यांनी आपल्या या ग्रंथाचें जें वर्णन केलेलें आहे तें निस्संशय अर्थपूर्ण आहे. रसिकांसंबंधींच्या आपल्या अपेक्षा ग्रंथाच्या प्रारंभभागीं वर्णन करीत असतांना ज्ञानेश्वरांनी लिहिलें आहे :

'ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंतःकरणें ।
आथिला तोचि जाणे । मानूं इये ।। '

या ओवींत 'ज्ञानेश्वरी'च्या आस्वादकाच्या अंगीं अंतःकरणाचें स्थैर्य म्हणजेच मनःशांति असणें आवश्यक आहे हें त्यांनी सूचित केलेलें आहे.

ही मनःशांति प्राप्त करून घेणें हें केवढें विकट कर्म आहे! याच्या विकट स्वरूपाची स्पष्ट जाणीव असल्यामुळेच कृष्णमूर्तींनी लिहिलें आहे,

"The difficulty is for the mind to be still; for the mind is always worried; it is always after something, acquiring or denying, searching and finding. The mind is never still, it is in continuous movement."

मनाच्या या अस्वस्थ, अशांत स्वरूपाचें वर्णन करतांना ज्ञानेश्वरांनी लिहिलें आहे—

"हें मन कैसें केवढें । ऐसे पाहों म्हणो तरी न सापडे ।
एऱ्हवीं राहाटावया थोडें । त्रैलोक्य यया ।।
म्हणौनि ऐसें कैसें घडेल । जें मर्कट समाधी येईल ।
कां राहा म्हणतलिया राहेल । महावातु ।। "

असें हें द्वाड मन स्थिर करून जी शांति प्राप्त करून घ्यावयाची, ती म्हणजे आत्म्याची सहज स्थिति. खरी स्वतंत्रता तीच. खऱ्या स्वतंत्रतेचें हें लक्षण ज्ञानेश्वरांनी मोठ्या मार्मिकपणें सांगितलें आहे—

"तैसी निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे ।। "

मनाची ही शांति, मनाचें हें स्वातंत्र्य हस्तगत करण्याकरिता आणि आत्म्याच्या सहज स्थितींत असण्याकरिता मनावरचीं सगळीं आवरणें व सगळीं नियंत्रणें दूर सारणें आवश्यक आहे. कांहीतरी होऊं पाहणारें, कांहीतरी मिळवूं पाहणारें मन हें शांतीचा अनुभव घेऊं शकत नाही. कृष्णमूर्तींचा असाच अनुभव आहे.

"The mind is not quiet when it is acquiring or becoming. The mind is not quiet when it is disciplined, controlled and checked; such a mind is a dead mind."

आत्म्याच्या सहज स्थितींत शांति आहे. ही सहज स्थिति म्हणजे 'शब्दे-वीण संवादिजे' अशा कोटींतील अनुभूति आहे. ही अनुभूति तर्कशक्तीच्या पलीकडची आहे. आत्मसाक्षात्काराच्या कामीं शब्द-विचार-तर्क यांचें सामर्थ्य कसें निरुपयोगी आहे हें ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवा'च्या 'शब्दखंडन' नामक सहाव्या प्रकरणांत विस्तरशः व परोपरीचीं पण समर्पक उदाहरणें देऊन पटवून दिलें आहे. ज्ञानेश्वर म्हणतात—

"किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिद्धु ।
परि ययाही संबंधु । नाही येथे ॥
आत्मया बोलाचें । कांहीच उपेगा न वचे ।
स्वसंवेद्या कोण्हाचें । ओझें आधी ॥"

आत्म्याच्या सहज स्थितीचा उदय होण्याच्या दृष्टीने पाहतां विचारशक्ति ही व्यर्थ आहे हें ज्ञानेश्वर व कृष्णमूर्ति या दोघांनाहि मान्य आहे. प्राप्तावस्था ही ज्ञानाज्ञानातीत अवस्था आहे. ज्ञान सुद्धा येथे 'बंध' स्वरूप आहे. ज्ञानेश्वरांचा या बाबतींतला अभिप्राय अगदी स्पष्ट आहे—

"आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसें ।
म्हणितलें असें । सदाशिवें ॥"

शुद्ध आत्मज्ञानाला वृत्तिज्ञानाच्या आश्रयाची वा साहाय्याची काय जरूर आहे?

"जें आत्मज्ञान निखळ । तेहि घे ज्ञानाचें बळ ।
ते सूर्य चिंती सवळ । तैसें नोव्हे ॥"

केवळ 'शब्दैकजीवन' असलेलीं गरीव बिचारीं 'ज्ञानें अज्ञानें' आत्मज्ञान सिद्ध वा प्रकाशित करण्याच्या कामीं अगदीच लुळीं पांगळीं व हतप्रभ ठरण्या-सारखीं आहेत—

"तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिद्धु ।
आता काय दे शब्दु । तयाचें तया ॥
आत्मा सिद्धचि मा कोणें । काय साधावें ॥
एवं शब्दैकजीवनें । वापुडीं ज्ञानेंअज्ञानें ।
साचपणें वनें । चित्रींचीं जैशीं ॥"

या आत्मज्ञानाला, आत्म्याच्या या सहज स्थितीला कृष्णमूर्तींनी Te be या शब्दांनी संबोधिलेलें आहे. योगायोग असा की ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभवां'त या स्थितीचें वर्णन करतांना, To be चें जणु अक्षरशः केलेलें भाषांतरच वाटेल,

अशी शब्दरचना योजिलेली आहे. कृष्णमूर्तींचें To be आणि ज्ञानेश्वरांचें 'शुद्ध असणें' वा 'चोख असणें' हें एकच आहे. या 'चोख असण्या'चें स्वरूप ज्ञानेश्वरांनी एका समर्पक दृष्टान्ताने स्पष्ट केलेलें आहे. जमिनीवर घट ठेविला तर ती घटयुक्त होते आणि घट तेथून काढून घेतला तर ती घटहीन होते; पण ज्यावेळीं घटयुक्तपण आणि घटहीनपण हे दोन्हीहि भाव भूमीला शिवत नाहीत त्यावेळचें तिचें जें शुद्ध स्वरूप, तसें हें असणें नसणेंरहित 'शुद्ध असणें' आहे.

"कां भूमि कुंभ ठेविजे । तै सकुंभता आपजे ।
तो नेलिया म्हणिजे । तेणेंवीण ॥
परि दोन्ही हे भाग । न शिवती भूमीचें आंग ।
ते वेळीं भूमि तैसे चांग । चोख जें असणें ॥"

हें 'चोख असणें' म्हणजे समग्र दृश्यादृश्य विश्वांतर्गत असलेल्या आप्त-शक्तीचें स्फुरण आहे. तें कालातीत आहे. त्यामुळे कालसापेक्ष असलेल्या विचार-प्रक्रियेला त्याचें आकलन होणें अशक्य आहे. हें नीट लक्षांत घेतलें म्हणजे कृष्णमूर्तींच्या खालील विधानांचें मर्म सहज पटण्यासारखें आहे—

"Thought is continuous movement in time; this movement cannot enclose within itself a state of being which is not of time."

"The death of thought is life eternal."

"When the mind purges itself of all thought, only then is there the silence of creation."

'अध्यात्म', 'अध्यात्म' म्हणून आपण जें वरचेवर, वारंवार उच्चारतों, तें विचारप्रक्रियेच्या पलीकडे असलेलें हेंच 'चोख असणें' आहे.

"ऐशिया आपुलियाची सहज स्थिति ।
ज्या ब्रह्माची नित्यता असती ।
तया नाम सुभद्रापति ।
अध्यात्म गा ॥"

ही सहज स्थिति अनुभवणें म्हणजेच खरें जगणें आहे.

"We are always with something, with a problem, with a book, with a person and when we are alone, our thoughts are with us. To be alone, naked, is essential."

या 'शुद्ध असण्यां'तली जी महात्मता आहे, जी आनंदघनता आहे ती दुर्दैवाने आज उपेक्षित आहे. प्रतिष्ठेचीं भलतींच मूल्य सांप्रत मान्यता पावलेलीं आहेत. त्यामुळे कृष्णमूर्तींनी मोठ्या हळहळून लिहिलें आहे.

"What one does and what one has gives one importance and prestige; but man in himself as a total being seems to have hardly any significance at all."

आत्म्याच्या सहज स्थितीच्या या महात्मतेचा श्रीज्ञानेश्वर व जे. कृष्णमूर्ति यांनी जो गौरवपूर्वक पुरस्कार केलेला आहे त्यामुळे या दोघांच्या जीवनदृष्टींतील जें साम्य प्रतीत झालें तें येथे अगदी थोडक्यांत व केवळ रूपरेषात्मक स्वरूपांत मांडलें आहे. या दोघांच्या तत्त्वज्ञानांत संपूर्ण एकरूपता आहे असें सुचविण्याचा अट्टाहास येथे नाही हें स्पष्ट आहे. हा लेख लिहिण्याचा हेतु निराळा आहे. आपल्या देशांतील, इतर देशांतील, तसेंच निरनिराळ्या कालखंडांतील होऊन गेलेल्या आणि आज असलेल्या आत्मसाक्षात्कारी व्यक्तींच्या जीवनदर्शनांतील साम्यस्थळें शोधून काढून तीं जगापुढे मांडणें व त्या द्वारा मानवतेच्या एकतेच्या म्हणजेच अद्वैताच्या सिद्धीला हातभार लावणें, हें आजचें, नव्हे सदाचेंच, फार फार निकडीचें कार्य आहे. कार्य प्रचंड आहे. प्रदीर्घ काळपर्यंत चिकाटीने करीत राहावें लागणार आहे. या महान् कार्याच्या सफलतेच्या दिशेने टाकलेलें एक अगदीच इवलेसें पाऊल, असें या लेखाचें स्वरूप आहे. आत्मसाक्षात्काराच्या भूमिकेवरून पाहिलें असतां श्रीज्ञानेश्वर आणि जे. कृष्णमूर्ति यांच्यासारख्या सिद्धांच्या अनुभूतींतील एकरूपता कशी प्रतीत होतें हें खऱ्या अध्यात्मप्रेमी वाचकांस पटवून देण्याच्या जिवंत तळमळीने लेखकास हा लेख लिहावयास प्रवृत्त केलें आहे. ही तळमळ सार्थकीं लागो एवढेंच नम्र मागणें आहे.

卐

[लोककथा]

प्रकृतीची भूल

ना. रा. शेंडे

पुरातन कालची गोष्ट. पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र निसर्ग डौलानं डुलत होता. एकीकडे अथांग सागर पसरलेला तर दुसरीकडे उंचच्या उंच डोंगर आणि घनदाट जंगल पसरलेलं! कुठं डोंगर पायथ्याशी तर कुठं वनाच्या मधोमध सुंदर सुंदर अवाढव्य सरोवरं होतीं अन् कुठं विशाल नद्या पहाडा-पहाडाला वळसा घालून रानावनांत स्वच्छंदपणें वहात जात होत्या. जिकडे पहावं तिकडे सृष्टि भरदार यौवनानं कशी सजलेली होती, कशी फुललेली होती! अशा एका रम्य वनांतील एका चेतोहारि सरोवराच्या काठीं केवळ एकुलती एक पर्णकुटी उभारली गेली होती आणि तेथे केवळ एकच सुंदर स्त्री रहात होती. लावण्यानं मुसमुसलेली ती जणुं त्या सृष्टींतील वनदेवतांच म्हणा ना!—छे छे! ब्रह्मदेवानं निर्माण केलेली ती प्रकृति होती, माया होती!

या प्रकृतीच्या-मायेच्या पर्णकुटीपासून कांही दूर अंतरावर एक गगनचुंबी पहाड होता. त्या पहाडाच्या शिखरावर शंकर तपश्चर्या करीत बसला होता. त्यावेळीं अवघ्या सृष्टींत मनुष्यमात्रापैकी फक्त एकच स्त्री म्हणजे ती माया आणि एकच पुरुष म्हणजे भगवान शंकर काय तो वास करीत होता. या सृष्टींत कुणी एक स्त्री आहे हें ना शंकराला माहीत तर तेथे कुणी एक पुरुष आहे हें ना त्या मायेला माहीत. त्या संपूर्ण सृष्टीचा केवळ एक रक्षक मात्र होता आणि तो म्हणजे शेष.

त्या वनांत वाघ, सिंह, हत्ती, अस्वल आदि हिंस्त्र पशु आणि लांडगे, कोल्हे, रानगाई आदि प्राणी कसे गुण्यागोविंदानं राहत असत! हरीण, मोर, ससे, पोपट, हंस हे देखील त्या हिंस्त्र पशूंबरोबर स्वच्छंदतेनं विहार करीत असत. सरोवराकाठच्या झोंपडीभोंवती या सर्व पशुपक्षांचा कळप सदैव फिरत असे. मायेला ते वचकून व मान देऊन वावरत. मायासुद्धा त्यांचेशी दिवसभर खेळत असे. त्यांना आंजारीत गोंजारीत असे. माया आणि ती सृष्टि कशी एकजीव झाली होती!

रात्रीच्या तिसऱ्या प्रहरानंतर माया त्या रमणीय सरोवरांत आंघोळीला जात असे आणि सूर्योदय होण्यापूर्वी आपल्या झोंपडींत परत येत असे. ती स्नानाला

सरोवरांत उतरत असे तेव्हा हंस किंवा मोर तिचं निसर्गसुंदर वल्कल आपल्या चोंचेंत धरून ठेवीत असे आणि ती आंघोळीहून परतली की धाव घेऊन ते तिला तें वल्कल नेऊन देत असत. आणि मग त्या वनांतील पशुपक्ष्यांच्या सोबत ती डुलतडालत, हसतखिदळत घरीं परते. ती आपल्या झोंपडींत पाऊल ठेवी तेव्हा त्या झोपडीच्या मागून सूर्य वर डोकं काढी आणि नंतर त्या वनांत नवचैतन्य, नवउल्हास निर्माण होई.

एकदा एके दिवशीं माया नित्याप्रमाणं सरोवरांत स्नानाला गेली आणि मनसोक्त जलविहार करतां करतां ती त्या सरोवराच्या दुसऱ्या तीरावरील एका निवांत खडकावर बसली. तो काळा खडक होता आणि त्या खडकावर मायेनं चुकून बसूं नये, त्याला स्पर्शसुद्धा करूं नये असा देवांनी तिला आदेश दिला होता. पण त्या दिवशीं पोहतां पोहतां भान राहिलं नसल्यामुळं ती क्षणभर कां होईना विसाव्यासाठी म्हणून ती त्या काळचा खडकावर बसली खरी. इतक्यांत त्या खडकाच्या मागील बाजूनं एक पुरुष तो खडक चढूं लागला तेव्हा त्याला लावण्यानं मुसमुसलेली माया आढळली अन् तो जागींच थबकला. त्यावेळीं ठराविक वेळ झाली असल्यानं सूर्य झोपडीच्या माथ्यावर चढला आणि त्याच्या त्या कोंवळचा किरणांच्या प्रकाशांत त्या मनुष्याची छाया खडकावर बसलेल्या त्या सुंदर स्त्रीच्या शरीरावर पडली तोंच ती दचकली. तिनं लगबगीनं उठण्याचा प्रयत्न केला पण ती उठूं शकली नाही. त्या स्त्रीच्या विलोभनीय सौंदर्याकडे त्या पुरुषानं केवळ एक नेत्रकटाक्ष टाकला आणि परत जाण्यास पाठ फिरविली. त्यावरोवर मायाहि उठली आणि त्याचे मागोमाग जाऊं लागली. हें दृश्य सृष्टिरक्षक शेषाच्या नजरेस पडतांच तो घाबरून गेला. काय करावं तें त्याला कांही सुचेना. तो पुरुष म्हणजे भगवान शंकर होता अन् तो आपल्या आसनावर जाऊन वसेपर्यंत जर का माया म्हणजे प्रकृति तेथे गेली तर संबंध सृष्टींतच नव्हे तर स्वर्गांत देखील महान् प्रलय झाल्यावाचून रहाणार नाही या भीतीनं तो थरकांपूं लागला. त्याला एकदम नारदाची आठवण झाली आणि मग भरवेगानं त्यानं नारदाकडे धाव घेतली.

शेष नारदाकडे पोंचला तेव्हा नारद ब्रह्मदेवाकडे जाण्यास निघाला होता. लटलटा कांपत असलेल्या शेषाला पाहून आश्चर्य व्यक्त करीत नारद म्हणाला, "शेष महाराज, असं घाबरण्यासारखं काय झालं ?"

धापा टाकीत शेष उत्तरला, "काय सांगूं त्रिलोकसंचारी महाराज, काय सांगूं ! घात झाला घात !"

"घात झाला ? म्हणजे झालं काय तें तर सांगा." नारदानं कुतूहलतेनं विचारलं.

" महाराज, जी कधी न घडायची ती घटना घडली. माया सरोवरांत विहार करतां करतां थकून विसाव्यासाठी काळ्या दगडावर जाऊन वसली आणि मग·····"

" आणि मग काय झालं, शेषमहाराज ? " नारदानंहि घावऱ्या स्वरांत विचारलं.

" माया रोज तिसऱ्या प्रहरानंतर सूर्योदयापूर्वी स्नान आटोपून आपल्या झोंपडींत पाऊल टाकीत असे तेव्हा नेमक्या त्याच वेळीं भगवान् शंकर आपल्या तपाच्या नियमानुसार त्या काळ्या दगडाला स्पर्श करायला येत असे. " कांपऱ्या आवाजांत शेष म्हणाला.

" अरे बाबा, हें मला माहीत आहे. पण पुढं झालं काय ? " नारदानं किंचित रुष्ट होऊन विचारलं. तेव्हा शेष चांचरत चांचरत सांगूं लागला,

"ठराविक वेळ झाल्यानं सूर्यानं डोकं वर केलं. त्याचा प्रकाश पडला. त्या प्रकाशांत मायेचं रूप शंकराच्या दृष्टीस पडलं. तो मोहित झाला. त्यानं आपली छाया तिचेवर टाकली. आणि आता माया—नव्हे प्रकृति शंकराच्या मागोमाग जात आहे. ती का त्याच्या आसनापर्यंत गेली की मग·····"

" अरेरे ! फार मोठी दुर्घटना घडली ही !" नारद दुःखानं उद्गारला, " मोठाच पेच आहे शेष महाराज ! काय करावं आता ?"

" म्हणूनच घाव घेतली आपल्याकडे. आपणच कांही उपाययोजना करा महाराज. " हात जोडून शेष म्हणाला.

" उपाय ? " विचार करीत नारदमुनी म्हणाले, " मी आता ब्रह्मदेवाकडेच जाण्यास निघालों आहे. पहातों काय करायचं तें ! तुम्हीहि चला मजबरोबर. चला चला. घाई करा. " नारदमुनी 'नारायण नारायण' करीत पुढं चालूं लागले.

नारद आणि शेष ब्रह्मदेवाकडे गेले तेव्हा ब्रह्मदेव एक सुंदर मूर्ति घडविण्यांत मग्न झाले होते. नारदानं 'नारायण नारायण' करतांच ते भानावर येऊन म्हणाले, " यावं नारदमुनीजी. काय विशेष खबर आहे ?"

" काय सांगूं भगवन् ? पृथ्वीच्या पाठीवर एक भयंकर घटना घडत आहे आणि आपण मूर्ति घडविण्यांत तल्लीन झाला आहात. नारायण नारायण !" नारद थोड्या चेतावणीच्या स्वरांत म्हणाले.

" काय झालं नारदमुनीजी ? " नारदाकडे नवलानं पहात ब्रह्मदेवानं विचारलं.

" घात झाला आहे, भगवन् घात झाला आहे. भगवान शंकराच्या तपश्चर्येनं प्रकृति मूळ स्थानावरून ढळली आहे भगवन् ! होणार, आता महा प्रळय होणार !"

" प्रकृति मूळ स्थानावरून ढळली ? काय सांगतां मुनी महाराज ? " हातांतील मूर्ति बाजूला ठेवून ब्रह्मदेव ताडकन् उभे होत म्हणाले.

" खरं तेंच सांगतो भगवन्. इतकंच नव्हे तर प्रकृति भगवान शंकराच्या मागोमाग जात आहे आणि मग....." नारदानं शेषाकडे पाहिलं आणि शेषानं घडलं तें ब्रह्मदेवाला सांगितलं.

ब्रह्मदेवाची मति कुंठित झाली. शेवटीं ते म्हणाले " मुनी महाराज, प्रकृति निकोप रहायला हवी. ती डागळतां कामा नये. त्याशिवाय जगाचे व्यवहार सुरळीत चालूं शकणार नाहीत. प्रकृति निर्माण करण्याचं कार्य मीं केलं—तशी बंधनंसुद्धा मीं घालून दिलीं पण बंधनाबाहेर जात असलेल्या प्रकृतीला मात्र मी आवरूं शकत नाही, मुक्त-करूं शकत नाही. आणि ती तर मुक्त होऊन मूळ स्थळीं येणं आवश्यक आहे. जा. त्वरा करा. देवश्रेष्ठ विष्णुदेव यांचेकडे जा." ब्रह्मदेव काकुळतीनं म्हणाले.

" जशी आज्ञा " म्हणून नारद आणि शेष विष्णुदेवाकडे गेले. विष्णुदेव सागरांच्या लाटांवर पहुडून कसल्यातरी विचारांत मग्न झाले होते. ' नारायण नारायण ! ' हा नारदमुनींचा ध्वनि ऐकतांच त्यांनी नेत्र उघडून पाहिलं तेव्हा नारद आणि शेष हात जोडून त्यांच्यापुढं उभे होते.

" काय आहे नारदमुनी ? कसे कष्ट घेतलेत येण्याचे ? " विष्णुदेवानं शांतपणें विचारलं.

नारदानं प्रकृति आणि भगवान् शंकराची तपश्चर्या यांचेसंबंधी घडलेली घटना सांगितली. तेव्हा विष्णुदेव किंचित खिन्न स्वरांत म्हणाले, " मुनीमहाराज, मला तें माहीत आहे. काय करावं याचाच विचार करीत होतों. आपण त्रिलोक भ्रमण करीत असता. आपल्याला अनेक अनुभव येतात. तेव्हा आपण कांही उपाय सुचवा ना. "

" महाराज, मी तर आपल्या आज्ञेचा पालनकर्ता. घडलेली घटना तर भयंकर आहे. त्यांतून भगवान् शंकराशीं गांठ ! " नारद लीनतेनं म्हणाले.

" होय. खरं आहे नारदमुनी. पण तुमच्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. नाहीतर केवढा हाहाःकार होईल याची तुम्हाला कल्पना आहेच ! " विष्णुदेव म्हणाले.

"होय स्वामी. परंतु भगवान् शंकर तप करीत असतांना त्याच्या मार्गांत मात्र जाण्यास मी असमर्थ आहे, मला क्षमा करावी. " हात जोडून नारद उत्तरले.

" मग कांही उपाय सांगा. कळ फिरविण्याची युक्ति तरी सांगा. तुमच्यासारखा चाणाक्ष आणि बुद्धिवान् मुनीच कांही तोड सुचवूं शकेल. " विष्णुदेव कातर स्वरांत म्हणाले,

नारदानं क्षणभर विचार केला अन् मग चुटकी वाजवून ते म्हणाले, "एक उपाय आहे, भगवंत !"

" सांगा, सांगा. कोणता उपाय तो ?" विष्णुदेवानं आतुरतेनं विचारलं.

" पण तो उपाय अमलांत आणणं मोठं कठिण काम आहे. जीवावर बेतल्याशिवाय रहाणार नाही !" कचरतच नारद म्हणाले.

" पुढं काय तें पाहूं नारदमुनी; पण प्रकृति मूळ स्थानीं येण्यास काय करावं तें लवकर सांगा. थोडा अवकाश आहे तोहि निघून जात आहे. सांगा, उपाय सांगा " विष्णुदेव नारदाच्या खांद्यावर ममतेनं हात ठेवीत विचारूं लागले.

नारदानं क्षणभर डोळे मिटले अन् मग ते शेषाकडें नजर टाकून म्हणाले " जगत्पाल, सृष्टिरक्षक शेषाला आपण आज्ञा करावी. "

" कोणती आज्ञा, नारदमुनी ?" विष्णुदेवानं विचारलं.

" या शेषानं त्वरित जाऊन, भगवान् शंकर आसनावर बसण्या आधीच त्यांना दंश करावा !" नारद भीत भीतच म्हणाले.

" भगवान् शंकराला दंश ?"

" होय स्वामी. भगवान् शंकराला दंश ! त्यांना दंश होतांच ते जमिनीवर कोसळतील - म्हणजे ते तपासनावर बसूं शकणार नाहीत आणि प्रकृति मूळ स्थानीं परत येईल. त्याशिवाय आता दुसरा उपाय नाही स्वामी !" नादर गंभीर होऊन म्हणाले.

"आणि भगवान् शंकर दंशानं खालीं कोसळल्यावर त्यांचं कसं काय, मुनीजी ?" चिंतेनं विष्णुदेवानं विचारलं.

" आहे. त्यावरहि एक उपाय आहे. " नारद म्हणाले.

" तोहि उपाय सांगा नारदमुनी. "

नारद क्षणिकच स्तब्ध राहिले आणि नंतर म्हणाले,

" दंश होऊन भगवान् शंकर कोसळल्यावर प्रकृति जशी आली तशीच परत आपल्या स्थानीं परत गेली हें पाहून, शेषानं भगवान् शंकराच्या शरीरांत भिनलेलं विष शोषून घ्यावं !" नारदानं उपाय सुचविला.

" ठीक आहे. पण भगवान् शंकराच्या तपस्येचा भंग झाला म्हणून जो परिणाम होईल तो...?" विष्णुदेवानं उलट पृच्छा केली.

" जो परिणाम होईल तो भोगला पाहिजे भगवन् ! त्यासाठी मात्र मला तरी कांही सांगतां येणार नाही." आपली असमर्थता प्रगट करीत नारदानं उत्तर दिलं. यावर भगवान् विष्णुदेव कांहीच बोलले नाहीत. त्यांनी शेषाकडे

नजर रोखली. तेव्हा शेष हात जोडून म्हणाला, "जशी भगवंताची आज्ञा. जो परिणाम होईल तो मी लोककल्याणार्थ मोठ्या आनंदानं भोगीन."

"मग हे सृष्टिरक्षका जा; आणि लोककल्याणार्थ आज्ञेचं तावडतोब पालन कर." विष्णुदेवानं आज्ञा केली.

"जशी प्रभूची आज्ञा." विष्णुदेव आणि नारद यांना लवून प्रणाम करून शेष वेगानं निघून गेला. 'नारायण नारायण' म्हणत नारदहि गुप्त झाले.

★ ★ ★

विष्णुदेवाची आज्ञा शिरसावंद्य मानून शेष भरवेगानं इकडे तिकडे न पहातां, कुठं न थांबतां सरळ भगवान् शंकराच्या आसनाशेजारीं जाऊन पोंचला. त्यावेळीं शंकर शेवटलं पाऊल उचलून आसनावर बसणार तोंच शेषानं त्याच्या पायाला कडकडून दंश केला. दंश होतांच भगवान् आर्त किंकाळी फोडून धाडकन् खालीं कोसळले! तेव्हा त्यांच्या मागोमाग येणारी प्रकृति क्षणभर जागच्या जागीं थबकली आणि मग पाठ फिरवून ती परत आपल्या पर्णकुटीकडे जाण्यास निघाली. तिच्या मागोमाग सृष्टिरक्षक शेषहि निघाला. प्रकृति जेव्हा आपल्या मूळ स्थानीं येऊन पोंचली तेव्हा ती कुठं भानावर आली आणि मग तिनं लगबगीनं आपल्या पर्णकुटींत नित्याच्या स्वच्छंदतेनं प्रवेश केला. त्यावेळीं स्वर्गींतील देवदेवतांनी त्या पर्णकुटीवर पुष्पांचा वर्षाव केला. हें पाहून शेषानं समाधानाचा निःश्वास टाकला!

त्यानंतर शेष आपली दुसरी जबाबदारी पूर्ण करण्यासाठी परत फिरला. तो भगवान् शंकर कोसळून पडला होता तेथे आला. आणि मग त्यानं शंकराच्या शरीरांत भिनलेलं विष शोषून काढलं. तोंच भगवान् शंकर शुद्धीवर येऊन उठून उभे झाले. त्यांनी इकडे तिकडे कावरीबावरी नजर टाकली पण त्यांना कुठंहि त्यांच्या मागोमाग येणारी प्रकृति आढळली नाही. नंतर त्यांची नजर पायाच्या थोड्या दूर अंतरावर असलेल्या शेषावर पडली तोंच त्यांनी त्या शेषाला शाप दिला, "अरे दुष्ट शेष, तूं माझ्यापासून प्रकृतीला मुक्त केलंस अन् मला दंश करून माझा तपोभंग केलास म्हणून तुला प्रायश्चित भोगलंच पाहिजे. जा. आजपासून साऱ्या सृष्टीचा भार आपल्या डोक्यावर घेऊन राहशील, जा."

शेषानं भगवान् शंकराला प्रणाम करून त्यांनी दिलेली शिक्षा मान्य केली आणि तेथून तो निमूटपणें निघून गेला. त्या दिवसापासून सर्व पृथ्वीचा भार शेषाच्या डोक्यावर आहे, असें आपण समजतों.

卐

शिक्षणविषयक कांहीं जिव्हाळ्याचे प्रश्न

के. तु. मंगळमूर्ति

प्राचीन काळीं

विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती हें शिक्षणाचें ध्येय आहे, असें म्हणतां येईल. उन्नतीची क्रिया मनुष्यजन्माला आल्यापासून सुरू होते आणि मरेतोपर्यंत ती अव्याहतपणें चालू असते. त्याला चालणें बोलणें शिकविण्यापासून तों तो साधारणपणें १५-१६ वर्षांचा होईपर्यंत त्याचें चारित्र्य घडविण्याची जबाबदारी बव्हंशी मातापित्याकडेच असते. पण त्यांत सुद्धा आणि इतर शिक्षणविषयक बाबतींत गुरूचा म्हणजे शिक्षकाचा हात असतोच. प्राचीनकाळीं मुलगा आठ वर्षांचा झाला म्हणजे त्याला गुरुगृहीं पाठविण्याची प्रथा असे. त्यामुळे गुरूचें त्याच्याकडे २४ तास लक्ष असे व गुरु त्याला योग्य रीतीने मार्गदर्शन करूं शकत असे. एका गुरूकडून शक्य तें सर्व ज्ञान मिळवून घेतल्यानंतर पुढचा पल्ला गाठण्यासाठी तो गुरु त्या शिष्याला दुसऱ्या गुरुच्या आश्रमांत पाठविण्यास तयार असे. अशा रीतीने मुलाची विद्यार्थीदशा संपेपर्यंत त्याला गुरूच्या नजरेखाली आपलें जीवन व्यतीत करण्याची संधि आपोआप मिळत असे. शिष्याची बैठक पक्की झाली आहे, हें गुरूने ओळखल्यानंतर मग गुरूची जबाबदारी केवळ मार्गदर्शनापुरतीच राही. जुन्या काळांत नालंदासारख्या विद्यापिठांत विद्यादानाची प्रथा अशाच स्वरूपाची होती.

अशा प्रकारची शिक्षणविषयक व्यवस्था आपल्या देशांत प्राचीन काळीं होती. पुढे त्या व्यवस्थेंत समाजाच्या बदलत्या परिस्थितीमुळे कसकसे फेरबदल घडून आले त्यासंबंधीची माहिती पूर्णपणें उपलब्ध नाही; परंतु ब्रिटिश अमदानीच्या पूर्वी आणि कांही काळ नंतरसुद्धा जी व्यवस्था होती तिच्यासंबंधी माहिती उपलब्ध आहे. प्रत्येक लहानमोठ्या गावांत जें देवस्थान असेल त्याचा पुजारी अथवा ग्रामजोशी हाच बहुधा त्या क्षेत्रांतील मुलांना संस्कृतप्राकृतादीचे धडे देत असे. मुसलमान वस्तींत ही कामगिरी मशिदीशीं संबंध असलेल्या मुल्ला मौलवीकडे जात असे. त्या अवस्थेंतहि शिक्षकाचें विद्यार्थ्याकडे व्यक्तिशः लक्ष असे.

इंग्रजी अमलांत

ह्या पुढच्या काळात इंग्रजांनीं निर्माण केलेली शिक्षणव्यवस्था उदयाला आली. ह्या व्यवस्थेंत निव्वळ शिक्षणविषयक कार्यालाच वाहून घेतलेल्या आणि पगारी शिक्षकांकडून चालविलेल्या अशा शाळा निर्माण झाल्या.

शिक्षणाच्या या नव्या व्यवस्थेंत बऱ्याच नवीन गोष्टी आल्या. त्यांतल्या कांही चांगल्या तर कांही सदोषहि आहेत. त्या दोषांपैकी एक फार मोठा दोष म्हणजे विद्यार्थ्यांकडे व्यक्तिशः पूर्ण लक्ष देणें शिक्षकाला अशक्य व्हावें एवढ्या संख्येची विद्यार्थ्यांत वाढ. हा दोष आजच्या प्राथमिक शिक्षणापासून तों विश्व-विद्यालयीन शिक्षणापर्यंत एकसारखा वाढत्या प्रमाणांत अनुभवास येतो आणि त्याचा परिणाम म्हणजे प्रत्येक परीक्षेंत शेकडा ५० टक्के तरी विद्यार्थि नापास होतात, हा होय. त्याचा अर्थ, दरवर्षी शिक्षणापायीं विद्यार्थ्यांवर होणारा खर्च आणि शिक्षकांचे केले गेलेले श्रम त्यांचा अर्धा भाग तरी व्यर्थच जातो, असा होतो. राष्ट्राच्या दृष्टीनें ही फार मोठी हानि आहे.

ह्या व्यवस्थेंत आलेला दुसरा दोष म्हणजे, शिक्षकाच्या कार्याला योग्य नसणाऱ्या कांही व्यक्तींचा भरणा होणें हा होय. ह्यामुळे शिक्षणदानाचें काम तर मागे पडतेंच पण त्या बरोबरच, विद्यार्थ्यांकडे व्यक्तिशः लक्ष पुरविण्याची जी थोडी फार सोय एरव्ही होऊं शकली असती तीहि अशक्य होऊन बसली. अशा अपात्र शिक्षकांचा भरणा झाल्यामुळे दुसराहि एक अनवस्था प्रसंग उत्पन्न झालेला दिसतो. अंगच्या गुणांच्या आणि पात्रतेच्या बळावर पुढे येणें त्या शिक्षकांना तर शक्यच नसतें पण पुढे येण्याची धडपड मात्र त्यांची चालूच असते. आणि मग आपली आकांक्षा पूर्ण करून घेण्यासाठी ते वाटेल त्या मार्गाचें अव-लंबन करतात. या सर्व भानगडींत विद्यार्थ्यांचें मात्र अपरंपार नुकसान होत असतें. शिवाय विद्यालयाचें वातावरण गढूळ होतें हें निराळेंच. त्याचाच एक परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनांत गुरूबद्दलच्या आदरभावाला ओहोटी लागणें हा होय. त्यामुळेच समाजांत शिक्षकाला योग्य तो मानहि मिळत नाही. ही परिस्थिति फारच दुःखदायक आहे व ती शक्य तितक्या लवकर दुरुस्त व्हावयास हवी.

आर्थिक परिस्थितीचा प्रभाव

आजच्या काळांत मनुष्याचा दर्जा त्याच्या आर्थिक परिस्थितीवरून ठर-विल्या जातो, हें मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाही. शिक्षकाची आर्थिक परिस्थिति इतर क्षेत्रांतील माणसाच्या तुलनेनें अधिक हलाखीची आहे, हें सत्य आहे व त्यांत सुधारणा होणें अत्यावश्यक आहे.

आज विद्यार्थी हा खऱ्या अर्थानें विद्यार्थी नाही, असें म्हणणें फारसें चुकीचें होणार नाही. जिज्ञासावृत्ति आणि ज्ञानलालसा हीं त्यांच्या ठिकाणीं फारच अल्पप्रमाणांत दिसते. ज्ञानार्जनासाठीं आवश्यक ते श्रम करण्याची आजच्या विद्यार्थ्यांची तयारी नाही. ह्याचें कारण कांही प्रमाणांत अयोग्य शिक्षकांचा भरणा हें जसें वर सांगितलें, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भोवतालचें दूषित वातावरण हेंहि एक दुसरें कारण आहे. हें सभोवतालचें दूषित वातावरण निरनिराळ्या प्रकारचें आहे आणि तें अधिकाधिक बिघडविण्यास आजचे चित्रपट आणि वरेचसें वाङ्मय ह्यांचा फार मोठा वाटा आहे. ह्या गोष्टींवर सुवुद्ध नियंत्रण असणें अत्यंत आवश्यक आहे. ही जबाबदारी समाजाची व सरकारची आहे व ती त्यांनी पार पाडलीच पाहिजे. तसें न झाल्यास शिक्षणांत सुधारणा होणें अशक्य आहे.

कांही विधायक सूचना

शिक्षणांत विद्यार्थ्याकडे लक्ष असणें हें किती महत्वाचें आहे ह्याचा उल्लेख वर आलाच आहे. चालू परिस्थिति बदलून, विद्यार्थ्यांकडे व्यक्तिशः लक्ष देऊन त्याची उन्नति प्रतिदिनी होत जाईल, अशी व्यवस्था सर्व संस्थांतून झाल्याशिवाय शिक्षणांत सुधारणा होणें शक्य नाही. ह्यांत मुख्य अडचण पैशाची. वर्ग मोठे ठेवावे लागतात. कारण त्याशिवाय शाळेचा खर्च भागत नाही. ह्या कोंडींतून बाहेर निघण्याचा एक मार्ग असा : वर्गांतील हुशार विद्यार्थ्यांनी आपल्या कमी हुशार असलेल्या वर्गबंधूंना, जें त्यांना वर्गांत किंवा प्रयोगशाळेंत समजलें नसेल तें समजावून देणें. त्याचा फायदा कमी हुशार विद्यार्थ्यांना तर होईलच पण हुशार विद्यार्थ्यांना देखील होईल. कारण शिकलेला विषय दुसऱ्यास शिकविला म्हणजे तो जास्त उत्तम रीतीने आत्मसात् करतां येतो. ही अनुभवाची गोष्ट आहे. वर्गांतील प्रत्येक हुशार विद्यार्थ्याला त्याचे घराजवळ राहणाऱ्या त्याचे वर्गांतील ४-५ विद्यार्थ्यांची जबाबदारी, त्याला त्यांचा नायक नेमून सोपवावी. हें मुख्यतः दुय्यम शिक्षणसंस्थांतून चांगल्या रीतीने यशस्वी होईल. तसेंच प्रत्येक वर्गाच्या प्रत्येक तुकडींत एक वर्ग-समिति निर्माण करावी व त्या समितीकडे खेळांची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वर्गाची खोली स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी, अशासारखीं कामें सोपवावीं. जबाबदारी अंगावर पडली की माणसाच्या अंगचे सुप्त गुणहि आपोआप जागे होतात. अर्थात् हें सर्व शिक्षकाच्या देखरेखीखालींच व्हावयास हवे.

हाच प्रयोग महाविद्यालयांतहि होऊं शकतो. तेथे तर आणखी अशीहि सोय करतां येईल की, पदवी परिक्षेसाठी अभ्यास करणारे वरच्या वर्गांतील

विद्यार्थी प्रि युनिव्हर्सिटीचे विद्यार्थ्यांना प्रयोग शाळेंत मार्गदर्शन करूं शकतील. तसेंच टयुटोरिअलचे वर्ग घेऊं शकतील. ह्या कामाकरिता गरीब हुशार विद्यार्थ्यांना थोडा पैशाचे रूपानें मोबदला देऊन त्यांच्या स्वतःच्या शिक्षणाला मदत करतां येईल. ज्यांना अशा मदतीची जरूर नाही त्यांना प्रशस्तिपत्रें द्यावींत.

परीक्षा पद्धतींत सुधारणा

दुसरी महत्त्वाची सुधारणा म्हणजे हल्लीच्या परीक्षापद्धतींत बदल. आज असें म्हणावयास हरकत नाही की,—मुलगा शाळेंत किंवा महाविद्यालयांत जातो, तें परीक्षेची तयारी करण्याकरिता. शिकतो तें परीक्षा पास होण्याकरिता. आणि दुर्दैवानें असें म्हणावें लागतें की, शिकविण्यांत देखील दृष्टि परिक्षेचे तयारीचीच असते. चांगलें ज्ञान देऊन तें विद्यार्थ्याकडून आत्मसात करवून घेण्याची नसते. सारा जोर, बुद्धि व विषयाचें ज्ञान यांचा वाढ करण्यावर नसून फक्त परिक्षेची तयारी करण्यावरच असतो. त्याला पाहिजे तेवढें प्रायोगिक ज्ञान व अनुभव न मिळाल्यामुळे त्याची भिस्त वाचलेलें लक्षांत ठेवून उत्तरें लिहिण्यावरच असते. म्हणजे जोर स्मरणशक्तीवर असतो. विषय चांगला समजावून घेण्यावर नसतो. ही पद्धति बदललीच पाहिजे. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामाचाहि विचार होऊन परिक्षेचा निकाल लावला तर तो आपला अभ्यास किंवा प्रयोगशाळेंतील काम रोजचे रोज बरोबर व आस्थेनें करील. त्या कामाचें मूल्यमापन करितांना त्याचा प्रयोगशाळेंतील रेकार्ड व त्याचें तेथील शिक्षकाचें मत हें लक्षांत घ्यावें लागेल. त्यानें टयुटोरिअल व प्रयोगशाळेंत त्याच्या अभ्यासाशीं संबंध असलेल्या सभोवतालच्या वस्तूंपैकी एक तरी वस्तु तयार केली पाहिजे; व भोवतालच्या घटनांपैकी एखाद्या घटनेचा अभ्यास करून त्यावर आपले विचार लेखाचे रूपानें व्यक्त केले पाहिजेत. आणि त्यानें तयार केलेली वस्तु आणि तो लेख परीक्षेचा निकाल लावतांना विचारांत घेतले गेले पाहिजेत.

शिक्षक कसा असावा ?

तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे शिक्षक कसा असावा ? त्याचें लक्ष व्यक्तिशः विद्यार्थ्यांच्या कल्याणाकडे असलें पाहिजे. त्यानें आपल्या विद्यार्थ्यांवर स्वतःच्या मुलांसारखें प्रेम करून त्यांचीं मनें जिंकलीं पाहिजेत. त्या शिक्षकाची वागणूक आदर उत्पन्न करणारी असली पाहिजे. शिक्षकाच्या कर्तृत्वाचा व चारित्र्याचा ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर उमटून विद्यार्थ्यांत त्या चारित्र्याचें अनुकरण करण्याची इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. गुरूच्या कर्तृत्वशक्तीनें त्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वशक्तीला चालना मिळाली पाहिजे. शिक्षक हा उत्तम वक्ता नसला तरी

विद्यार्थ्यांचें लक्ष वेधील इतका चांगला वक्ता पाहिजे तो गुण त्याचे ठिकाणीं नसला तर त्याने तो प्रयत्न करून मिळविला पाहिजे. तसेंच त्या शिक्षकाला मानसशास्त्राचें ज्ञान त्याचें शिकविण्याचे कार्याला लागेल इतकें असलेंच पाहिजे.

'शिक्षण आणि जीवन !

आणखी एक विचार लक्षांत घेणें जरूर आहे. आज शिक्षणाचा संबंध जीवनाशीं फारच थोडा आहे. जीवनाचे लहानसहान प्रश्नसुद्धा सोडविण्याची विद्यार्थ्यांचे अंगीं क्षमता नसते. शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. पण शाळाकॉलेजांतून शिक्षण संपवून बाहेर पडल्यावर त्यांना नोकरी-साठी धडपड करावी लागते. बेकारीला तोंड द्यावें लागतें. कारण एकतर त्यांना काम मिळत नाही व जें काम मिळू शकतें त्यासाठी ते अपात्र ठरतात. आजचें शिक्षण आपल्या गरजा पूर्ण करण्यास उपयुक्त नाही. शिक्षणपद्धति अशी असावी की, शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर विद्यार्थ्यांना आपल्या पायावर उभें राहतां आलें पाहिजें. एवढेंच नव्हे, तर आज देशांत ज्याची जरूर आहे अशा प्रकारचें शिक्षण त्यांना मिळून ते समाजाला व देशाला उपयुक्त ठरले पाहिजेत.

शिक्षणाचा खर्च

आजचें शिक्षण फार खर्चाचें झालें आहे, ही ओरड पालकांकडून दिवसें-दिवस वाढत्या प्रमाणांत होत आहे. तिकडेहि लक्ष देण्यांत आलेंच पाहिजे. नाही तर चांगल्या मुलांना योग्य शिक्षणाला मुकावें लागेल. शिक्षणाचा खर्च विद्या-र्थ्यांना स्वत:लाच सहन करतां येईल अशी सोय शिक्षणांत झाली पाहिजे हें तत्त्व लक्षांत ठेऊन शिक्षणसंस्थांनी अभ्यासक्रमांत किंवा त्याबाहेर विद्यार्थ्यांना काम करून मोबदला मिळवितां येईल अशी व्यवस्था करावयास पाहिजे. शक्य अस-ल्यास त्या कामाचा संबंध देशांतील गरजा भागविण्याकडे असला पाहिजे.

गुरु–शिष्य संबंध !

शिक्षणांत गुरुशिष्य संबंध हा मुख्य संबंध असतो. पण संस्थेच्या व्यवस्थे-साठी संस्थाचालक, मग तो सरकारी असो किंवा त्या संस्थेची कार्यकारिणी असो, किंवा विश्वविद्यालयांतील कार्यकारी मंडळी असो, त्यांचाहि विद्यार्थ्यांशी संबंध येतो. त्या संबंधाविषयी थोडेसें लिहिण्याची जरूर आहे. संस्थापकांनी गुरुशिष्य संबंध ज्या रीतीने उत्तम राहतील अशीच व्यवस्था केली पाहिजे. शिक्षक हा एक केंद्रस्थान असतो व त्याचे भोंवती एक शिक्षणविषयक वातावरण तयार होत असतें. तें वातावरण कायम राहील अशी व्यवस्थापकांची व्यवस्था पाहिजे.

अनुक्रमणिका

शिक्षकांच्या बदल्या वारंवार केल्यामुळे पुष्कळ नुकसान झालें आहे. व्यवस्थापकांनी अगदीच जरूर असल्याशिवाय बदल्या करूं नयेत.

तसेंच, नव्या प्रयोगांना पूर्ण वाव देण्यांत यावा. व्यवस्थापकांचा दृष्टिकोन आपण गुरुशिष्य संबंधाचे रक्षण करणारे आहोत व शिक्षणांत जे प्रयोग होतील त्याला मदत करणारे आहोंत, असाच पाहिजे.

आपला मागासलेपणा

आज आपण शास्त्रीय ज्ञानांत आणि यंत्रज्ञानांत जगाचे फार पाठिमागे आहोंत. एवढेंच नव्हे तर आपल्या पूर्वजांनी न्यायशास्त्र आणि तत्वज्ञान या विषयांत जो उच्चांक गाठला होता व ज्याविषयी पाश्चात्य लोकांनी अभ्यास करून त्याविषयीं आदर दाखविला आहे, त्यांना आपल्या शिक्षणक्रमांत योग्य स्थान मिळालें नाही व त्याविषयी आपणास फारच थोडी माहिती आहे. तसेंच संशोधनाचे बाबतींत आपण फारच मागे आहोंत. इतर गोष्टी पाहिल्या तरी त्यांत आपल्याला फारच प्रगति करावयाची आहे. ही प्रगति वर दिलेल्या पद्धतीने होण्यासारखी आहे व त्याचा विचार संस्था चालकांकडून व गुरुजनांकडून, तसेंच विद्यार्थ्यांकडून व्हावा अशी विनंती आहे.

हें लिखाण टीका करण्याच्या बुद्धीने केलेलें नाही. जीव कळवळतो म्हणून व या प्रश्नांना चालना मिळावी, ह्या बुद्धीनेच हें लिहिलेलें आहे. सूज्ञांकडून ह्या देशाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा योग्य तो विचार होईल, ही आशा बाळगतों.

卐

अनुक्रमणिका

एक अजब व्यक्तिचित्र

गंपू भटजी

शंकर बाळाजी शास्त्री

दसऱ्याचें नवरात्र सुरू होऊन तीन-चार दिवस लोटले होते. हें नवरात्र म्हणजे देवीचें कुल-दैवत म्हणून आराधना करणाऱ्यांच्या घरांत तर एक पर्वणीच असते. पण गेल्या कांही वर्षांपासून तें आमच्या शहराच्या जीवनांतहि एक मोठें धूमधडाक्याचें पर्व होऊन बसलें आहे. ह्या दिवसांत आमच्या शहरांतल्या बंगाली शाळेच्या विशाल प्रांगणांत एक जंगी प्रदर्शन भरविण्यांत येतें. श्रीदुर्गादेवीच्या पूजेच्या निमित्ताने हा सोहळा होत असतो म्हणून त्याला दुर्गा-पूजा-प्रदर्शन असें नांव देण्यांत येत असतें. दररोज हजारों लोक प्रदर्शन पहायला येतात. दहा दिवसांत अक्षरशः लक्षावधि माणसें हें प्रदर्शन पाहून जातात. तिकिट-विक्री व इतर उत्पन्नाचा आकडा कित्येक हजारांवर जातो. ह्या उत्पन्नांतून शाळेचा योगक्षेम चालत असतो.

उत्सव-प्रियता ही माणसाच्या स्वभावांतच मुरलेली आहे. त्याला धार्मिक भावनेचीहि जोड मिळाल्यामुळे, या प्रदर्शनाचे वेळीं आसपासच्या खेड्यापाड्यां-तूनहि लोकांची एकच गर्दी आमच्या शहराकडे लोटत असते. शहरांतले बचे लोक तर अमाप संख्येने इकडे लोटत असतातच. संध्याकाळचे चार-सहा तास म्हणजे प्रदर्शनाच्या पटांगणांत ही गर्दी! तेथील व्यवस्था पाहण्यापायीं पोलि-सांच्या अगदी नाकीं नऊ येतात. निरनिराळ्या संस्थांचे शेकडों स्वयंसेवक त्यांना हातभार लावतात तें निराळेच. हें सर्व असूनहि दररोज होऊं नये ते प्रकार या ठिकाणीं होण्याचे कांही थांबत नाही. आणि तरीहि, गर्दी करण्याचे लोक कांही सोडीत नाहीत.

ही पर्वणी साधून चार पैसे कमावण्याच्या बुद्धीने तऱ्हेतऱ्हेचे दुकानदार जसे आपल्या मालाचें प्रदर्शन येथे थाटून बसलेले असतात, तसेच दुसरेहि अनेक 'धंदे' करणारे लोकहि प्रदर्शनांत वावरत असतातच. लोक तर असें देखील बोलतात की, कलकत्ता-मुंबईसारख्या दूरदूरच्या शहरांतूनहि या प्रसंगीं आपला लग्गा साधून घेण्यासाठी कांही खास 'धंदेवाईक' लोकांच्या टोळ्या आमच्या शहरांत यावेळीं तळ ठोकून बसलेल्या असतात. खरें खोटें देव जाणे!

पोरांनी हट्ट धरला म्हणून, मलाहि त्या दिवशीं प्रदर्शन पहायला जाणें भाग पडलें. मी गेलों. थोडा वेळ मुलांना घेऊन मी इकडे तिकडे भटकलों. जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट. तऱ्हेतऱ्हेच्या विक्रीसाठी मांडलेल्या वस्तूंचा झगझगाट, लोकांचा आरडा–ओरडा, लाऊड–स्पीकर्सचा गोंगाट, नुसता गोंधळच गोंधळ ! या सर्वांचा मला लवकरच कंटाळा आला. अशांतच मला दोन–तीन माझे स्नेही तेथे भटकतांना दिसले. तेहि माझ्यासारखेच कंटाळलेले होते, पण बावा लोकांच्या उतू जाणाऱ्या उत्साहापुढे अगदी अगतिक बनल्यासारखे दिसत होते.

आम्ही सर्वांनी आपापलीं मुलें एका चांगल्या जाणत्या–सवरत्या मोठ्या मुलाच्या स्वाधीन केलीं, त्यांना सारें प्रदर्शन पोटभर दाखवून आणण्यास त्याला सांगितलें, आणि आम्ही तास दोन तास गप्पा मारीत बसण्यासाठी म्हणून त्यांतल्या त्यांत एका निवांत अशा कोपऱ्यांत गवतावर जाऊन बसलों.

आमच्या गप्पा सुरू झाल्या. भोवतालच्या वातावरणांतील उत्साह नाही म्हटलें तरीं थोडाफार आमच्या मनांतहि संचारला होता. त्यामुळे गप्पांना चांगला रंग भरला होता.

अशांतच, पलीकडच्या एका कोपऱ्यांतून एकाएकी एक निराळयाच तऱ्हेचा ओरडा सुरू झालेला आमच्या कानीं आला. 'पकडो !–पकडो'च्या आरोळ्या, धावपळ, पोलिस शिपायांचे आवाज, शिट्ट्या,–एकच गोंधळ तेथे सुरू असलेला आम्हाला दिसला. आम्ही सारेजण, काय झालें असावें त्याचा मनोमन अदमास घेत त्या दिशेकडे उत्सुकतेने पाहूं लागलों.

कांही वेळाने आम्हाला जी माहिती कळली ती अशी. गर्दीत कोणी तरी एका सूटबूट घालून प्रदर्शन पाहत हिंडणाऱ्या गावठी साहेबाचा खिसा कोणी तरी कापला होता. त्या साहेबाच्या ती गोष्ट ताबडतोब लक्षांत आली होती. आपल्या खिशावर डल्ला मारणाऱ्या इसमालाहि त्याने ओझरतें पाहिलें होतें. पण तो इसम गर्दीत निसटून जाण्याच्या प्रयत्नांत होता. साहेबाने ओरड केली. लोक धावले, स्वयंसेवक धावले. पोलिस शिपाईहि धावले. पण खिसेकापू भामटा कांही त्यांच्या हातीं लागलेला दिसला नाही.

क्षणभरासाठी वावटळ येऊन जावी, तिने पाण्यांत खळबळ उत्पन्न करावी, आणि ती वावटळ निघून जातांच पाण्यावर उसळणारा थयथयाट पुन्हा निवल्यासारखा व्हावा, तसाच प्रकार येथेहि झाला लोकांनी अभावितपणें आपापले खिसे एकदा नीट चाचपलें, आणि ते "सांभाळा रे ! नीट जपून रहा !" असें एकमेकांना बजावीत पुन्हा प्रदर्शनांत हिंडायला लागले. बिचारा गावठी साहेब

तावातावाने प्रदर्शनांतील पोलिस अधिकाऱ्याकडे आपली फिर्याद नोंदविण्यासाठी निघून गेला होता.

आम्हाला बोलायला एक नवीनच विषय सापडला ! चांगला लज्जतदार आणि खुसखुशीत !

" बरं झालं !—साहेबाची वेटयाची छान जिरली !" एक म्हणाला. " मोठ्या ऐटींत फिरत होता, मारे पाटलूनांच्या खिशांत हात घालून !—घे म्हणावं आता !"

" म्हणजे काय ? धोतर--पायजामा घालणाऱ्यावर असा प्रसंग येत नाही वाटतं ? "

" तुम्ही कांहीहि म्हणा, पण आपल्या लोकांचं चारित्र्य अन् नीतिमत्ता अगदी रसातळाला जायला लागली आहे, हेंच खरं ! म्हणूनच हे प्रकार होताहेत आताशा ! "

" तुम्ही म्हणा वाटेल तर तसं. पण मला निराळंच वाटतं."

" काय वाटतं तुम्हाला ? "

" मला वाटतं नुसत्या चरित्र्याचा अन् नीतिमत्तेचा विचार करून काम भागणार नाही. मूळ कारणाचा शोध जर आपल्याला लावायचा असेल तर आपल्याला ह्या गोष्टींच्या पलीकडे पहायला पाहिजे."

" म्हणजे कुठे "

" माणसाच्या मनांत चोरी करण्याची, खिसे कापण्याची प्रवृत्ति कां उत्पन्न होते? "

" कां होते उत्पन्न ?—तुम्हीच सांगून टाका, झालं. "

" कारण, परिस्थिति !--दारिद्र्य !--पोटाची भूक—तीच माणसाला असलीं कामं करायला भाग पाडते ! "

" हिअर--हिअर !"

" तुम्ही थट्टा करा, हवी तर ! पण मी म्हणतों तेंच खरं आहे !"

" मला, बाबा निराळंच वाटतं !—मला वाटतं, आपलं सरकारच मुळी नालायक आहे !"

" शावास !--"

" नाही तर काय !--अरे, हीं प्रदर्शनं आज नव्याने का भरत आहेत ?—पण, पूर्वी नव्हते कुठे होत हे असले प्रकार ?—आपण ह्या मुंबई राज्यांत सामील झालों, अन् हा गोंधळ सुरू झाला !-- "

" अस्सं !—म्हणजे, आपण महाविदर्भवादी आहांत वाटतं !"

अनुक्रमणिका

"छे, छे!--तसा मी आहे संयुक्त महाराष्ट्रवादीच!--पण, खरं तें सांगितलंच पाहिजे ना! समाजांत ज्या कांही बऱ्या वाईट प्रवृत्ति वोकाळतात, त्याला मुख्य कारण म्हणजे सरकारच!—म्हटलंच आहे ना,--राजा कालस्य कारणम्!"

"हं ऽ!--म्हणजे, तुम्ही आम्हीच ह्याला कारण आहोंत म्हणायचे!–कारण आता राज्य तुमचं आमचंच नाही का?—प्रजातंत्र, लोकराज्य आहे ना आता!"

"तुमचं राजकारण कांही म्हणो, पण मला वाटतं, माणसानें आपलं आपल्या हातांनी राखावं अन् लोकांना यश द्यावं!—आणावेतच कशाला पैसे खिशांत, प्रदर्शन पहायला येतांना? अन् आणले, तर ते नीट जपायला नको?"

"म्हणजे, चोरा–चिलटांच्या अन् भामटयांच्या भीतीनें आम्ही रात्रंदिवस डोळे ताणून असावं, अन् सरकारनें खुशाल झोपा काढाव्या!"

ही सारी वादावादी मी स्पष्टपणें ऐकत बसलों होतों. चर्चा थंड पडत चालली असें पाहून मी म्हणालों, "ह्यांनी सांगितलं तें कांही खोटं नाही. हे असले उचलेगिरीचे प्रकार आजकालच उताला आल्यासारखें होऊं लागले आहेत, हें कांही खोटं नाही. ह्यापूर्वी कित्येक वर्षे खिसेकापूपणा आपल्या शहरांत फारसा ऐकायला येत नव्हता, पण त्याचं श्रेय सरकारला मात्र नव्हतं."

"मग कुणाला तर?"

"तें श्रेय द्यायला पाहिजे, आमच्या गंपू भटजींना!" मी म्हटलें.

"गंपू भटजींना?—हे गपू भटजी कोण बुवा?" दोघा–तिघांनी एकदम पृच्छा केली.

"सांगतों, ऐका." मी म्हणालों. "तुम्ही ह्या व्यक्तीला पाहिलंदेखील असेल. आपल्या ह्या शहरांतच राहतात ते."

"असं?"

"हं. पायांत खडावा, कंबरेला धोतर, अंगावर असलं तर उपरणं नाहीतर खांद्यावर नुसता पंचाच टाकलेला, कपाळावर भस्माचे ठसठशीत पट्टे ओढलेले, आणि वर, डोक्यावर हॅट घालून सायकलीवर टांग मारून सिव्हिल लाईनीच्या अन् धंतोली–सीताबर्डीच्या रस्त्यांवरून जाणाऱ्या एका भटजीला तुम्ही पाहिलं नाही?"

"हो,—हो!—पाहिलं आहे आम्ही!—तेच का तुम्ही म्हणतां ते गंपू भटजी?"

"हं!—एका विद्वान् भिक्षुकाच्या घरांत त्यांचा जन्म झालेला आहे. आपली वडिलोपार्जित वृत्तीच त्यांनीहि चालविलेली आहे. आजकाल लोकांचा

देवा-धर्मावर तेवढासा विश्वास उरलेला नाही. कुळधर्म-कुळाचारालाहि लोक फारसा मान देईनासे झालेले आहेत. त्यामुळे भिक्षुकांच्या धंद्यालाहि ओहोटीच लागलेली आहे हें खरं. पण गंपू भटजी अद्यापिहि त्याला चिकटून आहेत. आमच्या घरींहि ते येत असतात अधून-मधून पूजा-पाठ वगैरे कांही असलं म्हणजे—मोठा उमदा माणूस आहे पहा."

"असं ?"

"—लहानपणापासून तालमीचा त्यांना फार शौक. अखाड्यांत कुस्ती खेळायची, दंड-बैठका काढायच्या, अन् घरांत वडील देतील ती संथा घेऊन मजेंत रहायचें. आपल्या वडिलांच्या बरोबर गंपूनाना आमच्या घरीं नेहमी येत. माझ्याशीं त्यांचें चांगलेंच मेतकूट जमलें होतें. पुढे, वडील निवर्तल्यानंतर त्यांचा भिक्षुकीचा भार गंपूनानांनीच आपल्याकडे घेतला आणि ते यजमानांच्या घरचीं कुळधर्म-कुळाचाराचीं वगैरे कामें पार पाडूं लागले. त्यांचे वडील निवर्तल्यानंतर एके दिवशीं फारच गंमत झाली बघा."

"कसली गंमत ?"

"गंपू भटजींचें घराणें फार जुनें आहे. आज अनेक पिढ्या घराण्यांत जुन्या संस्कृत शास्त्रांचं वगैरे अध्ययन चालू असे. गंपूनानांचे आजोबा तर पट्टीचे विद्वान म्हणून, काशीपासून तों रामेश्वरापर्यंत त्यांचा लौकिक होता. आज त्या गोष्टीला मान नाही ही गोष्ट सोडा ! काळाच्या प्रभावामुळे म्हणा किंवा दुसऱ्या कांही कारणामुळे म्हणा, गंपू भटजींच्या जवळ आपल्या पूर्वजांची ती विद्वत्ता नाही, हा भाग वेगळा. पण आपल्या घराण्याबद्दलचा अभिमान मात्र गंपूनानांच्या अंतःकरणांत ठासून भरलेला आहे. त्यांच्या घरीं बऱ्याचशा हस्तलिखित पोथ्या आजहि आहेत. दर वर्षी वर्षांतून एक दोनदा त्या साऱ्या पोथ्या नीट उघडायच्या, त्यांना ऊन दाखवायचें, त्यांना कसर वगैरे लागूं नये याची काळजी घ्यायची, एवढीच काय ती गंपूभटजींची या ग्रंथांची सेवा. पण ती ते अगदी मन लावून करतात अन् त्या ग्रंथसंपत्तीला अगदी वडिलोपार्जित इस्टेटीसारखें जपत असतात, एवढें मात्र खरें."

"अरे वा ?—"

"तर, एकदा झालें काय, की गंपूनाना माझ्याकडे आले व म्हणाले, भैय्या-साहेब, तुमचे ते महामहोपाध्याय जोशी कसे काय गृहस्थ आहेत हो ?"

मी विचारलें, "कोणते म. म. जोशी ?" त्यावर ते म्हणाले, "ते हो, ते कॉलेजांत प्रोफेसर आहेत ते ?"

मी म्हणालों, "ते जोशी ना ?—ते मला चांगले ठाऊक आहेत. माझे प्रोफेसरच होते ना ते !"

गंपू भटजी म्हणाले, " तें मला ठाऊक आहे. म्हणूनच मी तुम्हाला विचारायला आलों आहे. लोक म्हणतात तसा तो खरोखरीच विद्वान् मनुष्य आहे का हो ? "

मी म्हटलें, " —तुम्ही हा प्रश्न विचारून मला मोठ्या अडचणींत पाडतां आहांत, गंपू भटजी. ते माझे प्रोफेसर होते. त्यांच्याबद्दल अनुदारपणाचे उद्‍गार मी कसे काढूं ?-–पण एक गोष्ट मात्र खरी.--या आजच्या काळांत नांवलौकिक व्हायला माणसाच्या अंगीं खरी खरी विद्वत्ता असलीच पाहिजे, असं कांही नाही. दुसऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्या असल्या की माणसाचा विद्वान् म्हणून लौकिक वाढतो, सरकार दरबारींहि त्याला मान-मान्यता मिळवून घेतां येते.--तें तंत्रच निराळें आहे, गंपू भटजी ! "

ते म्हणाले, " समजलों,--आलं लक्षांत, आता ये म्हणावं त्या म. म. ला. मग दाखवितों त्याला या गंपू भटजीचा हिसका. "

मी विचारलें, " अहो पण गंपू भटजी, झालं काय, तें तरी सांगा ?"

त्यावर ते म्हणाले, " तुमच्या त्या प्रोफेसरला माझ्याकडच्या जुन्या हस्त-लिखित पोथ्या हव्या आहेत. तो त्यांवर संशोधन करणार आहे म्हणे !--"

मी म्हटलें, " मग देऊन टाकाना त्या त्यांना ? नाहीतरी तुम्हाला त्यांचा कांही उपयोग नाहीच. "

यावर गंपूभटजी रागावून म्हणाले, " मला उपयोग असो किंवा नसो. पण मी माझ्या वाडवडिलांचा हा ठेवा या भंपक माणसाच्या स्वाधीन करणार नाही. त्याने माझ्या मागे सारखी भुणभुण लावली आहे. खरं म्हणजे, योग्य माणसाला मी त्या दिल्याहि असत्या. पण याच्या सारख्याला···छे !--आता ये म्हणावं उद्या, अन् जा घेऊन पोथ्या ! कसा नेतो तेंच पाहतों मी !"

मी विचारलें, " कां ?काय करायचा बेत आहे तुमचा ?"

गंपूभटजी हसले व म्हणाले,--"तें कळेलच तुम्हाला, भैय्यासाहेब. "

त्यानंतर जें मला कळलं तें विचित्रच होतं.

" काय ?--काय कळलं तुम्हाला ?"

" अहो, आता काय सांगूं तुम्हाला ?—आमच्या या गंपू भटजींना साप-विंचवाचे मंत्र पुष्कळसे येतात. त्याच्या जोडीला, विंचू पाळण्याचाहि त्या गृहस्थाला शौक आहे. झालं बाबा—दुसऱ्या दिवशीं म. म. जोशी पोथ्या नेण्या-साठी म्हणून आले. गंपू भटजींनी त्यांचं मोठ्या आदरानं स्वागत केलं. कोपऱ्यांत रचून ठेवलेल्या पोथ्यांच्या ढिगाकडे ते त्यांना घेऊन गेले. प्रोफेसरांनी मोठ्या आतुरतेने वरच्याच एका पोथीला हात घातला. ते तिची बनात सोडूं लागले,

आणि एकदम किंचाळतच, हात झटकून ते उभे राहिले. त्यांचें तोंड वेदनेने काळें पिवळें पडलें होतें. तोंडावाटे एकसारखा 'अरे बाप रे!'चा घोष सुरू होता. त्यांच्या बोटाला विंचू डसला होता? गंपूनाना नुसते तोंडदेखलेपणाने 'अरे अरे!' करीत बाजूला उभे होते. तेंव्हापासून प्रोफेसरसाहेबांनी गंपूभटजींच्या पोथ्यांचें नांव टाकलें!"

"चांगलेच पराक्रमी दिसताहेत हे तुमचे भटजीबुवा?--"

"तें खरं. पण त्यांचा या खिसेकापू सोद्यांच्या बाबतींतला—"

"सांगतों!--तेंच सांगतों आहे मी आता." मी म्हणालों, "मी आताच तुम्हाला सांगितला तो प्रसंग घडून गेल्यानंतर बरेच दिवसपर्यंत गंपूभटजी आमच्याकडे फिरकले नव्हते. मलाहि त्याचें विशेष कांही वाटलें नव्हतें. पण एके दिवशीं संध्याकाळीं अगदी अचानकपणें त्यांकडून निरोप आला, निरोपहि अगदी अनपेक्षित असाच होता."

"काय निरोप आला?"

"भटजींनी मला अगदी तावडतोब पोलिस ठाण्यावर यायला कळविलें होतें. तेथे त्यांना म्हणे पकडून ठेवण्यांत आलें होतें, अन् जमानत घेण्यासाठी त्यांनी मला बोलावणें पाठविलें होतें!"

"भटजींना पोलिसांनी पकडलें?"

"हं!--मी तसाच उठलों, अन् पोलिस ठाण्यावर गेलों. तेथे पाहतों तों एका लाकडी बाकड्यावर गंपूभटजी मजेंत गुडघ्यावर पाय आडवा टाकून बसलेले. त्यांच्या शेजारीं मळकट चेहेऱ्याचा, बोटभर दाढी वाढलेला, डोक्यावर गांधी टोपी अन् अंगांत खादीचा शुभ्र सद्रा घातलेला एक इसम उजव्या हाताचें मनगट डाव्या हातांत धरून बसला होता. त्याची मुद्रा पराकाष्ठेची कष्टी आणि घावरलेली दिसत होती. तो मधून मधून गंपूभटजीकडे खुनशी नजरेने पाही, आणि नंतर आपली केविलवाणी दृष्टि समोर टेबलाशीं खुर्चीवर बसलेल्या पोलिस इन्स्पेक्टराकडे वळवी.

हा प्रकार काय असावा तें माझ्या लक्षांत येईना. मी प्रश्नांकित दृष्टीने एकदा गंपूभटजीकडे पाहिलें आणि विचारलें, "हा काय प्रकार आहे, गंपूभटजी? मला कशासाठी बोलावणें?"

गंपूभटजींनी अगदी निर्विकार मुद्रेने किंचित् हसल्यासारखें करून माझ्याकडे पाहिलें, आणि त्यानंतर, डोळ्यांनीच, इन्स्पेक्टरकडे जाण्याची मला खूण केली.

मी पोलिस इन्स्पेक्टरांना विचारलें,—"ही काय भानगड आहे, इन्स्पेक्टर साहेब?"

पोलिस इन्स्पेक्टर म्हणाला, " या गृहस्थाला तुम्ही ओळखतां ?"

मी होकारदर्शक मान हालविली. त्यावर इन्स्पेक्टर म्हणाला, "हा फार भयंकर माणूस दिसतो ! व्हेरी डेन्जरस ! "

मी विचारलें, " कां काय केलं त्यानं ?"

इन्स्पेक्टर सांगूं लागला, " ह्या विचाऱ्या माणसाचा जीव घ्यायचाच काय तो शिल्लक ठेवला आहे ह्यानें !—अहो, हा तुमचा दोस्त संध्याकाळचा बाजारांत हिंडत होता. गर्दींत ह्या दुसऱ्या इसमानें त्याच्या सदऱ्याच्या खिशांत हात घातला. तों काय ! खिशांत भला मोठा विंचू ! असा सपाटून तडाखा मारला त्या विंचवानें ह्याला, की अगदी डोळे पांढरे होण्याची पाळी आली ह्याच्यावर !—पहा ना, कसा हात सुजला आहे त्याचा ! "

काय प्रकार असावा तें मी तावडतोब ओळखलं. तो दुसरा खादीधारी इसम खिसेकापू मवाली होता. त्यानें गंपू भटजींवर आपला प्रयोग करून पाहिला, पण प्रकरण त्याच्याच अंगाशीं आलें होतें.

मी इन्स्पेक्टरला म्हटलें, " पण ह्यांत भटजींचा गुन्हा कोणता झाला ? त्यांच्या खिशांत ह्या माणसानें चोरी करण्यासाठी हात घातला, अन् तुम्ही विचाऱ्या भटजींनाच उलट पकडून ठेवलें ! हा कुठला न्याय ? "

इन्स्पेक्टर म्हणाला, " हें पहा भैय्यासाहेब, कोणाचा काय गुन्हा आहे तें कोर्ट ठरवील. तुमचा हा दोस्त गुन्हेगार नाही, असें कांही मला वाटत नाही. भर बाजारांत खिशांत विंचू घेऊन हिंडणं, म्हणजे दुसऱ्याच्या जिवाला धोका आहे. अन् तो गुन्हा ह्यानें केला आहे. मी ह्याला कोर्टापुढे उभा करणार आहें !— "

" पण, "—मी मध्येच म्हणालों.

" इन्स्पेक्टर चिडून म्हणाला, " तें तुमचं पण नि बीण मला कांही सांगूं नका, जें कांही सांगायचं तें कोर्टांतच सांगा. मी ह्या माणसावर आरोप ठेवणार, हें नक्की !— "

त्या अडमुठ्या माणसापुढे अधिक वाद घालीत बसण्यांत अर्थच नव्हता. मी गंपूभटजींची जमानत घेतली अन् त्यांना घरीं आणलें.

कोर्टांत खटला सुरू झाला त्यावेळीं भटजींनी सारी हकीकत न्यायाधीशांना सांगितली. न्यायाधीशानेंहि सारें कांही ऐकून घेतलें अन् निकाल दिला.

" काय दिला निकाल ?"

" दुसरा काय ?—खिशांत विंचू ठेवून चारचौघांत हिंडणें म्हणजे पब्लिक सेफ्टीच्या दृष्टीनें गुन्हा आहे असें जरी असलें तरी खिसेकापूंना दहशत बसावी म्हणून भटजींनी हा प्रयोग केला होता. पण अशा रीतीनें कायदा आपल्या हातांत

घेणें कांही क्षम्य नाही, तरी पण, एकंदर प्रकरणाची मौज वाटून म्हणा, किंवा मॅजिस्ट्रेट साहेबांचा स्वतःचाच खिसा मागे एकदा कापला गेल्याचें दुःख त्यांना जाणवत असल्यामुळे म्हणा, त्यांनी गंपूभटजींना नुसती समज देऊन सोडून दिलें. जातां जातां भटजींनी न्यायाधीशांना विनंती केली, " सरकार, परवानगी असेल तर एक गोष्ट विचारतों."

न्यायाधीश म्हणाले, " काय विचारायचं आहे तुम्हाला ?

भटजी म्हणाले, " नुसता सदरा घालून, कोणालाहि सहज हात घालतां येईल अशा त्या सदऱ्याच्या उघड्या खिशांत विंचू ठेवून हिंडणं, हा गुन्हा आहे, असा कोर्टानें निकाल दिला आहे. मला तो निकाल मान्यच आहे. पण सरकार, समजा, मी अंगांत चांगला कोट घातला, त्या कोटाला वर झाकणासारखें कांही तरी असून गुंडी लावून खिसा बंद करण्याची सोय असली, अन् त्या खिशांत विंचू ठेवून मी हिंडलों, तर तो गुन्हा होईल का ? "

न्यायाधीश बुचकळ्यांत पडले ! काय उत्तर द्यावें तें त्यांना सुचेना. थोडा वेळ विचार केल्यासारखें करून ते खालच्या स्वरांत म्हणाले, " नाही, तसें तुम्ही केलें तर कदाचित् तो गुन्हा होणार नाही. पण हें मत मी खासगी रीतीनें तुम्हांला सांगतों आहे. न्यायाधीश म्हणून नव्हें हें विसरूं नका. जा आता."

गंपूभटजी विजयी मुद्रेनें हसत हसत कोर्टाच्या बाहेर पडले, आणि सरळ माझ्याकडे आले. काय झालें होतें तें सारें मला कळलें होतेंच, भटजी म्हणाले,— " काय वाटेल तें होवो. पण आपण तर आता कोट पाटलून घालूनच हिंडत जाणार ! बस्स, ठरलं ! "

मी त्यांना सुचविलं, " तुमचा हेतु माझ्या लक्षांत आला गंपू भटजी. पण त्यापासून कांही फारसं निष्पन्न होईल असं कांही मला वाटत नाही. तुमच्या कोटाच्या खिशांत विंचू असतात ही गोष्ट खिसेकापू मवाल्यांना कळायला फारसा वेळ कांही लागणार नाही. अन् मग ते तुमच्या एकट्याच्या वाटेला जाण्याचं नांव सोडतील, फार झालं तर. पण त्यामुळे इतर लोकांचा बचाव कसा होणार ? खिसेकापूंना आळा कसा बसणार ? "

माझं म्हणणं भटजींनाहि पटलं. ते विचारांत पडले. पण थोड्याच वेळांत त्यांच्या डोक्यांत कोणती तरी कल्पना आली. त्यासरशीं ते टाळी वाजवून म्हणाले, " सापडली युक्ति ! "

मी विचारलें, " कोणती युक्ति सापडली, गंपू भटजी ? "

त्यांनी उत्तर दिलं, " चार दिवस थांबा. मग प्रत्यक्षच दाखवितों तुम्हाला."

चार दिवसांनंतर गंपू भटजी माझ्याकडे आले आणि त्यांनी म्हटलें, " भैय्यासाहेब, तुमचा कोट कुठे आहे ? "

मी म्हटलें, "माझा कोट ?—तो पहा समोर, खुंटीवर. कां ? कशाला हवा तुम्हाला कोट माझा ? "

पण भटजी कांही बोलले नाहीत. ते सरळ गेले आणि खुंटीवरून माझा कोट काढून तो माझ्यापुढे धरीत म्हणाले, "कसा काय वाटतो तुम्हांला हा आता ? "

मी माझ्या कोटाकडे पाहिलें, आणि मोठ्याने दचकलोंच. माझ्या कोटाच्या बाहेरच्या खिशावर चांगला भला मोठा विंचू !

मी म्हटलें, "हें पहा गंपू भटजी तुमचे हे उपद्व्याप तुम्ही थोडे बाहेरच केले तर चालणार नाही कां ? "

भटजी हसून म्हणाले, "अहो, पण मला विंचवाचा मंत्र येतो आहे, भैय्यासाहेब ! घाबरतां तुम्ही ! "

"तुम्ही आपल्या जवळच ठेवा तुमचे ते विंचू अन् त्यांचे मंत्र ! मला नको त्यांचा उपसर्ग ! " मी म्हणालों. गंपू भटजीने मोठ्या साळसूदपणाचा आव आणून म्हटलं, "बरं बुवा ! नको तर राहिलं आमचं." आणि असें म्हणून त्यांनी तो माझ्या खिशावरचा विंचू धरला आणि माझ्या पुढे टेबलावर टाकला. मी पाहिलें, तो विंचू खरा नव्हता. कसल्या तरी धातूचा बनविलेला होता. आणि आपण फाउन्टन पेनसाठी वापरतों तशासारखी एक क्लिप त्याला असल्यामुळे तो धातूचा विंचू खिशावर अगदी बेमालूमपणें चिकटून बसे. मी विचारलें, "हें कशासाठी, गंपू भटजी ? "

भटजी म्हणाले, "हे असले विंचू मी पुष्कळ तयार करून आणले आहेत. ते सारे आपण आपल्या मित्रमंडळींत अगदी गुपचुप वाटून टाकूं. माझ्या खिशांतल्या विंचवाचा प्रताप आता खिसेकापू मंडळींत जगजाहीर झालाच आहे. मी वर्तमानपत्रांत उद्यापासून जाहिरात देणार आहे. विंचवाचा मंत्र वाटेल त्याला अगदी फुकट शिकवणार आहे म्हणून. त्याबरोबरच, कोणालाहि बिनधोकपणे विंचू जवळ बाळगतां येण्याची कला शिकवायला मी, तयार असल्याचेंहि त्या जाहिरातींत सांगणार आहे.—त्यानंतर आपले मित्र हे नकली विंचू आपल्या कोटाला, शर्टला ऐटींत चिकटवून रस्त्यांतून हिंडतील. मवाल्यांना वाटेल,—"

"आलं, आलं लक्षांत, गंपू भटजी ! तुमची युक्ति खरोखरीच अगदी नामी आहे."

आणि तेव्हापासून आपल्या शहरांत तरी खिसेकापू लोकांचा त्रास कितीतरी वर्षें बंदच पडला होता. पण हृचा गेल्या दोन तीन वर्षांत तो पुन्हा सुरू झालेल

अनुक्रमणिका

दिसतो. लोकांच्या अंगाखांद्यावर खेळणारे विंचू खरे नाहीत, नकली आहेत ही ही गोष्ट मवाल्यांनी ओळखली असावी बहुतेक !"

"तुमचे गंपू भटजी म्हणजे चांगलीच वल्ली दिसते !" एक मित्र म्हणाला.

I म्हटलें, "अहो वल्ली म्हणजे काय !—त्यांचे पराक्रम किती म्हणून सांगा --"

"इतक्यांत तो गावठी साहेब आमच्यापासून थोडयाच अंतरावर बडबडत असलेला दिसला.--'ये साले पुलिस अधिकारी--ये साले सफेद टोपीवालोंका राज...'

त्याची ती संतापाच्या भरांत चाललेली बडबड ऐकून आम्हा सर्वांना हसूं लोटलें. जरा गम्मत करावी म्हणून मी त्या साहेबाला विचारलें,

"काय साहेब सापडला का खिसेकापू ?"

"सापडला ? तुम्हाला काय वेडबीड तर लागलं नाही. अहो, हें सफेद टोपीवाल्यांचं राज्य आहे. सारा देश सफाचट केल्याशिवाय हे राहणार नाही."

मी मराठींत विचारलें होतें म्हणून साहेब हिंदी सोडून मराठींत बोलूं लागले होते. ते पुन्हा तावातावाने म्हणाले--

"अहो, या सफेद लुटारूंना धडा शिकविणारे कोणीच कसे नाहीत या देशांत ? हा देश इतका कसा हतबल झाला ? अहो, मी साहेब दिसतों, पण मी गरीब माणूस आहें. माझी महिन्याभराची सारी मिळकत त्या सफेद टोपीवाल्या खिसेकापूनं हातोहात लांबविली कि हो ! अन् हे बेटे पोलिस अधिकारी; तक्रार करायला गेलों तर माझीच खिल्ली उडवूं लागले ! खात त्यांचे व या सफेद टोपीवाल्या खिसेकापूंचे कांही तरी साटेलोटे असलेंच पाहिजे..."

शेवटी हताश होऊन तो उद्‌गारला, "याला कांहीच इलाज नाही का हो ?"

आम्हा सर्वांना त्याची खरोखरच दया आली--

इतक्यांत जवळच गलबला ऐकू आला. 'अरे बाप रे मेलो, मेलो...'

त्या गावठी साहेबासहित आम्ही जवळ जाऊन पाहतो तों काय—

गावठी साहेबाच्या पोषाखांत गंपू भटजी विज मुद्रेने त्या 'मेलों, मेलों' म्हणणाऱ्या सफेद टोपीवाल्याकडे पाहत मोठ्या ऐटींत उभे होते !

नुकताच आमचा मित्र झालेला गावठी साहेब त्या विव्हळणाऱ्या माणसा-जवळ गेला. त्याला निरखून पाहतांच, 'अरे हाच तो लफंगा, हाच तो खिसेकापू, यानंच माझा खिसा कापून मला आत्ताच लुबाडलं"

हे ऐकतांच गंपू भटजी त्या खिसेकापूवाल्याला दरडावून म्हणाले—

" दे यांचे पैसे ताबडतोब. नाही तर पहा, माझ्याशीं गांठ आहे. "

" देतों साहेब. देतों बघा. पण माझा विंचू उतरवून द्या. अरे बापरे—आता नाही सोसवत. "

" पैसे पटक आधी. मग एका क्षणांत तुझा विंचू उतरवून देतों. " गंपू भटजी राजाच्या रुबाबाने म्हणाले.

खिसेकापूने त्या गावठी साहेबाचे पैशाचें पाकीट त्याच्या स्वाधीन केलें. लगेच गंपू भटजी पुढे सरसावले. त्यांनी त्याचा विंचू पाहतां पाहतां उतरवून दिला. सर्व बघे अगदी थक्क झाले ! त्रिचाऱ्या गावठी साहेबाने तर गंपू भटजींच्या पायावर डोकेंच ठेवलें !

★ ★ ★

आपापल्या मुलाबाळांना घेऊन आम्ही वाटेला लागलों. आमच्यापैकीच एक उद्गारला—

" या निराश-हताश परिस्थितीवरहि तोडगा आहे तर ! अखेरीस आपली पुरातन मंत्रशक्तीच देशाला तारील असं दिसतं "

—असे आहेत आमचे गंपूभटजी !

卐

अनुक्रमणिका

पांच संस्कृत नाटकें

ग. त्र्यं. माडखोलकर

पाश्चात्य नाटकें व संस्कृत नाटकें

पाश्चात्य संशोधक, पंडित आणि कवि यांनी कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकाची प्रशंसा मुक्त कंठानें करून त्याची शेक्सपीअरशी तुलना केल्यापासून संस्कृत नाट्यवाङ्मय हें पाश्चात्य नाट्यवाङ्मयाइतकेंच समृद्ध आणि वैचित्र्यपूर्ण आहे, असा समज आपल्याकडे प्रचलित झाला. पण तो समज मुळीच खरा नाही. पाश्चात्य नाटककारांपैकी एकटा शेक्सपीअर जरी घेतला, तरी त्याच्या नाटकांत जे लोकचरितांचें आश्चर्यकारक वैचित्र्य आणि जी नाना रसांची विविधता दृष्टीस पडते, तिचा आढळ संस्कृत नाट्यवाङ्मयांत मुळीच होत नाही. किंबहुना, ज्या कालिदासाचा गौरव 'भारताचा शेक्सपीअर' म्हणून करण्यांत येतो, त्याचीं जीं 'मालविकाग्निमित्र', 'विक्रमोर्वशीय' आणि 'अभिज्ञानशाकुन्तल' हीं तीन नाटकें आज उपलब्ध आहेत त्यांतहि म्हणण्यासारखें वैचित्र्य नाही; व शाकुन्तला-च्या तुलनेनेंच केवळ नव्हेत, तर इतरहि उत्कृष्ट मानल्या गेलेल्या संस्कृत नाटकांच्या तुलनेनें त्याची दुसरीं दोन नाटकें अगदी उणीं आणि फिकीं वाटतात. कालिदासापेक्षा भासाच्या नाटकांत वैचित्र्य आणि विविधता हे दोन्ही गुण निस्संशय अधिक आहेत. इतकेंच नव्हे, तर संस्कृत नाटककारांत भास हा बहुधा एकच नाटककार असा दाखवितां येईल की, ज्याच्या नाटकांत आपल्याला मानवी जीवनाच्या विविधतेचें जास्तींत जास्त दर्शन घडतें.

वैशिष्टयपूर्ण नाटकें पांचच

संस्कृत नाट्यवाङ्मयांत, माझ्या समजुतीने, निरनिराळ्या दृष्टींनी वैशिष्टय-पूर्ण अशीं नाटकें फक्त पांचच आहेत. ती म्हणजे (१) मृच्छकटिक (२) शाकुंतल (३) मुद्राराक्षस (४) उत्तररामचरित आणि (५) वेणीसंहार हीं होत. या पांच नाटकांपैकी शाकुन्तल, उत्तररामचरित आणि वेणीसंहार हीं तीन नाटकें पौराणिक आहेत, व मृच्छकटिक आणि मुद्राराक्षस हीं लौकिक आहेत. मृच्छकटिक, शाकुंतल आणि उत्तररामचरित या तीन नाटकांतील प्रधान वर्ण्यविषय स्त्रीपुरुषांचें प्रेम

हा आहे. फरक इतकाच पण अत्यंत महत्वाचा असा आहे की, मृच्छकटिक नाटकांत चारुदत्त आणि वसंतसेना यांच्या प्रणयकथेच्या अनुषंगाने तत्कालीन राज्यक्रांतीचं हि कथा मोठ्या कौशल्याने ग्रथित केलेली आहे; व नायक आणि नायिका यांच्यावर आलेल्या संकटांचा निरास होऊन त्यांचें प्रणयजीवन सफल व्हावयाला राज्यक्रांति हीच बव्हंशीं कारण झालेली असल्यामुळे, प्रीतिकथा आणि क्रांतिकथा यांचा बेमालुम मेळ घालण्यांत नाटककाराला स्पृहणीय यश लाभलेलें आहे.

प्रणयाचे प्रकार

शाकुन्तल आणि उत्तरामचरित या दोन नाटकांतील वर्ण्यविषय जरी स्त्री-पुरुषांचें प्रेम हाच एक असला, तरी त्यांतहि महत्त्वाचा फरक आहे. शाकुन्तलांत मुग्ध अननुभवी मुनिकन्या आणि विदग्ध मुरब्बी राजा या दोघांचा प्रणय, गांधर्व विवाह आणि तज्जन्य आपत्ति यांचें चित्र रेखाटलेलें आहे, व राजाने शेवटीं शकुन्तलेचा पुत्रासह स्वीकार केल्यामुळे जरी नाटक सुखपर्यवसायी होत असलें, तरी त्यांतील प्रणयकथा मात्र सुखकर वाटत नाही. उत्तररामचरितांत राम आणि सीता यांचें प्रौढ, परिणत दांपत्यप्रेम वर्णन केलेलें आहे; व त्यांतील आसन्नप्रसव सीतेच्या त्यागाचा प्रसंग जरी हृदयाला पीळ पाडणारा असला आणि त्यामुळे नाटक जरी करुण रसाने ओथंबून जात असलें, तरी त्यांतील दांपत्यप्रेमाची कथा मनावर मोठी धीरोदात्त परिणाम करते. मृच्छकटिकांतील स्त्रीपुरुषांचें प्रेम हें अनैतिक आणि अप्रशस्त वाटण्यासारखें आहे तरी सुद्धा वसंतसेना, धूता आणि चारुदत्त यांनी एकमेकांसाठी चढाओढीने केलेल्या त्यागामुळे आणि एकमेकांविषयींच्या गुणानुरक्तीमुळे त्या नाटकांतील प्रणयकथेला इतकी कांही उदात्तता आलेली आहे की, त्यांतील प्रणयाची अनैतिकता आपण मुद्दाम आठवण केल्याशिवाय कांही आपल्याला जाणवत नाही. उत्तररामचरित आणि मृच्छकटिक या दोन्ही नाटकांत वर्णन केलेला प्रणय हा त्यागप्रधान आहे; व गुणानुरक्ति हें त्या प्रणयाचें वैशिष्टच आहे. उलट, 'शाकुन्तलां'तील प्रणय हा विकारप्रधान असून यौवनांतील एक प्रवळ ऊर्मि या पलिकडे त्याला महत्त्व नाही.

मुद्राराक्षसाचें वैशिष्टच

मुद्राराक्षस आणि वेणीसंहार हीं दोन्ही नाटकें वरील तीन नाटकांहून अगदी भिन्न आहेत. मुद्राराक्षसांत कोणत्याहि प्रकारचा शृंगार अजिबात नाही. इतकेंच नव्हे, तर प्रणय आणि शृंगार यांना अजिबात थारा न देतांनासुद्धा केवळ राजकीय घटनांवर उभारलेलें नाटकहि कसें उत्कृष्ट रीतीने रंगूं शकतें, याचें सर्वांगसुंदर उदाहरण म्हणून त्या नाटकाकडे बोट दाखवितां येईल. त्यांत फक्त एकच स्त्रीपात्र एकदम येतें; पण तें केवळ शोक करण्यासाठी ! या नाटकांत

जसा शृंगार नाही, तसाच विनोदहि नाही. नायिका नाही तसाच विदूषकहि नाही. नाटकाचा नायक खरोखरी कोण आहे, हें सांगणेंहि कठीण जाईल. शाकुन्तलाप्रमाणेच याहि नाटकांत अंगठी ही कथानकाची कारक दाखविलेली आहे. पण पहिल्या नाटकांत ती वियोग आणि मीलन घडवून आणतें, तर दुसऱ्या नाटकांत ती चाणक्याची कूटनीति यशस्वी करून दाखविते. सगळ्या संस्कृत नाट्यवाङ्मयांत लोकचरिताचें वैचित्र्य आणि विविध रसांचा उत्कर्ष या दोन गुणांच्या बाबतींत मृच्छकटिकाशीं तुल्य असें नाटक फक्त एवढेंच आहे, असें म्हणतां येईल. शिवाय, संस्कृतमधे जीं थोडीं ऐतिहासिक स्वरूपाचीं नाटकें आहेत, त्या सर्वांत, इतिहास आणि कला या दोन्ही दृष्टींनी हें नाटक श्रेष्ठ ठरेल. मी तर असेंहि म्हणेन की केवळ राजकीय घटनांवर लिहिलेलें शृंगारवर्ज, पण रसपूर्ण असें दुसरें प्रभावशाली नाटक जगाच्या वाङ्मयांत दाखवितां येणार नाही.

वीररसप्रधान वेणीसंहार

वेणीसंहार हें नाटक या चार नाटकांच्या दृष्टीने कांही बाबतींत हीणकस ठरेल. त्याची रचना सैल आहे; व कथानकाचे दुवेहि नीट जुळल्यासारखे वाटत नाहीत. या नाटकांत वीररस प्रधान आहे. त्यांत विनोद नाही आणि शृंगार थोडा आला असला, तरी तो आल्हाददायक वाटत नाही. याहि नाटकाचा नायक खरोखरी कोण आहे, हें सांगणें कठीण जाईल. तसेंच, उत्तररामचरिताप्रमाणे हें नाटकहि सुखान्त आहे की दुःखान्त आहे, हें ठरविणेंहि तितकेंच कठीण जाईल. दुर्योधनाला जर नाटकाचा नायक मानला, तर नाटक दुःखान्त आहे, असें म्हणावें लागेल. तथापि हें नाटकहि मुद्राराक्षसाप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण असून, त्यांतील प्रसंग मनाला हलवून सोडणारे आहेत.

या पांच संस्कृत नाटकांविषयीं गेलीं पस्तीस वर्षे माझ्या मनांत जे विचार घोळत आहेत, त्यांचें हें केवळ जुजबी टांचण आहे. वस्तुतः नाट्यशास्त्राच्या आणि मानवी जीवनाच्या दृष्टीने या प्रत्येक नाटकाचें सांगोपांग परीक्षण आणि विवरण होणें अवश्य आहे. कारण त्यांतील जीवनदर्शन हें निरनिराळ्या दृष्टींनी लोकोत्तर असून, प्रत्येक नाटक हें आपापल्या परीने जीवनाचा एक अगदी वेगळाच आदर्श आपल्या डोळ्यांपुढे उभा करते; व त्याच्या अनुषंगाने अनेक गुंतागुंतीच्या सामाजिक प्रश्नांचा विचार करावयाला आपल्याला भाग पाडते. त्या दृष्टीने हीं पांचहि संस्कृत नाटकें अभ्यसनीय आणि चिंतनीय आहेत.

卐

अनुक्रमणिका

समरा भक्ति म्हणजे
गुरु गोविंदप्रणीत शस्त्राचारपूत भक्तिमार्ग

[श्री. हरिहर वामन देशपांडे यांनी **'सुवर्णमंदिर अर्थात् शिखांचा शतसांवत्सरिक स्वातंत्र्यसंग्राम'** ह्या विषयावर लिहिलेला सुमारें ३५० पृष्ठांचा अभिनव ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होणार आहे. मराठी साहित्यांत या स्वरूपाचा हा पहिलाच ग्रंथ असून त्याला डॉ. ग. त्र्यं. देशपांडे हे विवेचक प्रस्तावना लिहीत आहेत. या ग्रंथाच्या स्वरूपाचें किंचित् दर्शन घडविण्याच्या हेतूने त्याच्या एका प्रकरणांतील कांही अंश खाली देण्यांत येत आहे. श्री. हरिहरराव यांच्या या ग्रंथाच्या प्रकाशनाची आम्ही उत्कंठापूर्वक वाट पहात आहोंत. **—संपादक 'युगवाणी'**]

या ठिकाणीं गुरु गोविंदने केलेल्या वैचारिक जागृतीच्या कार्याचा विशेष परामर्श घेणें आवश्यक आहे. तसें पाहिलें तर आद्य गुरु नानकापासूनच पंजाबच्या समाजांत वैचारिक जागृतीचें हें कार्य सुरू झालेलें होतें, व त्याच्या नंतरच्या गुरूंनी तें अविच्छिन्नपणें चालविलें होतें. इस्लामी आक्रमणापासून म्हणजे सुमारें अकराव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच पंजाबचा समाज प्राय: इस्लाममय बनत चालला होता. पंधराव्या शतकापर्यंत पंजाबच्या उत्तरेस काश्मिरांत साहित्य, ज्ञान व कला यांची उपासना चालू होती. पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ् इंडिया' नामक ग्रंथांत, या सुमारास काश्मिरांत सैन उलवदिन नामक इस्लामी शासकाने संस्कृत भाषा व प्राचीन भारतीय संस्कृति यांच्या उत्कर्षास साह्य केलें होतें, अशी माहिती दिली आहे. पण त्या वेळीं खुद्द पंजाबांत अज्ञानाचा काळोख पसरत चालला होता. समाज आचारभ्रष्ट तर झालाच होता, पण विचारभ्रष्टहि झाला होता. त्याचें स्वत्व व आत्मसन्मान नष्ट झाला होता. समाजाची ही अधोगति थांबवून त्याला पुन: विचारप्रवण व प्रवृत्तिशरण करण्याचें कार्य शिखांच्या नऊहि गुरूंनी केलेलें होतें. पण या बाबतींतली गुरु गोविंदची कामगिरी ही असाधारण महत्त्वाची आहे. म्हणून तिचा विशेष परामर्श घेणें अवश्य आहे.

महान् साहित्यिक कार्य

हें ध्यानांत घेणें अवश्य आहे की, त्या काळीं पंजाबचा बहुजनसमाज हिंदूच होता. अंगीकृत राष्ट्रनिर्माणाच्या कार्यांत त्याची नुसती सहानुभूतीच नव्हे तर त्याचें सक्रिय सहकार्य प्राप्त करून घेणें अवश्य होतें. प्रस्थापित साम्राज्यसत्तेला आव्हान देऊन तिच्या विरोधांत नवीन व स्वतंत्र राष्ट्राची स्थापना करण्याचें कार्य संपन्न करावयाचें असेल तर बहुजनसमाज त्यास सर्वस्वी अनुकूल असावयास पाहिजे, याची फार तीव्र जाणीव गुरु गोविंदच्या कार्यकलापांत आढळून येते. हा समाज हजारों वर्षांचा प्राचीन असून त्याच्या परम्परेने चालत आलेल्या कांही वैचारिक धारणा होत्या. त्यांचाच नवीन कार्यास उपयोग होऊं शकत होता. म्हणून गुरु गोविंदने बहुसंख्य हिंदुसमाजांत वंद्य व आदरणीय मानले गेलेल्या संस्कृत ग्रंथांचीं पंजाबच्या लोकभाषेंत भाषांतरें करविलीं. महाभारत, रामायण, श्रीमद्‌भागवत, सप्तशती, देवी भागवत, मार्कंडेय पुराण इत्यादि महान् ग्रंथांचे प्राकृत लोकसभेंत अनुवाद घडवून आणणें हें कार्य लहान नव्हतें. ती फार मोठी साहित्यसेवा होती. या कार्यासाठी एक स्वतंत्र खातेंच आपल्या दरबारांत गुरु गोविंदने निर्माण केलें. ५२ पंडितांची या कार्यावर नेमणूक करण्यांत आली. स्वतःच्या देखरेखीखाली गुरूने हें प्रचंड कार्य तडीस नेलें.

समान वाङमय, भाषा व लिपी

ह्याशिवाय गुरु गोविंदने स्वतः सुद्धा पुष्कळच रचना केली. संस्कृत, हिंदी, मराठी, पंजाबी, उर्दू, फार्शी व अरबी या सर्व भाषांचा संगम घडवून आणून त्याने पंजाबच्या समाजाला एक समृद्ध लोकभाषा प्राप्त करून दिली. तसेंच ह्या लोकभाषेला गुरुमुखी लिपीची जोड देण्यांत आली. पंजाबांतील हिंदु–मुसलमान मिश्र समाजांत अशा रीतीने वाङ्मय, भाषा व लिपी यांच्या आधारें राष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना करण्याचा गुरु गोविंदने हा जो प्रयत्न त्या काळांत केला त्याचें वैशिष्टच मननीय आहे. संस्कृत भाषेच्या कोंदणांत असलेलें विदग्ध ज्ञानाचें भांडार मराठी वाचकांना खुलें करून देण्याचें जें कार्य दक्षिणेंत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, दासोपंत, वामनपंडित, मोरोपंत इत्यादि संत व पंत कवींनी केलें, तेंच बहुमोल कार्य प्रायः त्याच कालखंडांत शीख गुरूंनी पंजाबांत करून दाखविलें. त्या सर्वांत गुरु गोविंदची कामगिरी राजमुकुटासारखी शोभणारी अशी आहे. त्याचें साहित्यप्रेम व रसिकता अभिजात व उदार होती. त्याने वाळगलेल्या कवींनी केलेल्या स्वतंत्र रचनेचा "**विद्याधर**" नांवाचा एक वेगळाच ग्रंथ गुरूने बनवून घेतला. त्यावर त्याचें अत्यंत प्रेम असें आणि युद्धांच्या धुमश्चक्रींत ऐन रणांगणावर सुद्धा शांत चित्ताने गुरु "विद्याधराचें"

वाचन करीत असल्याचें आढळून येई. दुर्दैवाने ह्या ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाही. पण त्यांतील अनेक कवनें ' सूरजय प्रकाश ' नामक नंतर निर्माण झालेल्या ग्रंथांत उध्दृत करण्यांत आलीं असल्याचें मॅकॉलिफने नमूद केलें आहे.

महाभारत–रामायणादि ग्रंथांची अपूर्वता

आजवर महाभारत, रामायण हे इतिहास ग्रंथ आणि पुराणे यांच्यापासूनच हिंदुसमाजाला निरंतर नवनवीन स्फूर्ति मिळालेली आहे. त्यांतील कथांनी हिंदु-समाजाला अनेक आपत्प्रसंगीं धैर्यबळ दिलेलें आहे. त्यांतील विचारांनी हजारो वर्षांपासून समाजाला कर्मसंगी बनविलेलें आहे. त्यांतील तत्त्वज्ञानाने लोकांना जीविताची नश्वरता शिकवून जिवावर उदार होऊन लढण्याचें व ध्येय सिद्धीस्तव सतत प्रयत्न करीत राहण्याचें सामर्थ्य दिलेलें आहे. ह्या ग्रंथांनी हें कार्य केवळ भारतांतच केलें आहे असें नाही. हिंदेशिया, हिंदचीन, लंका, थायदेश, नेपाळ, भूतान इत्यादि देशांतहि या ग्रंथांचा झालेला परिणाम आजतागायत आपणास पाहण्यास मिळतो. भारताजवळच्या देशांनाच नव्हे तर, रशियासारख्या सर्वथा भिन्न संस्कृतीच्या व समाजरचनेच्या देशांतसुद्धां ह्या ग्रंथांचे अनुवाद करून त्यांपासून स्फूर्ति व ज्ञान ग्रहण करण्याचे प्रयत्न आस्थापूर्वक करण्यांत येत असल्याचें आपण आजहि पाहत आहोत. ह्या ग्रंथांचा हाच उपयोग करून घेण्याच्या हेतूने गुरुगोविंदने त्यांची लोकभाषेंत भाषांतरें करविली व स्वतः रचना करून त्यांतील विविध प्रसंगावर भाष्यें लिहिलीं. आजपर्यंत ह्या मूळ ग्रंथांतील कथानकांच्या आधारें भारतांतील निरनिराळ्या भाषांत असंख्य ग्रंथ निर्माण झाले आहेत व परिस्थितीस अनुसरून त्यांतील जीवितसाफल्याविषयींच्या तत्त्वज्ञानाच्या ह्या ग्रंथाद्वारें विस्तार व विकास झालेला आहे. इतका आदर जगांतील दुसऱ्या कोणत्याच ग्रंथांचा झाला नसेल.

गुरु गोविंदप्रणीत शस्त्राचारपूत भक्तिमार्ग

आजपर्यंत शीख गुरूंनी शांतताप्रधान भक्तिमार्गाचा उपदेश केलेला होता व त्याचाहि मूळ उगम ह्यावरील ग्रंथांतच होता. परंतु समाजांत आत्मसंरक्षणाची आत्यंतिक निकड उत्पन्न झालेली पाहून गुरुगोविंदसिंहाने शस्त्राचारपूत भक्तिमार्गाचा उपदेश करण्यास प्रारंभ केला व त्यासाठीहि वरील प्राचीन ग्रंथवाणीतील ज्ञानोदकाचाच त्याने उपयोग केला. गुरुगोविंदने देवीचरित्रपर लिहिलेल्या **'भगवतीकी वार'** ह्या ग्रंथाचें मंगलाचरणच " पहिलें नमन खड्गाला व दुसरें नमन गुरुनानकाला. हे गुरूंनो आम्हास सर्वत्र साहय करा. "––असें आहे. शस्त्राचार भक्तिमार्गाचा उपदेश करतांना तो म्हणतो––" परमेश्वराने प्रथम खड्ग निर्माण केलें व नंतर समस्त विश्व निर्माण केलें. "... खड्ग म्हणजेच परमेश्वर व परमेश्वर

म्हणजेच खड्ग."..."प्रथम शत्रु कोण तें ओळखण्यास शिका व नंतर त्याचें दमन करण्यास शिका" कारण "परमेश्वर शत्रुदमन आहे." '**भगवतीकी वार**' च्या शेवटीं गुरूने म्हटलें आहे की, "जो ही कवनें गाईल त्याला मुक्ति प्राप्त होईल. त्याला पुनः जन्म घ्यावा लागणार नाही" **विचित्तर नाटक** नामक जो आत्मचरित्रात्मक ग्रंथ गुरुगोविंदने लिहिला आहे त्याचेंहि मंगलाचरण खड्ग-वंदनेनेच करण्यांत आलें आहे. तो म्हणतो--"ह्या पवित्र खड्गाला मी प्रेमाने व भक्तिभावाने वंदन करतों. हें खड्गा माझ्या कार्यसिद्धीस साह्य कर."...

"दुधारी खांड्याला माझें वंदन असो.
छुरिकेला माझें वंदन असो.
हे परमेश्वरा ! तुझा खड्ग हा एकच आधार आहे.
हें तुझें स्वरूप अपरिवर्तनीय आहे.
ज्याने चतुदर्श भुवनांत प्रकाश वितरिला आहे
त्या गदा धारण करणाऱ्या देवाला माझें वंदन असो.
बाण व बंदुकीला माझें वंदन असो.
स्वच्छ, निर्भय व अभेद्य खड्गाला माझें वंदन असो.
सामर्थ्यशाली गदेला व भाल्याला माझें वंदन असो.
ज्याचे दात मजबूत आहेत त्या चक्राला माझें वंदन असो;
व तें धारण करणाराला माझें वंदन असो.
जो अतीव सामर्थ्यशाली आहे त्याला माझें वंदन असो.
बाण व तोफ यांना माझें वंदन असो.
त्यामुळे शत्रूचा नाश होतो.
समस्त शस्त्रांना माझें वंदन असो.
समस्त अस्त्रांना माझें वंदन असो."

*

"ह्या कलियुगांत व सर्वकाळीं
खड्गाच्या सामर्थ्यशाली हस्तावरच
परम विश्वास ठेवण्यांत येतो."

*

"हे खड्गा ! तूंच देशचे देश पादाक्रान्त करतोस.
दुष्टांच्या सैन्याचें पारिपत्य तूंच करतोस.
तुझें पातें अभेद्य आहे.
तुझी दीप्ति व प्रकाश सूर्याप्रमाणे सर्वत्र चकाकणारा आहे.
सज्जनांवर तूं सुखाचा वर्षाव करतोस; व
दुर्जनांना तूं भीतीने बाबरवून सोडतोस.

पाप्यांची तूं पांगापांग करतोस.
मी तुझ्याजवळ संरक्षणाची याचना करीत आहे.
हे जगन्निर्मात्या ! तुझा जयजयकार असो.
हे सृष्टिपरित्राणकर्त्या !! तुझा जयजयकार असो.
हे माझें प्रिय करणाऱ्या खड्गा !!! तुझा जयजयकार असो."

गुरु गोविंदने निर्माण केलेल्या साहित्यांतील ओजस्वी हृदयभेदकता कशी होती याची वरील थोड्याशा पंक्तींवरून कल्पना करतां येण्यासारखी आहे.

समाजांतील कायरता नष्ट करण्याचा हेतु

मॅक्स आर्थर मॅकालिफ नामक इंग्रज लेखकांने 'शीख धर्म, शीख गुरूंचीं चरित्रें व त्यांचे उपदेश' या नांवाचे जे सहा ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत त्यांत त्याने जागोजागीं हिंदुधर्म व हिंदूंचें तत्त्वज्ञान यांची निंदा केली असून शीखधर्म हा स्वतंत्र धर्म आहे व त्याचा हिंदुधर्माशीं कांही संबंध नाही असें प्रतिपादन केलें आहे. कारण शीख गुरूंनी हिंदुधर्मीयांच्या दुराचारांची अनेक वेळा निंदा केलेली आहे. पण अशी निंदा जितक्या कडक शब्दांत शीख गुरूंनी केली असेल त्यापेक्षाहि अधिक कडक शब्दांत ती रामदास-तुकारामादि हिंदु साधुसंतांनीहि केलेली आहे. ब्राह्मणांच्या अधोगतीचें वर्णन करतांना समर्थ रामदासांनी म्हटलें आहे की—

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून झाले । शिष्य शिष्यांचे ॥
कित्येक दावल मलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहीच नाही ॥

ह्याप्रमाणे अनेक बाबतींत शीख गुरू व हिंदु संत यांनी हिंदुधर्मांत शिरलेल्या दुराचारांची निंदा सारखीच केली असल्याचें स्पष्ट आहे. हिंदु व शीख यांच्यांत कायमचा भेद पाडण्याचा अत्यंत कुटिल हेतु मनांत बाळगूनच मॅकालिफने आपलीं पुस्तकें लिहिलीं आहेत. तथापि त्यालाहि, महाभारत, रामायण, भागवत, दुर्गासप्तशती इत्यादि हिंदूंच्या संस्कृत ग्रंथांचें पंजाबच्या लोकभाषेंत अनुवाद करवून घेण्याचें जें महान् कार्य गुरु गोविंदने पार पाडलें त्याच्या हेतूचें प्रतिपादन करतांना हें मान्यच करावें लागलें आहे की, लोकांच्या ठिकाणीं '"शौर्याची स्फूर्ति निर्माण व्हावी, त्यांची कायरता नष्ट व्हावी, आणि आपल्या धर्माचें संरक्षण करीत असतांना आपल्या सैनिकांचीं अंतःकरणें पराक्रमाने भारलेलीं असावींत ह्या हेतूने हें कार्य करण्यांत आलें."

गुरूची साहित्य-कृति

श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाचें गुरु गोविंदने स्वतःच भाषांतर केलें आहे. ह्या दशमस्कंधाने आजवर अनेक संतांना व पंताना अक्षरशः वेड लावलेलें आहे.

तसेंच त्याचें वेड गुरु गोविंदलाहि लागलेलें असावें ही स्वाभाविक गोष्ट होय. दशमस्कंधाचा अनुवाद करण्याच्या मिषानें आपण श्रीकृष्णाच्या दाक्षिण्ययुक्त शौर्याच्या कथा गाण्यास कां प्रवृत्त झालों आहोंत याचें विशदीकरण करतांना गुरूनें स्वतःच म्हटलें आहे की, "धार्मिक संग्राम चालविण्यासाठी (लोकांच्या ठिकाणीं) उत्साह निर्माण करण्याच्या एकमात्र हेतूनें भागवताच्या दशमस्कंधाचें प्राकृत लोकभाषेंत आपण हें भाषांतर करीत आहोंत." शिवाय, गुरु गोविंदनें स्वतः भागवतीच्या-चंडीच्या-संस्कृत स्तोत्रांचीं भाषांतरेंहि अशा रीतीनें केलीं आहेत की, "युद्धासारख्या प्रसंगीं तीं गातां यावीत; चंडीच्या कथा ऐकून भित्र्यांच्या ठिकाणींसुद्धा धैर्य निर्माण व्हावें, आणि शूरांचीं अंतःकरणें चौपट उत्साहानें प्रज्वलित व्हावीत." ह्या गीतांतूनहि गुरूनें असेंच प्रतिपादन केलें आहे की, "जो मनुष्य भेकडपणानें रणांगणांतून पळ काढील त्याला नेहमी लाजेनें आपली मान खालीच घालावी लागेल. इहलोकींच्या व परलोकींच्या लाभांनाहि त्याला मुकावें लागेल." आपल्या या तत्त्वज्ञानाला पोषक असे ईश्वरवाचक अनेक शब्द गुरु गोविंदनें निर्माण केले आहेत अकाल (अविनाशी), सर्वलोह (संपूर्ण पोलादी), महान्लोह सर्वकाल (सर्वान्तक) महानकाल असिध्वज, असिकेतु, खड्गकेतु, असिपाणी, इत्यादिसारख्या गुरूनें वापरलेल्या शब्दांतूनहि त्याच्या शास्त्राचारसंपन्न भक्तिमार्गाची स्फूर्ति लोकांना मिळूं शकते. त्याचें आवाहन कसें स्फूर्तिप्रद असें याचा पुढील नमुना पहा—

> "ज्यांच्या पुढें असंख्य महाराजांनी शरणागति पत्करिलेली होती व ज्यांच्याजवळ प्रचंड हत्ती व असंख्य घोड्यांचें बल होतें अशा चक्रवर्ती सम्राटांनाहि एके दिवशीं ह्या जगाचा नग्न पायांनीच निरोप घ्यावा लागला."—

प्रबळ शासनकर्त्यांचें नीतिधैर्य ढासळविण्यास व पीडित प्रजेचें उत्थान घडवून आणण्यास त्याकाळीं ह्या असल्या आवाहनांचा केवढा उपयोग झाला असला पाहिजे !!

हिंदु–मुस्लीम–एकतेच्या आवश्यकतेची जाणीव

साम्राज्यसत्तेविरुद्ध करावयाच्या क्रांतियुद्धांत हिंदू व मुसलमान या दोघांनाहि एक होऊन लढा देणें अवश्य आहे हें ओळखून गुरु गोविंदनें हिंदु–मुस्लीम–एकतेचाहि प्रभावी उपदेश केलेला आहे त्याच्या व्यापक लोकसंग्रहाचाच तो एक भाग होता. हिंदु–मुस्लीमांचें ऐक्य दर्शवितांना तो एका कवनांत म्हणतो—

"मंदिर व मशीद हीं एकच आहेत. हिंदूंची पूजा व मुसलमानांची प्रार्थना हीं एकच आहेत. सर्व माणसें सारखींच आहेत. त्यांच्यांत भेदभाव पाहणें ही चूक होय. देवता, दैत्य, यक्ष, किन्नर, मुसलमान व हिंदू आपापल्या रिवाजाप्रमाणें पोशाख वेगवेगळा करीत असतात. (वस्तुतः ते एकच आहेत.) सर्व माणसांना नाक,

कान, डोळे व शरीरें सारखींच आहेत. पृथिव्यादि पंचभूतांपासूनच ती निर्माण झालीं आहेत. अल्ला व अभेक एकच आहेत. पुराणें व कुराण एकच आहेत. ते सर्व सारखेच आहेत. व एकाच परमेश्वराने त्यांची सृष्टि केली आहे." गुरूने आपल्या कवनांतून हिंदू व मुसलमान दोन्ही धर्मांतील अंधश्रद्धेला जोराचा धक्का दिला व त्यांत शिरलेल्या ढोंगांची जोरदार निंदा केली. इतकेंच नव्हे तर, खुद्द शीख संप्रदायांत शिरलेल्या ढोंगावर व अंधश्रद्धेवरहि त्याने जोरदार तडाखे मारलेले आहेत. हिंदु-मुस्लीम-ऐक्याबरील गुरु गोविंदच्या उपदेशपर कवनाचा आणखी एक नमुना पहा—

"ज्याच्या अंतःकरणांतून सर्व संदेह नाहीसे झाले आहेत त्याच्या दृष्टीला हिंदू काय व मुसलमान काय ? (सर्व सारखेच !) मुसलमान जिला तसबीह म्हणतात तिलाच हिंदू माला म्हणतात. मुसलमान कुराण वाचतात तर हिंदू पुराण वाचतात. मूर्ख माणसेंच याची चर्चा करतां करतां (तथ्य ध्यानांत न घेतल्याने) मरतात. त्यांना परमेश्वराच्या अगाध प्रेमोदधींत बुडी मारतां येत नाही. ज्यांना परमेश्वर एकच एक आहे हें कळलें आहे व त्याच्या भक्तीने जे ओथंबले आहेत ते मानवी मतांची पर्वा न बाळगतां सुखाचा अनुभव घेतात."

गुरुगोविंदचें आत्मचरित्र

'विचित्तर नाटक' नामक आत्मचरित्रपर ग्रंथांत गुरू गोविंदने म्हटलें आहे की, श्रीरामचंद्राच्या सूर्यवंशांत आपला जन्म झाला आहे व चंद्रवंशीय पंडु महाराणाने हेमकूट पर्वताच्या ज्या सप्तशृंग शिखरावर तपश्चर्या केली होती तेथेच आपणहि कठोर तपश्चर्या केली आहे—"मी केलेल्या तपामुळे माझें परमेश्वराशी तादात्म्य झालें आहे. परमेश्वराच्या निदेशानेच जन्म घेऊन मी या जगांत आलों आहे. तो मला जें जें सांगतों तेंच मी सर्व मानवांना सांगत असतो." असे महान् आत्मप्रत्ययाचे व साक्षात्काराचे उद्गार गुरूने काढले आहेत. इतके असूनहि निरंहकृति व विनीतभाव कायम ठेवून गुरु म्हणतो—"माझा कोणीहि शत्रु नाही. जे मलाच परमेश्वर समजत असतील ते नरकाच्या खड्ड्यांत पडतील. परमेश्वराचा सेवक ह्या दृष्टीनेच माझ्याकडे पहा. मी क्षत्रियाचा पुत्र आहे, ब्राम्हणाचा नव्हे. मला तपश्चर्येतच कसें राहतां येईल ? गृहस्थ धर्मांचीं कर्तव्यें सोडून, हे परमेश्वरा, मला तुझ्याकडे कसें येतां येईल ? तेव्हा माझी हात जोडून एकच प्रार्थना आहे की, हे परमेश्वरा, मला असा वर दे की, माझें आयुष्य जेव्हा संपेल तेव्हा घनघोर युद्धांत लढतां लढतां मला मरण यावें."

समरभक्तीचा नवीन आदेश

मृत्यु जर मनुष्याला अटळ आहे, तर मनुष्यानेहि ईश्वरावर श्रद्धा ठेवून आनंदाने मृत्यूला आलिंगन दिलें पाहिजे, हें तत्त्व ठसविण्यासाठी गुरु गोविंदने म्हटलें आहे—"त्या सर्वनाशकापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी कोणी

अनुक्रमणिका

पळतोच म्हणेल तर कोणत्या दिशेने पळूं शकेल ? नग्न खड्ग हातांत घेऊन ते फिरवीत व गर्जना करीत सदैव तुम्हांस अडविण्यास सज्ज असलेल्या ह्या परमेश्वराच्या समोरून कोण पळून जाऊं शकेल ? परमेश्वराच्या वारापासून बचाव करण्याचें साधन अद्यापि मनुष्यास सांपडलेलें नाही असें जर आहे, तर हे मूर्ख मानवा, ह्या परमेश्वरालाच तूं शरण कां जात नाहीस ? " गुरु गोविंदच्या प्रतिपादनावर हिंदु धर्मशास्त्र, विशेषत: उपनिषदें व गीता यांची चांगलीच छाप पडलेली आहे. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' या गीता वचनाच्याहि एक पाऊल पुढे जाऊन त्याने आपल्या अनुयायांस असें आश्वासन दिलें आहे की, लढतां लढतां मेल्यास तुम्हाला केवळ स्वर्गच नव्हे तर साक्षात् मुक्ति मिळेल, आणि जिंकल्यास पृथ्वीचें राज्य उपभोगण्यास मिळेल, संग्रामयुक्त-भक्तीने मोक्षाचीं कपाटें खुलीं होतात हा विश्वास आपल्या अनुयायांच्या ठिकाणीं निर्माण करणें हें गुरु गोविंदच्या कार्याचें वैशिष्टच होय. 'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग', 'हेचि शूरत्वाचें अंग। हरी आणिला श्रीरंग।' असें तुकाराम म्हणतो तर, 'ठकाचें ठाण। करी चापबाण। माझें ब्रह्मज्ञान ऐसें असें॥' असें रामदासानेहि म्हटलें आहे. पण तुकाराम काय किंवा रामदास काय यांपैकी कोणीहि प्रत्यक्ष खड्ग हातांत घेऊन संग्राम केला नाही. खड्ग हातांत घेऊन व शत्रूशीं संग्राम करून तद्रूपाने परमेश्वराची तितकीच अव्यभिचारिणी भक्ति करतां येते असा आदर्श जन्मभर स्वत: तसें आचरण करून गुरु गोविंदसिंहाने घालून दिलेला आहे. म्हणून निस्सीम भक्त या नात्याने त्याची तुलनाच करावयाची झाल्यास ती भगवंताचा परमश्रेष्ठ भक्त व महान् योद्धा जो धनंजय पार्थ त्याचेशीच करतां येईल. संग्राम-युक्त भक्तीचा म्हणजे 'समरा भक्ती'चा हा नवीन आदर्श गुरु गोविंदने स्वत:च्या जीवन चारित्र्यांतून तर घालून दिलाच, पण त्यासाठी शीख संप्रदायाची आमूलाग्र पुनर्घटना घडवून आणली व तीच पुढच्या शतसांवत्सरिक स्वातंत्र्य संग्रामाच्या व नूतन व स्वतंत्र शीखराष्ट्र निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची व ऐतिहासिक घटना ठरली. 'संग्राम हेंच महांकाळ परमेश्वराच्या भक्तीचें साधन होय, शस्त्राचार हाच भक्त्याचार होय, व त्यानेहि सर्वविनाशक परमेश्वराच्या अंतिम स्वरूपाचें ज्ञान होऊं शकतें." ही शिकवण सतत देऊन त्याने सर्व शीख समाजासच शस्त्राचारपूत भक्त बनविलें—"आपल्या धर्मासाठी, आपल्या देशासाठी व सत्कार्यासाठी संग्राम करणें हें प्रत्येक शिखाचें कर्तव्य होय"—अशा खणखणीत व नि:संदिग्ध भाषेंत पुढील संग्रामासाठी त्याने प्रथम शिखांचीं मनें तयार केली आणि नंतर ह्या नवीन तत्त्वज्ञानास अनुरूप अशी शीख संप्रदायाची पुनर्घटना करण्याचा उद्योग पार पाडला. ही पुनर्घटना म्हणजे २०० वर्षांच्या ह्या संप्रदायाचें नसतें पुनरुज्जीवनच नव्हतें, तर त्याचा संपूर्ण कायापालट घडवून आणणारें असें तें त्याचें संजीवन होतें.

卐

साहित्य-समीक्षा—

मराठी कादंबरीचा एक नवा गूढरम्य आणि तत्त्वगर्भ उन्मेष

‘ आहुति ’

समीक्षक डॉ. अ. ना. देशपांडे

दार्शनिक कादंबरी

‘ आहुति ’ ही श्री. पु. य. देशपांडे यांची नवी कादंबरी. नुकतीच प्रकाशित झालेली. ही कादंबरी मीं जेव्हा वाचून काढली तेव्हा एकाएकी मला केशवसुतांच्या ‘ क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास ’, ‘ झपूर्झा ’, ‘ हरपलें श्रेय ’ या कवितांची आठवण झाली. चिन्मयाच्या साक्षात्कारासाठी, दिव्यत्वाच्या प्रतीतीसाठी तळमळणारं मन केशवसुतांच्या या कवितांतून साकार झालेलं आहे. तसलंच मन पु. य. देशपांडे यांच्या या नव्या कादंबरींतून अभिव्यक्त झालेलं आहे. अमृतत्वाच्या स्पर्शाविषयीची जिवंत आतुरता, हा वस्तुतः काव्यलेखनाला अत्यंत अनुरूप असा विषय. त्यावर कादंबरी रचणं हें मोठं करामतीचं काम, मोठं धाडसाचं काम. पु. य. देशपाडे यांच्या लेखणीने ही करामत करून दाखविलेली आहे; कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमाला न पेलणारा असा आशय त्या माध्यमांतून मांडून पाहण्याचा प्रयत्न करण्याचें धाडस त्यांनी केलेलें आहे. त्या दृष्टीने पाहतां ‘ आहुति ’ हा मराठी कादंबरीलेखनक्षेत्रांतला एक नवा विक्रम आहे, एक नवा प्रयोग आहे. कादंबरी या वाङ्मयप्रकारांतून कोणता विषय मांडावा यासंबंधीच्या रूढ संकेतांची जणु या कादंबरींत ‘आहुति’ दिलेली आहे. सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक असल्या वर्गीकरणात्मक परिभाषेने या कादंबरीचें नामकरण करावयाचें झालें तर तिच्या बाबतींत ‘ दार्शनिक कादंबरी ’ अशी संज्ञा वापरणें न्याय्य व समर्पक ठरणार आहे.

देशपांड्यांची प्रकृति

रूढ संकेतांच्या विरुद्ध बंड करणें ही तर जणु पु. य. देशपांड्यांची प्रकृतीच आहे, तो त्यांचा स्थायीभाव आहे. ‘ बंधनाच्या पलीकडे ’नेंच महाराष्ट्राला त्यांच्या या प्रकृतिवैशिष्टयाची ओळख करून दिलेली आहे, आणि हेंच प्रकृतिवैशिष्टय त्यांच्या त्यानंतरच्या ‘सुकलेलें फूल’, ‘सदाफुली ’, ‘विशाल जीवन ’,

'काळी राणी' व 'नवें जग' या कादंबऱ्यांतून कार्यक्षम झालेलें आहे. 'आहुति' ही कादंबरी त्यांच्या वैचारिक प्रवासाच्या फार फार पुढल्या टप्प्यावरील आहे. असें असून सुद्धा पूर्वीच्या सहा कादंबऱ्यांच्या निर्मितीमागचा त्यांच्या व्यक्तित्वाचा पिंड आणि या नव्या कादंबरीच्या निर्मितीमागचा त्यांच्या व्यक्तित्वाचा पिंड यांची एकरूपता चटकन न जाणवणें अशक्य आहे. या एकरूपतेच्या दिग्दर्शनाच्या दृष्टीने एक लहानसें उदाहरण येथे सांगण्यासारखें आहे. 'काळी राणी'मधील प्रकाश व रजनी यांचें प्रेम व 'आहुति'मधील विद्याधर व आहुति यांचें प्रेम यांची तुलना करून पाहा. ती या दृष्टीने अत्यंत उद्बोधक ठरण्यासारखी आहे. देशपांड्यांच्या अनुभवांची पातळी आज पुष्कळच उंचावलेली आहे हें खरें आहे; पण अनुभव संपादन करण्याची जी त्यांची पद्धति पूर्वीच्या सहा कादंबऱ्यांतून प्रकट झालेली आहे तीच त्यांच्या या नव्या 'आहुति'मध्येहि कायम राहिलेली आहे. 'सर्व वैचारिक प्रक्रिया पूर्ण स्तब्ध व निःशब्द' झाल्याच्या किंचित् साक्षात्काराच्या त्यांच्या आजच्या अवस्थेंतहि त्यांच्या या पद्धतीचें स्वरूप तसेंच टिकून राहिलेलें आहे.

प्रमुख व्यक्ति

'आहुतीं'त आहुति आहे, पण तिच्यांतील प्रमुख व्यक्ति विद्याधर ही आहे. सबंध कादंबरीभर त्याच्या व्यक्तिमत्वाचाच प्रभाव आहे. वाङ्मयसमीक्षण शास्त्रांतली आज अगदीच वेचंव आणि अर्थशून्य झालेली संज्ञा वापरून बोलायचें म्हटलें तर असें म्हणतां येईल की विद्याधर हा या कादंबरीचा नायक आहे. तो 'दिव्य पुरुष' आहे, पुरुषोत्तम आहे, त्याच्या दिव्यत्वाच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्पर्शाने आहुति, तारादेवी व नित्यानंद या व्यक्ति प्रभावित झालेल्या आहेत. 'सर्वांत राहून, सर्वांत मिसळून, फिरून नामानिराळा.' असलेला ईश ऊर्फ डॉक्टर हा प्रभाव टाकणारी व्यक्ति आणि प्रभावित झालेल्या व्यक्ति यांच्यांतील परस्पर-संबंधाचा, या प्रभावप्रक्रियेचा साक्षी आहे. या कादंबरीतील प्रतिपाद्य विषयाचें नीट व यथार्थ आकलन होण्याच्या दृष्टीने विद्याधराच्या व्यक्तित्वाची ओळख करून घेणें फार आवश्यक आहे.

विद्याधर हा 'चांगल्या घरंदाज, गर्भश्रीमंत घराण्यांत जन्मास आलेला, आपल्या आईबापांचा एकुलता एक मुलगा. लाडांत वाढलेला पण खूप शिकून सुविद्य झालेला.' उपजीविकेसाठी त्याला कांहीहि करावयाची जरूर नव्हती. परदेशांत जाऊनहि त्याने आपल्या सुविद्यतेंत भर टाकली होती. षड्दर्शनांचा त्याने पारंपरिक पद्धतीने अभ्यास केला होता आधुनिक विज्ञान व तत्त्वज्ञान तर त्याला चांगलेंच अवगत होतें. पाश्चात्य आधुनिक विज्ञान आणि भारतीय वा वैदिक तत्त्वज्ञान यांची तात्त्विक दृष्ट्या नवी संगति साधण्याचा तो प्रयत्न करूं लागला होता. तो वृत्तीने अतिशय अंतर्मुख. त्याचें सगळें लक्ष अंतरात्म्याकडे

अनुक्रमणिका

ओढ घेऊं लागलेलें. तो जितका व्यक्तिनिष्ठ व आत्मनिष्ठ होता तितकाच तो समष्टिनिष्ठ व विश्वात्मनिष्ठ होता. त्याला कोणत्याहि एका विचारप्रणालीच्या चौकटींत बसवितां येणें शक्य नव्हतें. द्वंद्वमय व्यावहारिक जीवनापासून तुटन वेगळया झालेल्या व आधुनिक युगांत हतप्रभ ठरलेल्या निर्द्वंद्व व अद्वैत वेदान्ताला आधुनिक जगांतील नित्याच्या व्यावहारिक जीवनांत रंगरूप व रसाळपणा कसा आणतां येईल याचा शोध त्याच्या अंतःकरणांत सदैव सुरू होता. मर्यादांच्या पलीकडल्या प्रदेशाचें त्याला विलक्षण आकर्षण वाटे. या आकर्षणाचें मूळ शोधून काढण्यांत तो गढून जाई. वैदिक दर्शनशास्त्रांच्या अध्ययनामुळे तो दिवसेंदिवस अधिकाधिक अंतर्मुख होत चालला होता. जिथे चिन्मयाची सळसळ असेल तिथे धाव घेण्याची त्याची प्रवृत्ति. त्यामुळे तो कांही दिवस राजकारणांतहि सहभागी झाला होता. पण त्यांत सांप्रदायिक यांत्रिकता येऊं लागतांच त्या राजकारणांतून तो बाहेर पडला.

कालक्रम आणि कालातीतता

आपलें सगळें जीवन, सगळी विचारप्रक्रिया, सगळें ज्ञानसंपादन, सगळे अनुभवसंकलन हें कालसापेक्ष आहे. असें कालसापेक्ष जीवन जगत असतांनाच विद्याधराला कालांतील अशा चैतन्याची एकदा साक्ष पटली. आहुतीशीं झालेल्या मीलनांत त्याला शरीरनिरपेक्ष अशा या चैतन्याचें दर्शन झालें. कालक्रमाला, काल-आज-उद्याला, ऐतिहासिकतेला आधारभूत असलेलें असें जें अखंड असणारें, सहज असणारें अमृतत्व, त्याचा त्याला स्पर्श झाला. तें अमृतत्व, तें चिन्मयत्व त्याने कांही काळ अनुभविलें. कालबद्धतेचा प्रदेश ओलांडून त्याने कालातीतांत पदार्पण केलें. कालातीताचा, दिव्यत्वाचा स्पर्श झाल्यानंतरच्या आपल्या जीवनाचें तो नुसतें 'असणें' असें जें वर्णन करतो तें अत्यंत अर्थपूर्ण आहे. आहुति त्याचें वर्णन करतांना म्हणते, "विद्या पुरुष असून पुरुषातीत आहे. शरीरि असून शरीरातीत आहे." या विद्याधराच्या स्पर्शामुळे तारावाईंचं 'सारं अंग थरारलं' पुलकित झालं, त्यांच्या सर्वांगांतून वीज चमकून गेली; जुनं सारं कांही जळून भस्म झाल्यासारखं त्यांना वाटलं.' सिनेसृष्टींत विमुक्त आणि विलासी जीवन जगणाऱ्या तारावाईंच्या जीवनांत विद्याधराच्या व्यक्तित्वाच्या दिव्य स्पर्शामुळे अभूतपूर्व स्वरूपाचें परिवर्तन घडून आलें. त्याच्यावद्दल बोलतांना तारावाई एकदा असें म्हणाल्या, "तो जितका साधा, सोज्वळ, प्रांजळ आहे, तितकाच तो खोल व विशाल आहे. त्याचा थांग लावतां येणें अशक्य आहे. त्याच्या जीवनाला अलौकिकाचा स्पर्श झाला आहे, पण त्याची त्याला यत्किंचितहि जाणीव नाही." ही अलौकिकता सहज स्वरूपाची आहे. सहज असणें हा त्या अलौकिकत्वाचा, त्या चिन्मय अवस्थेचा स्वाभाविक धर्म आहे. या सहजस्वरूपी चैतन्याचा ज्याला

साक्षात्कार झालेला आहे अशा एका व्यक्तीचें (म्हणजेच विद्याधराचें) चित्रण करण्याकरिता ही कादंबरी लिहिलेली आहे.

ही 'शांतिकथा' आहे

ही कादंबरी म्हणजे क्रांतीची कथा नाही, तींत मानसिक भ्रांतीचेंहि चित्रण नाही. ही 'शांतिकथा' आहे. चैतन्याच्या स्पर्शानें अनुभवास येणाऱ्या शांतीची महति पटवून देण्याकरिता ही कादंबरी लिहिलेली आहे.

आंतरिक शांतीचा सहज आस्वाद घेण्यास समर्थ ठरलेल्या विद्याधराच्या व्यक्तित्वाचें चित्रण, ही या कादंबरींतील प्रमुख वस्तु. ती स्वाभाविक आहे. सुसंगत आहे. सयुक्तिक आहे. समजण्यासारखी, पटण्यासारखी आहे. या कादंबरींत न पटण्यासारखी, लक्षांत न येण्यासारखीहि एक वस्तु आहे. कित्येक वाचकांना तारादेवी आणि नित्यानंद यांच्यासारख्या विलासबहुळ जीवन जगणाऱ्या व्यक्तींवर विद्याधराचा प्रभाव पडावा हें पटणार नाही; पण या प्रभावांत अस्वाभाविक असें कांही नाही. बहिर्मुखतेचा अतिरेक झाला म्हणजे वृत्त्यंतर होऊन वृत्ति अंतर्मुख होणें ही सहज संभवनीय अशी गोष्ट आहे.

एक प्रश्न ?

मग या कादंबरींतील न पटणारी गोष्ट कोणती ? आंतरिकतेच्या, अंतर्मुखतेच्या विश्वांत विद्याधराने गाठलेली उच्च पातळी आणि बहिर्मुख जगतांतील संजीवनीची किंकाळी यांत संगति कोणती ? जागृत वाचकाच्या मनाला प्रश्नांकित करून अस्वस्थ करणारी गोष्ट ती ही. विद्याधराच्या अंतर्मुखतेच्या प्रवासांत संजीवनीच्या किंकाळीचे स्थान कोणतें ? प्रयोजन कोणतें ? विद्याधर हा जसा व्यक्तिनिष्ठ होता तसाच तो समष्टिनिष्ठ होता, असें त्याचें या कादंबरींत वर्णन आहे हें खरें आहे; पण त्या वर्णनाची सार्थकता ही कादंबरी वाचून पटेल असें कबूल करणें कठीण आहे. विद्याधराची आध्यात्मिक उन्नति आणि संजीवनीची म्हणजेच सामान्य जनतेची सामाजिक व आर्थिक दुःस्थिति या दोन वस्तु एकत्र आणलेल्या आहेत. कलादृष्टीने पाहतां, या दोन वस्तु मिळून एक एकात्म, एकसंध, एकजिनसी वस्तु निर्माण झालेली आहे काय ? तात्त्विक दृष्टीने पाहतां, आत्मानुसंधान आणि जनतानुसंधान यांचें सहजीवन शक्य आहे काय ? निवृत्ति आणि प्रवृत्ति यांचें सलोख्यानें, जिव्हाळ्यानें एकत्र नांदणें संभवनीय आहे काय ? ही कादंबरी वाचल्यानंतर मनांत असे कांही प्रश्न उत्पन्न होतात; पण या प्रकारामुळे जीवनासंबंधीच्या कांही मूलगामी प्रश्नांबद्दल वाचकांना विचार करण्याची प्रेरणा दिल्याबद्दल या कादंबरीच्या जनकाला मनःपूर्वक धन्यवाद द्यावेसे वाटतात !

卐

अनुक्रमणिका

हीं दिवाळी युगवाणीच्या लेखकवर्गास आणि
विदर्भ साहित्य संघाच्या सर्व हितचिंतकांना,
कार्यकर्त्यांना व सभासदांना
सुखसमृद्धीची जावो !

अनुक्रमणिका

संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून

कार्यकारी मंडळाची सभा

रविवार दि. २७–१०–१९५९ रोजी सकाळी ९ वाजता वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा केंद्रीय कार्यालयात भरली. तीत पुढीलप्रमाणे मुख्य कार्यवाही करण्यांत आली.

(१) मागील सभेचा अहवाल, सहामाही कार्यवृत्त आणि तीन महिन्याचा आर्थिक अहवाल मंजूर करण्यात आले.

(२) कायम निधि व विशेषनिधि म्हणून वेगळे निधि तयार करावेत, असे ठरले.

(३) सेव्हिंग्ज सर्टिफिकेटबाबत कार्यवाही करण्याचा अधिकार अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांना देणारा ठराव संमत करण्यात आला.

(४) कै. ह. ना. नेने स्मारकासंबंधी सहकारी संस्था, नागपूर यांनी पाठविलेल्या पत्राचा विचार करण्यांत आला व देणगी स्वीकारावी असा निर्णय घेण्यात आला.

(५) सावरगाव डुकरे येथे २२ वे साहित्य संमेलन भरविण्याबाबत अनुकूल विचार करण्यांत आला.

(६) वि. सा. संघाने नवीन शुद्धलेखनाच्या नियमांची पुस्तिका तयार करावी व हे कार्य करण्याबद्दल प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांना विनंती करावी, असे ठरले.

(७) प्रा. या. मु. पाठक यांनी लिहिलेल्या गेल्या युगवाणीच्या अंकांतील "विदर्भ साहित्य संघ अलिप्त आहे" या संपादकीयावर साधकबाधक चर्चा होऊन हे संपादकीय वि. सा. संघाची बदनामी करणारे असल्यामुळे प्रा. या. मु. पाठक यांना संपादकाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला व पुढीलप्रमाणे नवीन संपादकमंडळ नेमण्यात आले.—

संपादक—श्री. पु. य. देशपांडे

सदस्य—श्री. गो. रा. दोडके, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे व
श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

* *

सत्कार व भेट

दि. १-९-५९ रोजी सावंतवाडीचे महाराज श्री. शिवरामराजे भोसले आणि प्रा. बी. आर. देवधर यांनी वि. सा. संघाला भेट दिली.

नाटयसमिति

दि. २६ ऑगस्ट ५९ रोजी वि. सा. संघाच्या नाटयसमितीतर्फे नाटयाचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम झाला. त्यावेळी नाटककार श्री. वा. वा. भोळे यांचे "खाडिलकर आणि मराठी नाटयकला" या विषयावर भाषण झाले.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

शारदोत्सव

गुरुवार दि. ८-१०-५९ रोजी सरस्वती उत्सवाच्या उद्घाटनानिमित्त साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचे "साहित्यसौंदर्य आणि जीवन" या विषयावर व्याख्यान झाले.

सोमवार दि. १२-१०-५९ रोजी शारदोत्सवाचाच एक भाग म्हणून सामाजिक शास्त्रसमितीच्या वतीने "भारतीय कुटुंबसंस्थेचे भवितव्य" या विषयावर सौ. विमलबाई देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली सामूहिक चर्चेचा कार्यक्रम झाला. त्यात पुढील वक्त्यांनी भाग घेतला—

(१) प्रा. प्र. ज. जागीरदार, (२) श्री. शरच्चंद्र धर्माधिकारी, (३) श्री. वसंतराव साठे, (४) प्रा. ग. रा. पेंढरकर, (५) प्रा. श्री. गो. काशीकर, (६) श्री. दे. गो. लांडगे, (७) श्री. प्रभु ठोंबरे, (८) प्रा. ग. प्र. पिंपरकर.

बुधवार दि. १४-१०-५९ रोजी कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. श्री. आनंदराव टेकाडे यांनी या कविसंमेनाचे उद्घाटन केले. व श्री. वसंतराव सबनीस यांनी अध्यक्षस्थान मंडित केले होते. या कविसंमेलनांत पुढील कवींनी भाग घेतला—श्री. आनंदराव टेकाडे, श्री. वसंतराव सबनीस, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, सौ. उषाताई लिमये, सौ. शांताबाई दंडिगे, श्री. कृ. मु. उजळंबकर, कु. आशा लिमये, कु. दुर्गा कानगो, श्री. मधु कोसारे, श्री. श्याम सोनारे, श्री. वा. रा. पाठक.

* *

विदर्भ साहित्य संघाचे आजीव सभासद

पुढील सद्गृहस्थ वि. सा. संघाचे नवीन आजीव सभासद झाले आहेत.

(१) प्राचार्य के. मा. मुनशी, खामगाव	रु. ५३-०
(२) डॉ. आर्. एन्. डांगे, नागपूर	रु. ५१-०

★ ★

शाखा वृत्त

मेहकर येथे शाखास्थापनेकरिता या वर्षाकरिता स्थानिक सभासदांची दि. १३-९-५९ रोजी सभा होऊन त्यांत कार्यकारी मंडळासांठी पुढीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यांत आले.

(१) श्री. मदन विष्णूसा सावजी, अध्यक्ष; (२) श्री. बाबुराव पुराणिक उपाध्यक्ष, (३) श्री. मधुकर कोलवाडकर, कोषाध्यक्ष, (४) श्री. श. ह. दंडे चिटणीस, (५) श्री. उ. रा. देशमुख, उपचिटणीस, (६) श्री. नागनाथपंत जोशी, सभासद.

वणी शाखा--

वणी शाखेचे दि. १३-१०-५९ रोजी सायंकाळी ६-३० वाजतां उद्घाटक श्री. धोंडो दिनकर ऊर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे हस्ते उद्घाटन झाले.

सुरुवातीस श्री. के. ना. काटपाताळ यांचे प्रास्ताविक भाषण होऊन श्री. अण्णासाहेब देशमुख यांचे उद्घाटनाचें भाषण झाले.

रात्री सौ. ताराबाई देशपांडे, नागपूर, यांचा शास्त्रोक्त व भावगीत गायनाचा कार्यक्रम झाला.

वर्धा शाखा

वर्धा शाखेची वार्षिक साधारण सभा दि. २५-९-५९ रोजी स्वावलंबी प्रशिक्षण महाविद्यालयाचे सभागृहात झाली. अध्यक्षस्थानी प्रा. वि. उ. चांदूरकर होते. यावेळी श्री. द. ज. बर्गी यांनी १९५८-५९ चे कार्यवृत्त सभेपुढे सादर केले. १९५८-५९ मध्ये पुढील कार्यक्रम झाले.

(१) प्राचार्य वि. प्र. मोहगावकर, वाशीम, यांचे व्याख्यान

(२) प्रा. म. ना. अदवंत, जळगाव, यांचे व्याख्यान

(३) सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. सुधीर फडके यांचा "गीतरामायणाचा" कार्यक्रम.

(४) कविवर्य श्री. रविन्द्रनाथ टागोर यांची पुण्यतिथि

यानंतर शाखेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. खालील पदाधिकाऱ्यांची ५९-६० सालाकरिता निवड करण्यांत आली.

अध्यक्ष—प्रा. एस्. डी. वनमाली, उपाध्यक्ष—श्री. वामनराव घोरपडे व सौ. उषाताई देशमुख, कोषाध्यक्ष--प्रा. वि. उ. चांदूरकर, कार्यवाह--श्री. द. ज. बर्गी, सहकार्यवाह—श्री. दा. गु. देशमुख व श्री. चिं. कृ. हेटे.

सदस्य—श्री. श्यामकान्त ठाकरे, श्री. वसंतराव शब्दे, श्री. जे. एम्. देशमुख, श्री. बा. पु. मोहरीर, श्री. श्री. पुं. काठाळे, श्री. सत्यनारायण लोया, कु. प्रमिला जोशी, श्री. श्री. व्यं घिरणीकर, श्री. भाजेकर व श्री. वि. गं कावळे.

यावर्षी कांही इतर संस्थांच्या सहकार्याने नवरात्र व्याख्यानमाला गुंफण्यात आली. त्यात पुढील मान्यवरांनी व्याख्याने दिली.

(१) १ ऑक्टोबर ५९--श्री. शं. ग. सुरडकर जिल्हाध्यक्ष वर्धा, विषय--"संस्कृतीचे जीवनांत स्थान"

(२) २ ऑक्टोबर ५९—प्रा. कुसुम नांदे, अकोला, विषय—"समर्थ रामदास व त्यांचे सावधपण"

(३) ३ ऑक्टोबर ५९—न्या. के. तु. उर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति का. विश्वस्त, वि. सा. संघ नागपूर, विषय—"आपले आजचे शिक्षणांत चुकते काय व कुठे ?"

(४) ४ ऑक्टोबर ५९—प्रा. शांताराम करकरे, नागपूर, विषय—"फ्राइडचे मानसशास्त्र"

(५) ५ ऑक्टोबर ५९—प्रा. एस्. के. लिमये, नागपूर, विषय—"संस्कृत साहित्यातील कांही व्यक्तिरेखा"

(६) ६ ऑक्टोबर ५९—प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे, नागपूर, विषय—"ज्ञानेश्वरी"

(७) ७ ऑक्टोबर ५९—श्री. दि. ब. पंडित, नागपूर, विषय—"शब्द-शक्ति आणि शब्दसौंदर्य"

(८) ८ ऑक्टोबर ५९—प्रा. अकोलकर, चांदा; विषय—"शालेय स्वराज्य-मंत्र आणि तंत्र"

(९) ९ ऑक्टोबर ५९—श्री. मु. ना. कागलकर, अमरावती, विषय—"शिक्षणात धर्माचे स्थान"

ही सर्व व्याख्यानमाला अतिशय लोकप्रिय झाली व यशस्वीपणे पार पडली.

(टीप--संघवार्तेतील शुद्धलेखन वि. सा. संघाने व नागपूर विद्यापीठाने मान्य केलेल्या नियमानुसार छापले आहे.)

卐